


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ४ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# देशात 48 टक्के अधिक पाउस!

## पावसाचा धुमाकूळ, दिवाळी संपली तरी पावसाचा जोर कायम, शेतकरी संकटात



**मुंबई/प्रतिनिधी :** देशात यंदा मे महिन्यापासून म्हणजेच भर उन्हाळ्यापासून पावसाचा धडाका सुरू आहे. देशात अनेक ठिकाणी अतिवृष्टीने कहर केला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी झाली. महाराष्ट्रातही मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र, मुंबई, पुणे यासह राज्यात सर्वत्र पावसाचा धडाका अद्याप सुरू आहे. अतिवृष्टीमुळे अनेक भागांना महापुराचा तडाखा बसला. त्यामुळे पिके पाण्यात गेली. त्यामुळे खरीप हंगाम जवळपास हातातून गेला. आता दिवाळी संपत आली तरी अनेक भागांत पावसाचा जोर कायम असून, १ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरदरम्यान, देशात ११७ मि.मी. पावसाची नोंद झाली. म्हणजेच ज्या महिन्यात थंडी सुरू व्हायला पाहिजे, त्याच महिन्यात देशात सरासरीच्या ४८ टक्के पाउस अधिक झाला.

नैऋत्य मोसमी वा-यांनी माघार घेतल्यानंतर लगेचच निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे महाराष्ट्रात ऑक्टोबरअखेरपर्यंत आणि अजूनही पावसाचा जोर कायम आहे. दरम्यान, १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत राज्यात ७७.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ५ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. तसेच १ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या दरम्यान देशात ११७.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. या कालावधीत ७९.७ मि.मी. पाउस पडणे अपेक्षित आहे. परंतु देशात ४८ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. दरम्यान, पुढील तीन ते चार दिवस राज्यातील ब-याच भागांत जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मुंबईसह राज्यातील इतर भागांतून १० ऑक्टोबर रोजी नैऋत्य मोसमी वा-यांनी माघार घेतली. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी मोसमी वा-यांनी संपूर्ण देशातून माघार घेतली. काही दिवसांतच अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळाची तर बंगालच्या उपसागरात मोंथा चक्रीवादळाची निर्मिती झाली. याचाच प्रभाव म्हणून राज्यात अनेक भागांत पाउस कोसळला. मुंबईसह विदर्भात जोरदार पाउस झाला. (पान २ वर)

## देशभरात भीषण अपघातांची मालिका

# आंध्र प्रदेश, तेलंगणा, राजस्थानात 60 जणांचा बळी, अनेक जखमी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून देशाच्या विविध भागांतून एकामागोमाग एक भीषण रस्ते अपघातांच्या बातम्या समोर येत आहेत. जयपूर, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये झालेल्या अपघातांत ६० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला, तर शेकडो जखमी झाले. वेग, निष्काळजीपणा आणि सुरक्षेचा अभाव हे या अपघातांचे प्रमुख कारण मानले जात आहे.

**भरधाव डंपरची बाईकला धडक, लोकांना चिरडलं; १९ जणांचा मृत्यू,**

जयपूरमध्ये एक भीषण अपघात झाला आहे. नशेत असलेल्या एका डंपर चालकाने वेगाने गाडी चालवत आधी बाईकला जोरदार धडक दिली आणि नंतर रस्त्यावरील लोकांना आणि इतर वाहनांना चिरडलं. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ आता समोर आला आहे, ज्यामध्ये डंपर वेगाने जात असल्याचं पाहायला मिळत आहे. हा अपघात इतका भीषण होता की डंपरखाली अनेक मृतदेह अडकले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत या अपघातात १९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १२ हून अधिक लोक गंभीर जखमी आहेत. जखमींना उपचारासाठी कांवटिया रुग्णालय आणि ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आलं आहे. काहींची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचं डॉक्टरांचं म्हणणं आहे. काही वाईक डंपरखाली अडकल्या होत्या आणि त्यांना बाहेर काढण्यासाठी बराच वेळ लागला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक लोकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केलं. घटनेनंतर रुग्णालयांमध्ये शोककळा पसरली. ट्रॉमा सेंटरच्या बाहेर मृतांच्या कुटुंबियांना आक्रोश पाहायला मिळाला. या अपघातानंतर रस्त्यावर भयंकर दृश्य होतं. सर्वांनाच यामुळे मोठा धक्का बसला आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी कॅबिनेट मंत्री सुमित गोदरा आणि सुरेश सिंह रावत यांना अपघातानंतर तातडीने रुग्णालयात पाठवलं. त्यांनी जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याच्या सूचना डॉक्टरांना दिल्या. ट्रॉमा सेंटरचे नोडल अधिकारी बीएल यादव यांनी सांगितलं की, सर्व जखमींवर उपचार सुरू आहेत आणि (पान २ वर)

## आजपासून ऑक्टोबरचे मानधन खात्यात जमा होणार

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑक्टोबर महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस उद्या



पासून सुरुवात होत आहे. लवकरच योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होईल, अशी माहिती महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. या योजनेचा लाभ पुढेही मिळत राहावा यासाठी सर्व लाडक्या बहिणींनी १८ नोव्हेंबरचा आधी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी,असे आवाहनही त्यांनी केले आहे. लाडकी बहीण योजनेचा भार पेलणे सरकारला जड जात असले तरी तूर्त ही योजना सुरूच ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मात्र विधानसभा निवडणुकीपूर्वी घाईघाईत ही योजना सुरू करण्यात आल्याने लाखो अपात्र महिलांच नव्हे तर पुरुषांनीही याचा लाभ घेतल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे लाभार्थ्यांची कसून छाननी करण्यात येत आहे. लाभार्थी बहिणींचे ई-केवायसी केले जात आहे. ही योजना सुरू ठेवण्यासाठी मागील महिन्यापासून ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व लाडक्या बहिणींनी १८ नोव्हेंबरचा आधी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी अशी विनंती मंत्री अदिती तटकरे यांनी समाजमाध्यमाद्वारे केली आहे.




# राज्यात आरोग्य सेवा कोलमडली

## फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरून डॉक्टरांचे काम बंद आंदोलन

**मुंबई/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर महिलेच्या दुर्दैवी मृत्यूनंतर या घटनेची निष्पक्ष चौकशी होउन न्याय मिळावा तसेच डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करण्याची मागणी डॉक्टर संघटनांकडून केली जात आहे. यासाठी आज राज्यभरातील सर्व प्रमुख डॉक्टर संघटना आंदोलन करत आहे. यामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प झाली आहे. डॉक्टरांच्या आंदोलनामुळे पालिका आणि शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवा सुरुळीत राहावी यासाठी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक सेवा देत आहेत. फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत डॉक्टर महिलेने २३ ऑक्टोबर रोजी फलटण येथील एका हाटेलमध्ये आत्महत्या केल्याचे समोर आले. आत्महत्येपूर्वी डॉक्टर महिलेने स्वत:च्या तळहातावर सुसाईट नोट लिहून ठेवली होती. यात त्यांनी पीएसआय गोपाळ बदणे आणि प्रशांत बनकर यांनी शारीरिक, मानसिक छळ (पान २ वर)

## सध्या पॉर्न व्हिडिओवर सुनावणी करण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इंटरनेटवर पॉर्न कंटेन्ट सहज उपलब्ध आहे. तरूण मोठ्या प्रमाणात पॉर्नच्या आहारी गेल्याचेही समोर आले आहे. अशातच आता पॉर्नवर बंदी घालण्यासह याबाबत कडक नियामावली तयार करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र या याचिकेकडे फारसे लक्ष दिलेले नाही. चार आठवड्यांनंतर या याचिकेवर सुनावणी पार पडणार आहे. मात्र यावर भाष्य करताना कोर्टाने केलेल्या विधानाने सर्वांचे लक्ष वेधले आहे.




एका व्यक्तीने कोर्टात याचिका दाखल करत, न्यायालयाने केंद्र सरकारला पोर्नोग्राफी पाहण्याविरुद्ध राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे निर्देश द्यावेत असे म्हटले होते. तसेच सार्वजनिक ठिकाणी पॉर्न पाहण्यास बंदी घालावी अशा मागणी करण्यात आली होती. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ याचिकेवर सुनावणी करत होते. यावेळी कोर्टाने यावर बोलताना नेपाळचा दाखला दिला आहे. एका बॅनमुळे नेपाळमध्ये काय घडलं हे आपण पाहिलं आहे असं कोर्टाने म्हटले आहे. दरम्यान, नेपाळमध्ये सोशल मीडियावर बंदी घालण्यात आल्याने तरुणांनी देशाभरात आंदोलने करत सरकार उलथवून लावले होते.

पॉर्नबाबत कोर्टात जाणा-या याचिकाकर्त्याने (पान २ वर)

## नेपाळमध्ये हिमस्खलनात 7 जणांचा मृत्यू; अनेक बेपत्ता



**काठमांडू//वृत्तसंस्था :** सोमवारी ईशान्य नेपाळमध्ये एका मोठ्या हिमस्खलनात किमान सात जणांचा मृत्यू झाला. यामध्ये चार जण जखमी झाले आहेत. ५,६३० मीटर उंचीच्या यालुंग री पर्वतावर ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, हिमस्खलन शिखराच्या बेस कॅम्पवर कोसळले, तिथे अनेक परदेशी गिर्यारोहक उपस्थित होते. चार जण अजूनही बेपत्ता आहेत आणि त्यांचा शोध सुरू आहे. मृतांमध्ये तीन अमेरिकन, एक कॅनेडियन, एक इटालियन आणि दोन नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. ही माहिती दोलखा जिल्ह्यातील जिल्हा पोलिस कार्यालयाचे पोलिस उपअधीक्षक ज्ञान कुमार महातो यांनी दिली. यालुंग री हे शिखर बागमती प्रांतातील रोलवालिंग खो-यात आहे.

# हायर कायद्यामुळे भारत संकटात

- रघुराम राजन यांचा इशारा
- अमेरिकेचा प्रस्ताव भारताच्या मुळावर घाव



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेने लावलेला टॅरिफ भारतासाठी संकट नसून त्यापेक्षाही मोठे संकट भारताच्या पुढे उभे असल्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी म्हटले. एच-१बी व्हिसा वादापासून ते अमेरिकेच्या प्रस्तावित हायर कायद्यापर्यंतच्या मुद्यांवर त्यांनी स्पष्टपणे भाष्य केले. हेच नाही तर भारताला सावधगिरी बाळगण्याची मोठी गरज असल्याचेही त्यांनी म्हटले. हायर कायद्याला एच-१बी व्हिसापेक्षाही धोकादायक असल्याचे त्यांनी म्हटले. अमेरिकेने भारतावर लावलेल्या टॅरिफपेक्षा कितीतरी पट हायर कायदा धोकादायक आहे. यूएस हायर कायद्याचा भारताच्या सेवा निर्यात आणि जागतिक प्रतिभेसाठी मोठा धोका निर्माण करू शकतो असे रघुराम राजन यांनी म्हटले. पुढे भारताला इशारा देत रघुराम राजन यांनी म्हटले की, या कायद्यामुळे भारताच्या सेवा क्षेत्रावर मोठा कर लावला जाउ शकतो. धक्कादायक (पान २ वर)

## रशियाच्या मदतीने इराण 8 नवीन अणुउर्जा प्रकल्प बांधणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वच्छ आणि शाश्वत उर्जा उत्पादन वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून तेहरान रशियाच्या



मदतीने आठ नवीन अणुउर्जा प्रकल्प बांधणार आहे. यासाठी दोन्ही देशांनी एक करार केला आहे, अशी माहिती इराणच्या अणुउर्जा संघटनेचे प्रमुख मोहम्मद इस्लामी दिली. दरम्यान, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेशिकयान यांनी 'शांततापूर्ण अणुकार्यक्रम' आणि 'अणुशस्त्रांचा विकास न करण्याच्या' त्यांच्या देशाच्या वचनबद्धतेचा (पान २ वर)

## पडद्यावरील खाष्ट सासू हरपली!

### ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचं नुकतंच निधन झालं आहे. वयाच्या ८५व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. त्यांनी आपल्या अभिनय कौशल्याच्या जोरावर मराठी रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमधून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविलं होतं. एकेकाळी मराठी चित्रपटसृष्टीतील खलनायकी चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे या उत्तम अभिनेत्री असण्यासोबतच एक उत्कृष्ट गायिका देखील होत्या. सुरुवातीला त्यांना गायन क्षेत्रातच आपले करिअर करायचे होते. यासाठी त्यांनी शालेय जीवनापासूनच शास्त्रीय तसेच नाट्यसंगीताचे धडे गिरविले होते. लग्नानंतर त्यांचे पती शरद डोंगरे यांनी त्यांच्या कलेच्या आवडीला खंबीर साथ दिली. दया डोंगरे यांनी विविध चित्रपट, नाटके आणि मालिकांमधून महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या.



# अनिल अंबानींच्या 3 हजार कोटी रूपयांच्या मालमत्ता जप्त

## येस बँक कर्ज प्रकरणात पाली हिलमधील घरासह 40 मालमत्तांचा समावेश



**मुंबई/प्रतिनिधी :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपच्या ४० हून अधिक मालमत्ता जप्त केल्या आहेत. या मालमत्तांमध्ये अनिल अंबानी यांचे पाली हिल येथील घर देखील समाविष्ट आहे. जप्त केलेल्या मालमत्तांची एकूण किंमत ?३,०८४ कोटी असल्याचा अंदाज आहे. मनी लॉंड्रिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकाम) च्या येस बँकेच्या कर्ज आणि निधी वळवण्याच्या प्रकरणाचा समावेश आहे. हे मालमत्ता जप्तीचे आदेश ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पीएमएलएच्या कलम ५(१) अंतर्गत जारी करण्यात आले होते. ईडीचे म्हणणे आहे की सार्वजनिक पैसे वसूल करण्यासाठी ही पावले आवश्यक आहेत. २४ जुलै रोजी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अनिल अंबानींच्या रिलायन्स ग्रुपशी संबंधित ३५ हून अधिक ठिकाणी आणि जवळपास ५० कंपन्यांवर छापे टाकले. त्यानंतर २३ ऑगस्ट रोजी सीबीआयने अनिल अंबानींच्या घरावरही छापे टाकले.

ईडीला त्यांच्या चौकशीत रिलायन्स होम फायनान्स (RHFL) आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स (RCFL) मध्ये निधीचा मोठा गैरवापर आढळून आला आहे. २०१७ ते २०१९ दरम्यान, येस बँकेने RHFL मध्ये २,९६५ कोटी आणि RCFL मध्ये २,०४५ कोटी गुंतवले. परंतु डिसेंबर २०१९ पर्यंत, या रकमा अनुत्पादक मालमत्ता (NPA) बनल्या होत्या. डत्तक्ष्म्र चे थकित कर्ज अजूनही १,३५३ कोटी आहे, तर RCFL चे कर्ज अजूनही १,९८४ कोटी आहे. एकूण, येस बँकेला २,७०० कोटींपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागला. ईडीच्या मते, हे पैसे रिलायन्स ग्रुपच्या इतर कंपन्यांकडे वळवण्यात आले. (पान २ वर)






# अनिल अग्रवाल यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## गौरक्षण संस्थेत गायींना ५६०० किलो फळे, भाज्या, गूळ अर्पण

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री राजस्थानी हितकारक मंडळाचे अध्यक्ष, अग्रसेन स्मारक समितीचे अध्यक्ष, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि दैनिक अमरावती मंडल आणि आपली मातृभूमीचे संपादक अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांचा वाढदिवस (दि.३) उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त जिल्ह्यातील आघाडीचे नेते, मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटना, अधिकाऱ्यांकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा हा सिलसिला सकाळपासून संध्याकाळपर्यंत सुरू होता. दरम्यान, एका अनोख्या संकल्पनेसह, अनिल अग्रवाल यांच्या मित्र परिवाराने दस्तुर नगर येथील गौरक्षण संस्थेत गायींना ५६०० किलो फळे, भाज्या, गूळ आणि अन्नपदार्थ अर्पण केले. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, अनिल अग्रवाल यांचे मोठे बंधू राजेश अग्रवाल, माया देवी अग्रवाल, संगीता अनिल अग्रवाल, गौरक्षण संस्था अध्यक्ष एड. आर बी अटल, अग्रवाल समाज अध्यक्ष विजय






केडिया, माहेश्वरी पंचायत सरपंच प्रा. जगदीश कलंत्री, माहेश्वरी सामूहिक सेवा समिति अध्यक्ष रामेश्वर गग्गड, अग्रसेन स्मारक समिति के माणिकचंद जालान आदि उपस्थित होते. तसेच अग्रवाल कुटुंबातील ऋषी राजेश अग्रवाल, प्रणय अग्रवाल, अमन अग्रवाल हे देखील उपस्थित होते.माजी पालकमंत्री प्रवीण पोटे , श्रेयस पोटे ,आमदार सुलभा संजय खोडके, यश खोडके, शिवसेना उपनेता ज्ञानेश्वर धाने पाटिल, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष बद्रे, युवा सेना प्रमुख राम पाटिल, पोलिस महानिरीक्षक रामचंद्र पोकळे, ठानेदार वडतकर, गुरूद्वारा गुरूसिंघ सभा अध्यक्ष अमरज्योत सिंह जग्गी, दीपसिंह बग्गा,बिटटू सलूजा, रतनदीप सिंह सोनू, अमरजीत सिंह जुनेजा, गुरूविंदर सिंह मोंगा, सनी साहू, रवि वाकोडे, उमेश महल्ले, माजी नगरसेवक सचिन रासने, राजेश पड्डा, रामचंद्र गुप्ता, दर्शन बागडी, रवि सेठ पंजाबी, विठ्ठलराव ठाकरे, फिरोज खान, दीपक गिरोलकर, योगेश ठवळी पाटिल, किशोर भुयार, किशोर देशमुख, पवन भूत, सुरेश भट्टी, संजय अभयराव अग्रवाल, सचिन ठाकरे, आदित्य ठाकरे, सत्यनारायण अग्रवाल आदि अनेक मान्यवर अनिल अग्रवाल यांना शुभेच्छा दिल्या.

पान १ व १० वरून

## देशात 48 टक्के अधिक

१ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत ७७.७ मि.मी. पावसाची म्हणजेच सरासरीपेक्षा ५ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. राज्यातील काही भागांत अजूनही पुढील ३ ते ४ दिवस पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक राहणार आहे. इतर भागांत ढगाळ वातावरण राहील. पुणे, अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, सातारा, धाराशिव, लातूर, नांदेड जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहणार असून, काही ठिकाणी पावसाची शक्यताही हवामान खात्याने वर्तवली आहे.

## आंध्र प्रदेश, तेलंगणा

काहींना कांवटिया रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

**राजस्थानमध्ये खासगी बसला आग : २ ठार, १० जखमी**

राजस्थानमध्येच काही दिवसांपूर्वी एक भीषण बस दुर्घटना घडली. उत्तर प्रदेशच्या पीलीभीतहून ईंटभट्टीवर जाणा-या ५० मजुरांनी भरलेली बस ११ केव्ही हाय-टेंशन लाईनला धडकली. त्यात बसवरील सिलिंडर आणि दुचाकी वाहनांनी आग पकडली. यात दोघांचा मृत्यू झाला, तर दहा जखमी झाले. या घटनेत बस जळून खाक झाली.

**फलोदीत टेंपो-ट्रक धडक : १५ ठार**

राजस्थानातील फलोदी भागात रविवारी रात्री टेंपो ट्रॅव्हलर आणि ट्रक यांची जोरदार टक्कर झाली. या अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला. सर्व मृतक जोधपूरच्या सुरसागर परिसरातील असून ते कोलायत मंदिरात दर्शन करून परत येत होते.

**तेलंगणात एसटी बस आणि ट्रकची टक्कर : २० ठार**

तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यात तेलंगणा राज्य परिवहन महामंडळाची बस आणि गिट्टीने भरलेला ट्रक यांच्यात धडक होउन २० जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १० महिला, एक १० महिन्याचे बाळ आणि दोन्ही वाहन चालकांचा समावेश आहे. ट्रकची गिट्टी बसच्या आत पडल्याने अनेक प्रवासी दबले.

**आंध्र प्रदेशात बसला आग : २० प्रवाशांचा मृत्यू**

कुरनूल जिल्ह्यात हैदराबादहून बंगळुरु कडे जाणा-या बसला आग लागून २० प्रवाशांचा मृत्यू झाला. प्राथमिक चौकशीत समोर आले की बसखाली मोटारसायकल फसल्याने ठिणगी उडाली आणि संपूर्ण बस पेटली. बसमध्ये ४३ प्रवासी होते. फॉरेन्सिक अहवालानुसार, बसची बॅटरी, ज्वलनशील सीट्स आणि प्रवाशांचे मोबाइल फोन यांनी आगीचा प्रसार अधिक वेगाने झाला.

## राज्यात आरोग्य सेवा

केल्याचा आरोप केला. या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. मात्र डॉक्टर महिलेवर पोलिस प्रशासन आणि एका माजी खासदाराकडून वैद्यकीय अहवाल बदलून देण्यासाठी दबाव टाकला जात होता असाही आरोप आहे.

**नायर रुग्णालय परिसरात डॉक्टरांचे आंदोलन-** डॉक्टर महिलेच्या मृत्यूचा तपास योग्य दिशेने होत नसल्याचा आरोप डॉक्टरांच्या विविध संघटनांकडून केला जात आहे. मुंबईतील नायर रुग्णालयातील डॉक्टर आंदोलनात सहभागी झाले आहे. बा रुग्ण विभाग पूर्णपणे बंद करण्यात आला असून डॉक्टर नायर रुग्णालयाच्या परिसरात आंदोलन करत आहेत. नायर रुग्णालयात निवासी डॉक्टर आणि पदव्युत्तर शिक्षण घेणा-या डॉक्टरांनी आंदोलन सुरू केले. बेटी पढी, पर बची नहीं, नो सेफटी, नो सर्विस अशा घोषणा देत, हातात पोस्टर घेत डॉक्टर आणि एमडी करणारे विद्यार्थी आंदोलनात उतरले आहेत.

***डॉक्टर संघटनेच्या प्रमुख तीन मागण्या-*** डॉक्टर आंदोलकांची मागणी आहे की, मृत महिला डॉक्टरच्या कुटुंबाला ५ कोटी रुपयांची मदत, जलदगती न्यायालयात सुनावणी करावी आणि डॉक्टरांवरील कामाचा ताण कमी करावा, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. डॉक्टर महिला आत्महत्या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात मार्ड संघटनेकडून काम बंद आंदोलन करण्यात आले. अत्यावश्यक सेवा वगळता ओपीडी आणि इतर सेवा बंद करण्यात आली. बंद पुकारल्याने रुग्ण सेवेवर परिणाम होणार आहे.

## सध्या पॉर्न व्हिडिओवर सुनावणी

म्हटले होते की, देशात इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. प्रत्येकजण डिजिटली कनेक्ट झाला आहे. कोण साक्षर आहे की अशिक्षित हे महत्त्वाचे नाही. एका क्लिकवर सर्व काही उपलब्ध आहे. सरकाने हेही मान्य केले आहे की, लाखो साइट्स इंटरनेटवर पॉर्नचा प्रचार करतात. कोरोनाच्या काळात शाळकरी मुले डिजिटल उपकरणे वापरत होती. मात्र या उपकरणांमध्ये त्यांना पार्न पाहण्यापासून रोखण्यासाठी कोणतीही यंत्रणा किंवा नियमावली नव्हती.या व्यक्तीने आपल्या याचिकेत पुढे म्हटले की, या सर्व प्रकाराकडे लक्ष देण्यासाठी कोणतेही ठोस कायदे नाहीत. प?र्न पाहिल्यामुळे व्यक्तीवर नकारात्मक परिणाम होतो. खासकरून १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या विकसनशील मनावर विपरीत परिणाम होतो. यासोबत या याचिकाकर्त्याने भारतात २० कोटींहून अधिक व्हीडीओ विक्रीसाठी उपलब्ध असल्याचा डेटाही सादर केला आहे. मात्र या याचिकेकडे सर्वोच्च न्यायालयाने फारसे लक्ष दिलेले नाही.

## हायर कायद्यामुळे भारत

म्हणजे याचा परिणाम भारतावर अनेक वर्ष दिसू शकतो. अमेरिकेच्या प्रस्तावित एचआयआरई कायद्याचा भारतावर सर्वाधिक गंभीर परिणाम होउ शकतो. एच-१बी व्हिसाच्या नियमातील बदलामुळे भारतीयांना थोडा फटका बसला. मात्र, त्यापेक्षा कितीतरी जास्त पट या कायद्याचा फटका असेल. सेवांवरील शुल्काच्या संभाव्यतेबाबत आहे, जो सर्वात मोठा आणि वास्तविक धोका आहे. हायर कायद्यावर अमेरिकन काँग्रेसमध्ये चर्चा सुरू आहे. भारताची चिंता वस्तूंवरील शुल्काबाबत नाही तर या कायद्याबाबत आहे.

भारताला मोठा फटका बसू शकतो

हा कायदा जर लागू झाला तर याचा मोठा फटका भारताला बसेल फक्त फटकाच नाही तर याचा परिणाम अनेक सेवांवर थेट होईल. भारताच्यासमोर असलेल्या मोठ्या संकटाबद्दल बोलताना रघुराम राजन दिसले आहेत. रघुराम राजन यांनी एकप्रकारे भारताला मोठी चेतावणीच दिल्याचे बघायला मिळत आहे. अमेरिका भारताबद्दल धक्कादायक निर्णय घेताना दिसत आहे. अगोदर भारतावर ५० टक्के टॅरिफ अमेरिकेकडून लावण्यात आला.भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने आपण टॅरिफ लावल्याचे अमेरिकेने म्हटले. मात्र, आता भारताबद्दल काहीतरी वाईट अमेरिकेच्या मनात सुरू असल्याचे बघायला मिळत आहे. काही वर्षांमध्ये भारताने जी काही प्रगती केली, त्याचा धसका अमेरिकेने घेतल्याचे दिसत आहे. काहीही करून त्यांना भारताची प्रगती रोखायची असल्याचाही आरोप आहे.

## रशियाच्या मदतीने इराण

पुनरुच्चार केला. बुशेहरमध्ये चार आणि उत्तर आणि दक्षिण किना-यावरील इतर चार अणुउर्जा प्रकल्पांच्या संयुक्त बांधकामासाठी इराण आणि रशियामध्ये एक नवीन करार झाला आहे. अणुउर्जेचे दावे- सरकार त्यांची नेमकी ठिकाणे नंतर उघड करेल. हे प्रकल्प 'स्वच्छ अणुउर्जेचा' शाश्वत पुरवठा सुनिश्चित करतील आणि इराणला २०,००० मेगावॅटने अणुउर्जा निर्मिती वाढविण्यास मदत करतील, असे AEOI |प्रमुखांनी सांगितले. इराणच्या उत्तरेकडील गोलेस्तान प्रांताच्या किना-यावर अणुउर्जा प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले आहे.खुझेस्तान प्रांतात अणुउर्जा प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी देखील योजना सुरू आहेत. इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांनी काल 'शांततापूर्ण अणुकार्यक्रम' आणि 'अणुशस्त्रांचा विकास न करण्याच्या' त्यांच्या देशाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

## अनिल अंबानींच्या 3 हजार कोटी

कर्ज मंजुरी प्रक्रियेतही अनेक अनियमितता आढळून आल्या. उदाहरणार्थ, काही कर्जांसाठी अर्ज करण्यात आला, मंजूर करण्यात आला आणि त्याच दिवशी वितरित करण्यात आले. फील्ड चेक आणि बैठका वगळण्यात आल्या. कागदपत्रे रिक्त किंवा तारीख नसलेली आढळली. ईडीने याला 'जाणूनबुजून नियंत्रण अपयश' असे वर्णन केले आहे. पीएमएलएच्या कलम ५(१) अंतर्गत तपास सुरू आहे आणि ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी जप्तीचे आदेश जारी करण्यात आले. जप्त केलेल्या मालमत्ता दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी यासारख्या शहरांमध्ये आहेत. त्यामध्ये निवासी युनिट्स, ऑफिस स्पेस आणि जमिनीचा समावेश आहे. अनिल अंबानी यांचे पाली हिल येथील निवासस्थान सर्वात हाय-प्रोफाइल आहे. ईडी गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रित करत आहे जेणेकरून अधिकाधिक मालमत्ता जप्त करता येतील. आतापर्यंत ३,०८४ कोटी किमतीच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.

## वकिलांनी केले लाल

शासनाकडे करण्यात आली. निषेध करणाऱ्यांमध्ये एड. सुनील देशमुख, एड. अमोल मुरल, एड.आशिष लांडे, एड. विद्या मानके, एड. ऋषिकेश उपाध्याय ,एड.सुमित शर्मा, एड.अक्षय बोले, एड. नेतल मल्ला ,एड. आशिषसिंह परिहार, एड.विशाखा तागडे, एड. पूनम रिठे, एड. प्रशांत देशपांडे, एड.पराग ठाकरे, एड. ज़िया खाऩ , एड.प्रवीण ठाकरे, एड. परवेज़ खाऩ, एड. अनिल जायसवाल,एड. अज़हर नवाज़,एड. किशोर शेलके,एड. सुनील बोले,एड. शोएब खाऩ,एड. चेतन बुंदेले ,एड.प्रवीण आठवले,एड. गिरिराज चंगनी ,एड.महेश करूले,एड. रोहित उपाध्याय,एड. यज्ञेश शर्मा,एड. स्वप्निल जाजू ,एड.गणेश गंधे,एड. हितेश लड्ढा ,एड.अनिल विश्वकर्मा,एड. शैलेंद्र तिवारी,एड, सुधीर तायड़े यांच्यासह इतरांचा सहभाग होता.

## तिवसा तालुका कृषी

विमा नगदी स्वरूपात उतरावा लागला,मात्र खरिपातील सोयाबिन पीक हे पूर्ण उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. परंतु सरकारकडून विमा परतावा मिळण्यासंदर्भात कसल्याच प्रकारच्या अधिकृत सूचना नसल्यामुळे विमाधारक शेतकरी संभ्रमात आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात आक्रमक शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ठिय्या देत संताप व्यक्त केला व शासकीय मदतीसह विमा परतावा देण्याची मागणी केली.रब्बीच्या हंगामाला सुरवात झाल्यामुळे सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या मदतीसह विमाधारक शेतकऱ्यांना आपल्या पिकाचा विमा परतावा येत्या पंधरा दिवसाच्या आत देण्यात यावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली अन्यथा तालुका कृषी कार्यालयाच्या विहीरीत उतरून आंदोलन करण्याचा इशारा आक्रमक शेतकऱ्यांनी प्रशासनास दिला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुकूंद पूनसे,दीपक देशमुख,सुभाषराव ढगे,किशोर गोरडे,प्रतापराव खैरकार,संदीप ढोक,कैलास ढोक,निलेश पूनसे,रवी जवंजाळ,रामचंद्र मनोहरे,विनोद मोंढे,योगेश भगत,शंकरराव होले,उमेश इंगोले,काशिनाथ पाटील, राजुभाऊ कोल्हे,पुरोशोत्तम गोरडे,धनराज अढाऊ,नारायणराव वानखडे,मनीष गाडगे,पंकज कडू, बबलू इंगोले,जीवन उंद्रे,सुरेंद्र जवंजाळ,निवृत्ती मोकद्दम,मंगेश ढोक,राधेश्याम महात्मे,विनोद मसलदी,पंकज कळंबे,महेश थोटे,आशिष ढोरे,वैभव सरोदे,ओम घुरडे,सूरज पांडे,तेजस तालन,संदीप थोटे,राहुल लवनकर,विजय पूनसे,रामभाऊ कडू,दिनेश राऊत,अजाब सरोदे,विलास मसलदीं,हर्षल ढगे,मंगेश पूनसे, भैसराज मसलदी,शकर ढोक गोलू शिंदे यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## विकासाचा समतोल साधण्यासाठी

अमरावती महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक - ६ विलास नगर अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास योजनेच्या ४८ लक्ष निधी अंतर्गत विविध विकास कामांचे भूमिपूजन रविवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक महाकारुणिक बौद्ध विहार मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर येथे पार पडले. सदर भागातील सभागृहावरील मोकळ्या जागेवर वाचनालयाचे बांधकाम करणे, खंडारे ते वानखडे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता व नाली बांधणे, रमाबाई आंबेडकर नगर अंतर्गत निकाजळे यांच्या घराजवळील महाबोधी सभागृहातील खुल्या जागेवर टीन शेड उभारणे,कपिल वस्तु नगर येथील दर्शनी भागातील चौकामध्ये ओट्याचे बांधकाम करणे. तसेच गौतम नगर येथे काँक्रीट रस्ता व रपट्याचे बांधकाम करणे,अशी विविध विकास कामे करण्यात येत आहे. यावेळी आमदार महोदयांनी एकाच ठिकाणावरून घोषणा करीत विकास कामांचा कार्यारंभ केला. पुढे बोलतांना आमदार खोडके म्हणाल्या कि, पुरोगामी महाराष्ट्राला फुले- शाहू-आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचा वारसा लाभला आहे. त्यामध्ये सामाजिक न्याय महत्वाचा असल्याने प्रत्येक नागरिकाला विकासाच्या संकल्पनेत आणण्यासाठी त्यांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ तसेच पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वास खोडके यांनी व्यक्त केला. दरम्यान माजी नगरसेवक भूषण बनसोड यांनी आपल्या संबोधनातून सांगितले कि. आमदार सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नातून प्रत्येक प्रभागात अभ्यासिका साकारली जात आहे. या विधायक कार्यातून समाजाला उच्च-शिक्षण व भावी जीवनाची नवी दिशा मिळणार आहे. दरम्यान स्थानिक भीमांकूर नवयुवक मंडळाच्या वतीने सुलभा खोडके व यश खोडके यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी आपल्या प्रस्ताविकातून प्रथमेश गवई यांनी परिसरातील विविध विकास कामे, अडचणी व आवश्यक सुधारणा याबाबत सर्वांना अवगत केले. कार्यक्रमाला जेष्ठ आंबेडकरी नेते उत्तमराव गवई, माजी नगरसेवक भुषण बनसोड, सामाजिक कार्यकर्ता प्रवीण भोरे, सतीश करेसिया, रिना भोरे, गौतम वानखडे, बाळासाहेब देशमुख, विशाल गुप्ता, शंकर नरवणे, संजय भोवते, राहुल तायडे, बबलू जामनिक, मानस गवई आदींसह रमाबाई आंबेडकर नगर, कपिलवस्तू नगर , गौतम नगर , विलास नगर आदी भागातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## लग्नाचे आमिष दाखवत

दिली. घटनास्थळ नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत रहाटगांव असल्यामुळे पोलिसांनी हे प्रकरण नांदगाव पोलिसांना वर्ग केले. आरोपी बद्दल पिडितेला विस्तृत माहिती नव्हती. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

## ऑनलाइन फसवणुक प्रकरणात

खात्यात ट्रान्सफर झाल्याचे समोर आले. पोलिसांनी तातडीने बँकेला पत्र पाठवून संबंधित खाते गोठवले. न्यायालयीन आदेशानंतर २१ ऑक्टोबर २०२५ रोजी २४ लाखांची रक्कम परत मिळवून ती पीडित वकिलांच्या खात्यात जमा करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त रमेश धुमळ, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे आणि पोलिस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रियंका कोटावार, अनिकेत कासार, उल्हास तवलारे, निखिल माहुरे, अपर्णा बांडे, अनिकेत वानखडे, करण बोरकुटे आणि सुषमा आठवले यांच्या पथकाने केली.

## वेदिका भडके सनदी

विनोद पदावर कार्यरत असताना त्यांचे कुटुंब नागपुर येथील त्रिमूर्ती नगर जवळील द्रोणाचार्य नगर येथे सहकुटुंब वास्तव्यास होते. परंतु वेगवेगळया भागात त्यांच्या बदल्या झाल्यामुळे वेदिकाचे प्राथमिक शिक्षण अकोला येथे पार पडले तर माध्यमिक शिक्षण नागपुर येथे पुर्ण केले. त्यांनतर तिने सनदी लेखापालची परिक्षा दिली आणि त्या परिक्षेत ती उत्तीर्ण झाली. पुढे वेदिका सनदी लेखापाल पदी सराव म्हणून काम पहाणार असल्याचे तिने बोलताना स्पष्ट केले. तिने या यशाचे श्रेय आई वडीलांसह तिची आजी सुधाताई भडके व सर्व कुटुंबातील सदस्य, शिक्षक तसेच मित्र मैत्रिणी यांना दिले आहे.

# शबरी आदिवासी विकास महामंडळाच्या कर्जमंजुरीचे आदेश वितरीत

**अमरावती/प्रतिनिधीः-** शबरी आदिवासी विकास वित्त व विकास महामंडळ मर्यादित, शाखा कार्यालय, धारणी यांच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त योजनांच्या जाणिव जागृती पंधरवड्याच्या निमित्ताने आज दि. ३ नोव्हेंबर रोजी कर्जमंजुरी आदेश वितरण करण्यात आले.

आमदार तथा सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे संचालक केवलराम काळे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्याहस्ते लाभार्थींना कर्जमंजुरीचे आदेश वितरीत करण्यात आले. यावेळी शबरी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

यावेळी श्रीराम बेलसरे, रवि सावलकर, आदित्य आडे, दिलीप भिलावेकर, गणेश दहिकर, सुनिता कास्देकर, ताप्तीपुत्र शेतकरी



उत्पादक कंपनी यांना कर्ज मंजुरीचे आदेश देण्यात आले. कार्यक्रमाला शाखा व्यवस्थापक गणेश साखरे, उपप्रादेशिक व्यवस्थापक एम. आर. वानखडे, प्रकल्प समन्वयक सचिन देशमुख, कार्यकारी लेखापाल सागर शेळके आदी उपस्थित होते.

## ४१ हजारांची लाच मागणारा

यांनी बुलढाणा येथील जुन्या सरकारी विश्रामगृहाच्या नूतनीकरणाचे वर्क ऑर्डर देण्याचे आमिष दाखवून आणखी ६ हजारांची मागणी केली. या प्रकाराने संशयित तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर ४ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावती येथील सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाच्या विभागीय कार्यालयात पडताळणी मोहिम राबवण्यात आली, यावेळी आरोपी अभियंता लाच मागत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर एसीबीने सापळा रचून पाटील यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या कारवाईनंतर आरोपीविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक मारुती जगताप आणि अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक सुनील किनगे, मंगेश मोहोड, अधिकारी युवराज राठोड, वैभव जायले आणि चालक गोवर्धन नाईक यांच्या पथकाने केली.

## कापूस खरेदीची मर्यादा

लादणे योग्य नाही. बाजारातील दर घसरलेले असतांना शेतकऱ्यांच्या हाती शासकीय खरेदी हीच दिलासा देणारी संधी आहे. त्यामुळे सीसीआय ने तात्काळ प्रति एकर खरेदी मर्यादा वाढवून १२ क्विंटल करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, संचालक भारत आठवले, एकनाथ देशमुख , अजय देशमुख, अमोल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवशक्ती नगरातील क्रीडा

यावे. नागरिकांच्या आरोग्याशी हयगय सहन केली जाणार नाही. मनपा प्रशासनाने कचऱ्याची विल्हेवाट व नियोजन करण्यासंदर्भात तात्काळ प्रभावी उपाय योजना करावी अन्यथा सोमवार १० नोव्हेंबर रोजी मैदानातील कचरा उचलून मनपा परिसरात टाकण्याचा इशारा प्रहारच्या वतीने महानगर प्रमुख बंटी रामटेके, छोटू महाराज बसु, गोलू पाटील, श्याम इंगळे आणि इतरांनी दिला आहे.

## नवसारी मैदानावरील क्रीडा

आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अटी शर्तीचा भंग करून शासनाची फसवणूक करून आरक्षित जागेवर १४ नोव्हेंबर २०१४ रोजी में. एस. नवीन बिल्डर्स आणि अष्टविनायक कन्स्ट्रक्शन यांनी सदर जागेवर बिओटी तत्त्वावर स्पोर्ट कॉम्प्लेक्स व कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधण्याचा करारनामा केला. जिल्हाधिकाऱ्याची अधिकृत परवानगी न घेता आरक्षण बदलण्याची कार्यवाही केली नाही. तत्कालीन अधिकाऱ्यांनी शासनाची देखील कुठलीही परवानगी घेतली नाही. सदर संकुला मधील दुकाने ५५ लाख डिपॉझिट घेऊन भाडेपट्ट्याने दिले आहेत. मागील अंदाजे ११ वर्षापासून महापालिकेचे तत्कालीन मनपा आयुक्त डोंगरे, निपाणे, आष्टीकर ,देविदास पवार, कलंत्रे यांनी शासनासोबत पत्र व्यवहार करून सदर जागेवर कमर्शियल मार्केट मध्ये १५ टक्के कमर्शियल बांधकाम करण्याची परवानगी मागितली होती. परंतु शासनाने महानगरपालिकेला सदर जागेवर कमर्शियल बांधण्याची परवानगी दिली नाही. गेल्या दोन वर्षापासून महापालिकेच्या लोकशाही दिनी लेखी तक्रार करूनही मुन्ना राठोड यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे मागील वर्षी विधानसभेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी नागपूर हिवाळी अधिवेशन मध्ये तक्रार केली. त्या तक्रारीचे गांभीर्य घेऊन लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावेळी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेमध्ये उच्चस्तरीय समिती गठित करून प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. हे प्रकरण धोरणात्मक असल्यामुळे महापालिकेच्या सभेत ठराव मंजूर घेणे आवश्यक असते. काही दिवसापासून सदर बी ओ टी धारकाला व कंत्राटदाराला भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू झाली आहे. जर नवीन बिल्डर व अष्टविनायक कन्स्ट्रक्शनचा करारनामा रद्द केला नाही तर समितीच्या वतीने महापालिकेच्या विरोधात पोलिस तक्रार देण्यात येईल असेही मुन्ना राठोड यांनी नमूद केले. पत्रकार परिषदेत युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ देखील उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जिल्हाधिका–यांच्या अध्यक्षतेखाली निवडणुकीच्या नियोजनाचे टप्प्यानिहाय सादरीकरण

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**आगामी जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक नियोजनाचे टप्प्यांनिहाय सादरीकरण करण्यात आले. हे सादरीकरण सकाळी ९.४५ ते ११ या वेळेत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पार पडले.**



या बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, नगरप्रशासन सहआयुक्त बी.डी. बिक्कड, सर्व उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, सर्व तहसीलदार व न.प.मुख्याधिकारी, निवडणूक शाखेचे अधिकारी उपस्थित होते.या दरम्यान जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी निवडणुकीच्या सर्व टप्प्यांचे सादरीकरण काळजीपूर्वक ऐकून घेतले व आवश्यक सूचना दिल्या. निवडणूक कार्यक्रमाचे नियोजन, मतदार सूचीचे अद्ययावतीकरण, मतदान केंद्रांची अंतिम यादी, साहित्य वितरण, प्रशिक्षण सत्रांचे नियोजन, तसेच मतदान प्रक्रियेतील अचूकता आणि पारदर्शकता या सर्व घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांमध्ये जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी म्हटले की, निवडणूक प्रक्रिया ही अत्यंत संवेदनशील व जबाबदारीची आहे. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या भूमिकेत शंभर टक्के तत्परता दाखवून काम करावे. कोणत्याही टप्प्यावर दुर्लक्ष होऊ नये, हे सुनिश्चित करावे. या निवडणुकीपूर्व तयारीसाठी प्रशासन सज्ज असून, सर्व टप्प्यांवर समन्वय आणि शिस्तबद्धता राखत कार्यवाही करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सौरभ गट्टानी यांची जेसीआई इंडिया, आंचल- १ ३ अध्यक्षपदी निवड

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**



जेसीआई वाशिम सिटीचे सक्रिय व कार्यतत्पर सदस्य जे.सी. सौरभ गट्टानी यांची जेसीआई इंडिया – आंचल १३ चे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. या मानाच्या नियुक्तीमुळे वाशिम शहरात आनंदाचे वातावरण आहे.

जेसीआई वाशिम सिटी अध्यायाची स्थापना सन २०१२ मध्ये करण्यात आली. या अध्यायाचे प्रथम अध्यक्ष वन सुनील चांडक, उपाध्यक्ष श्री रुपेश लड्ढा, तर सचिव राजेश बदर होते. गेल्या १३ वर्षांत जेसीआई वाशिम सिटीने सामाजिक व लोकहिताचे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.

सौरभ गट्टानी हे २०१३ साली जेसीआई वाशिम सिटीशी सदस्य म्हणून जोडले गेले. त्यांची कार्यशैली, नेतृत्वगुण, यांचे कौतुक करून २०१९ साली त्यांची अध्याय अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यानंतर ते सातत्याने आंचल कार्यकारिणीत महत्त्वाच्या पदांवर कार्यरत राहिले असून, गेल्या ६ वर्षांपासून विविध आंचल कार्यक्रमांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यकुशलतेचा व समर्पणाचा सन्मान म्हणून यावर्षी त्यांची जेसीआई इंडिया – आंचल १३ अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. आंचल अध्यक्षपद हे अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाते. या पदावरून आंचलातील सर्व शाखांचे मार्गदर्शन व नेतृत्व केले जाते. ही निवड अमरावती येथे झालेल्या दोन दिवसीय बैठकीत पार पडली. अमरावती येथील 'सिकची रिसॉर्ट' येथे झालेल्या या बैठकीस राष्ट्रीय व राज्यस्तरीय अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या निवड प्रक्रियेत वाशिममधील कार्यकर्त्याची निवड होणे ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.या प्रसंगी सुनील चांडक, रुपेश लड्ढा, राजेश बदर, पंकज बाजड, जितेंद्र बोडस, संदीप बहेती, सुमित खत्री, महेश गुप्ता, शैलेश सोमानी, रवि बुंदे, पंकज बांडे, आदी उपस्थित होते.

# थकित अनुदानामुळे 'शिवभोजन थाळी योजना' अडचणीत

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**




महाराष्ट्र शासनाच्या जनकल्याणकारी 'शिवभोजन थाळी योजने' संदर्भात मागील सात ते आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या अनुदानाच्या देयकांच्या तातडीने निकाली काढणीसाठी 'महाराष्ट्र शिवभोजन चालक कृती समिती, वाशीम जिल्हा' यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात येणार आहे.

शासनाच्या या योजनेचा उद्देश म्हणजे गरीब, कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू वर्गाला स्वस्त दरात पौष्टिक व सन्मानपूर्वक भोजन उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, मागील अनेक महिन्यांपासून अनुदान न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक शिवभोजन केंद्र चालकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. केंद्र चालविण्यासाठी लागणारे भाडे, गॅस, भांडी, साहित्य आणि कर्मचाऱ्यांचे वेतन या सर्वांचा खर्च केंद्रचालकांना स्वतःच्या खिशातून उचलावा लागत आहे. परिणामी अनेक केंद्रे बंद होण्याच्या मार्गावर आहेत तर काही केंद्रे तोट्यात चालविली जात आहेत.

यासंदर्भात कृती समितीने सांगितले की, 'शासनाकडून नियमित अनुदान मिळाले नाही, तर शिवभोजन थाळी योजना कोलमडण्याची शक्यता निर्माण होईल. गरीब आणि विद्यार्थ्यांसाठी ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे शासनाने तातडीने थकबाकी अनुदानाचे वितरण करून योजना सुरळीत सुरू ठेवावी.'

या निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाचे लक्ष वेधण्यात येणार असून, अनुदान वितरित न झाल्यास पुढील आंदोलनाचा इशारा समितीने दिला आहे.

# भीम आर्मी जिल्हा वाशिमची आढावा बैठक संपन्न; नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशीम जिल्ह्यात भीम आर्मीची जिल्हास्तरीय आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान भीम आर्मी जिल्हा अध्यक्ष ॲड. सचिन पट्टेबहादूर यांनी भूषविले, तर प्रमुख उपस्थिती म्हणून आजाद समाज पार्टी महिला आघाडी विदर्भ अध्यक्षा सौ. रचनाताई कोकरे या उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी कार्ययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांवर संघटनेने अधिक प्रभावीपणे कार्य करावे, यावर भर देण्यात आला. यावेळी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. भीम आर्मी शहर अध्यक्षपदी प्रदीप कांबळे ऊर्फ बाबा पी. के., तर भीम आर्मी युवा आघाडी जिल्हा अध्यक्षपदी शंकरभाऊ लोखंडे यांची निवड करण्यात आली.

# शेतकरी पुत्राची MPSC त गरुडझेप
## गणेशपुरचे डॉ. गोविंद सावके राज्यातून १०३ वे!

**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**



तालुक्यातील गणेशपुर येथील एका अल्प भूधारक शेतकरी कुटुंबातील सुपुत्राने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, प्रथम वर्ग अधिकारी म्हणून निवड झाली आहे. गणेशपुर येथील रहिवासी गजानन सावके यांचे चिरंजीव डॉ. गोविंद सावके यांनी या परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून १०३ वा रँक मिळवला आहे. डॉ. गोविंद सावके यांचे वडील गजानन सावके हे अल्प भूधारक शेतकरी असून, सामान्य परिस्थितीतून गोविंद यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यात त्यांचे कौतुक होत आहे.

डॉ. सावके यांनी मिळवलेल्या या देदीप्यमान यशानंतर त्यांचे शेलुबाजार येथे आगमन होताच, सामाजिक कार्यकर्ते, समाज बांधव तसेच मित्रमंडळींकडून जल्लोष करण्यात आले. उपस्थितांनी गुलाल उधळून तसेच फुलांचा वर्षाव करून डॉ. सावके यांचे जंगी स्वागत केले. एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलाने मिळवलेल्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक नवा आदर्श निर्माण झाला असून, त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# स्व.प्रकाश डहाके वनपर्यटन केंद्र नव्या रुपात

**तब्बल ८ महिन्यांनी दार उघडले, पर्यटकांची अलोट गर्दी**

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**



येथील स्व.प्रकाशदादा डहाके निसर्ग वनपर्यटन केंद्र नुकतेच नव्या रूपात दाखल झाले असून, सायंकाळी पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहे. पर्यटकांसाठी वन पर्यटन केंद्र हे तब्बल आठ महिन्याच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर नव्या दमाने सुरू झाले.त्यामुळे केंद्रात पर्यटकांची प्रचंड गर्दी होत आहे. दिवाळीच्या सुट्ट्या असल्यामुळे गर्दीत भरच पडत आहे.

कारंजा येथील स्व.प्रकाशदादा डहाके वनपर्यटन केंद्र सुमारे २५० एकरांमध्ये विस्तारीत असून, त्याचा ताबा वनविभागाकडे आहे. हे उद्यान कारंजेकरांसाठी प्राणवायू म्हणून ओळखले जाते. या वनपर्यटन केंद्रात चालणे व धावण्यासाठी अनेक रस्ते, कसरतीसाठी खुले जीम आहे. सोबतच लहान मुलामुलींना विरंगुळा मिळावा यासाठी छोटे उद्यान असून , त्यामध्ये खेळण्यासाठी अनेक साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे वनपर्यटन केंद्रात सकाळ व सायंकाळच्या सत्रात पर्यटकांची तथा आरोग्यप्रेमींची गर्दी असते.

आमदार सईताई डहाके व परिवाराच्या प्रयत्नाने या वनपर्यटन केंद्राच्या विकासासाठी शासनाकडून ११ कोटी रूपयांचा निधी मंजूर होऊन तो वन विभागाला प्राप्त झाला होता. या निधीतून पर्यटन केंद्रात नव्याने रस्ते, पूल, वाहनतळ, स्वच्छतागृहे निर्माण करण्यात आले. सोबतच या उद्यानात आधुनिक व आकर्षक पद्धतीने नव्याने दोन ठिकाणे विकसित करण्यात आली. यानिमित्ताने मागील अनेक महिन्यापासून सायंकाळी वनपर्यटन केंद्र बंद होते. यादरम्यान पर्यटकांच्या मनोरंजनासाठी अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. हे काम पूर्ण होताच मागील २५ ऑक्टोबर पासून वनपर्यटन केंद्र रात्रीच्या वेळी नव्या रूपात पर्यटकांच्या सेवेत रुजू करण्यात आले. अत्याधुनिक सुविधेमुळे नवीन विकसित परिसर दिव्यांनी उजळून जात आहे. त्यामुळे पर्यटकांची गर्दी वाढली आहे. स्व.प्रकाशदादा डहाके वन पर्यटन केंद्र नव्या रूपात दाखल होताच वन विभागाने तिकिटाचे दर दुपटीने वाढविले आहे. आता प्रौढ व्यक्तीसाठी २० तर लहान मुलामुलींसाठी १० रुपये तिकीट दर निश्चित करण्यात आले आहे. दर वाढूनही गर्दी कमी हटत नसल्याचे चित्र आहे. दुसरीकडे वाढत्या गर्दीमुळे खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने हाऊसफुल झाली आहे. विरंगुळा अनुभवण्यासाठी शेकडोच्या संख्येत पर्यटक दुचाकी, चारचाकी वाहनाने येत येत आहेत. त्यामुळे या वन पर्यटन केंद्राच्या प्रवेश द्वारासमोर वाहनाच्या रांगा लागत आहे.

# किरण चौधरी यांची अमरावती विभागाच्या मतदार नोंदणी कार्यकारी प्रमुखपदी नियुक्ती

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**



इंग्रजी शाळा शिक्षक संघटना विदर्भ अध्यक्ष तसेच मेस्टा (MESTA) अमरावती विभागाचे कार्याध्यक्ष किरण चौधरी यांच्यावर आणखी एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषद अमरावती विभाग शिक्षक आमदार निवडणूक २०२५-२६ साठी त्यांची अमरावती विभागाच्या मतदार नोंदणी कार्यकारी प्रमुख म्हणून २ नोव्हेंबर रोजी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती मेस्टाचे राज्य उपाध्यक्ष तसेच शिक्षक मतदार नोंदणी अमरावती विभाग प्रमुख अभिजीत देशमुख यांनी, मेस्टाचे डॉ. संजयराव तायडे पाटील यांच्या आदेशाने प्राप्त अधिकारांचा वापर करून केली. या नियुक्तीमुळे संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. किरण चौधरी हे गोविंद इंग्लिश स्कूल, कारंजा येथील मुख्याध्यापक तसेच अध्यक्ष आहेत. शांत, संयमी, अभ्यासू व मितभाषी स्वभावामुळे ते संघटनेतील पदाधिकाऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरले आहेत. यापूर्वीच त्यांच्यावर मेस्टाचे विदर्भ अध्यक्ष आणि अमरावती विभाग कार्याध्यक्ष अशी जबाबदारी सोपवण्यात आली होती. आता नव्या नियुक्तीमुळे त्यांच्या कार्यकौशल्याला अधिक बळ मिळाल्याचे मानले जात आहे. या नियुक्तीनिमित्त झालेल्या सभेला मेस्टाचे राज्य उपाध्यक्ष अभिजीत देशमुख, संतोष गाडेकर (विदर्भ अध्यक्ष), सुभाष बोरकर (जिल्हाध्यक्ष मेस्टा), उदय इंगळे (उपाध्यक्ष), आनंद इंनानी (सहसचिव), सचिन महाकाळ (मंगरुळपीर तालुका अध्यक्ष), दानमोडे सर तसेच वाशीम जिल्हा व तालुका मेस्टाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

याच वेळी विभाग व जिल्हा पातळीवरील पदाधिकारी नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. आत्माराम चव्हाण – वाशीम जिल्हा मेस्टा मतदार नोंदणी प्रमुख, उदय इंगळे, डॉ. जगदीश काळे – जिल्हा समन्वयक प्रमुख, अनिल चव्हाण – मानोरा तालुका प्रमुख, अमोल राऊत – कारंजा तालुका प्रमुख

उद्धव राऊत, प्रकाश मुंधारे – मंगरुळपीर तालुका प्रमुख, नागेश धांडे, प्रवीण साखरकर – रिसोड तालुका प्रमुख, प्रशांत लोखंडे – मालेगाव तालुका प्रमुख, कृतिक चव्हाण – मालेगाव तालुका समन्वयक, दत्ता घुगे – समन्वयक मेडशी, श्रीनिवास व्यास, अनिल धूमकेकर – वाशीम तालुका व शहर प्रमुखया सर्व नियुक्त्यांमुळे संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल.


## जिल्हा जलसंधारण विभाग
## जिल्हा परिषद (ल.पा.) वाशिम

ई- निविदा सूचना क्रमांक ०२ / सन २०२५-२६

**पहिली वेळ**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) वाशिम हे कामांच्या ब-१ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागवीत आहे. कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे.

विस्तृत निविदा http://mahatender.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास दिनांक ०३/११/२०२५ पासून उपलब्ध आहे.

**स्वा**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**(ल.पा.) जिल्हा परिषद, वाशिम**


# कन्याभ्रूणहत्या रोखण्यासाठी प्रशासनाचे मोठे पाऊल

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**कन्याभ्रूणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.**

**जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली, आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.**

**पीसीपीएनडीटी आणि एमटीपी कायद्यांतर्गत डिकॉय प्रकरणांसाठी मदत करणाऱ्या माहितीदारास मिळणार एक लाख रुपयांचे बक्षीस; निरागसता साठवू मनात, मुलींचं स्वागत करू घरात**



ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभ्रूणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आज दि.३१ ऑक्टोबर रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, डॉ. अनिल कावरखे जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी, डॉ. जया बिबेकर, डॉ. उज्वला गिऱ्हे, डॉ. बाहेती, ॲड. मोहन गंगावणे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया आदी उपस्थित होते.

गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्याअंतर्गत राबविलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास एक लाख रुपये बक्षीस दिले जाईल. माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधिताची ओळख सुरक्षित राहील.नोंदणीसाठी http://amchimulgi.maha.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.

**संपर्कासाठी** : राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५, १०४ वर संपर्क साधता येईल. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून या योजनेचा लाभ घ्या — तुमच्या माहितीद्वारे एका चिमुकल्य

कन्याभ्रूणहत्या ही केवळ कायद्याचा विषय नाही, तर ती सामाजिक चेतनेची गरज आहे. नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा बेकायदेशीर कृत्यांची माहिती प्रशासनाला दिल्यास एका मुलीचा जीव वाचतो आणि समाजाचा दृष्टिकोन बदलतो. जिल्हा प्रशासन या मोहिमेला प्रभावीपणे राबविण्यास कटिबद्ध आहे.

**योगेश कुंभेजकर,**
जिल्हाधिकारी

.................

कन्याभ्रूणहत्या थांबवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बक्षीस योजनेद्वारे जनजागृती होऊन लिंगनिषेधास प्रतिबंध घालण्यास मदत होईल. प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही सहकार्य करावे.

**अर्पित चौहान,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

................

लिंग निवड चाचण्या आणि कन्याभ्रूणहत्या या गंभीर सामाजिक समस्या आहेत.

वाशिम जिल्ह्यात राबविण्यात येणारी बक्षीस योजना ही स्त्री भ्रूणाच्या संरक्षणासाठी प्रभावी पाऊल आहे. नागरिकांनी अशा प्रकरणांची माहिती दिल्यास प्रशासन तातडीने कारवाई करेल.

**डॉ. अनिल कावरखे,**
जिल्हा शल्य चिकित्सक

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३५ ■ मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आर्थिक अपहार करणारा प्रभागसंघ व संबंधितांवर कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष देवळी येथील महिला शक्ती प्रभागसंघ गुंजखेडा येथे झालेल्या आर्थिक अपहार प्रकरणात संबंधितांवर मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी कठोर कारवाई केली आहे. चौकशीनंतर या प्रभागसंघात १ कोटी २१ लाखाचा अपहार आढळून आला होता.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष देवळी येथे महिला शक्ती प्रभागसंघ गुंजखेडा अंतर्गत तत्कालीन संघटीका वहिदा शेरमोहम्मद शेख यांनी आर्थिक अपहार केल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांना प्राप्त झाली होती. त्यानंतर त्यांनी अपहाराची चौकशी करण्यासाठी समिती गठीत केली होती. चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावरुन मुद्दल रुपये ५८ लाख ४ हजार ८७१ रुपये व व्याज ६३ लाख ६१ हजार २१० रुपये असे एकुण १ कोटी २१ लाख ६६ हजार ८१ रुपये इतक्या रक्कमेचा आर्थिक अपहार उघडकीस आला. त्यामध्ये ४० लाख १८ हजार रुपये अपहार व्यक्तीने भरणा केलेला आहे. आर्थिक अपहार उघडकीस आल्याने पराग सोमण यांनी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी, संबंधित सर्व समुदाय संसाधन व्यक्तींवर कठोर कारवाई केलेली आहे.

अपहार प्रकरणातील तत्कालीन संघटीकेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रभागसंघाचे अध्यक्ष, सचिव व तालुका व्यवस्थापक यांना सूचित करण्यात आले असून सदर प्रक्रिया पुलगाव पोलिस स्टेशन अंतर्गत कार्यवाही चालू आहे. संबंधित प्रभागाचे प्रभाग समन्वयक सचिन मगरे व प्रभागसंघ व्यवस्थापक ममता काबंळे यांना तत्काळ पदावरुन कमी करण्यात आलेले आहे. संबंधित प्रभागाच्या प्रकरणात समाविष्ठ असलेल्या सारिका वासनिक, सपना पर्बत, पुजा काळे, वैशाली काळे, पद्मा मस्तूद, बेबीताई खडसे, सिंधू केवट अशा ७ समुदाय संसाधन व्यक्तींना तत्काळ पदावरुन कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

संबंधित तालुका व्यवस्थापक गोपाल साबळे आणि तत्कालीन तालुका व्यवस्थापक वर्षा कोहळे यांचे दोन मागील करार कालावधीतील वार्षिक मानधनवाढ कायमस्वरुपी थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच यापुढे शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्यास संबंधित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई करण्याचे आदेश पराग सोमण यांनी दिले आहे, असे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या जिल्हा अभियान सहसंचालक तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ यांनी कळविले आहे.

## केनियन खरेदीदाराची वायगाव हळदीला भेट; निर्यातीला नवी दिशा

**समुद्रपूर जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील भौगोलिक नामांकन प्राप्त वायगाव हळदीच्या निर्यात क्षमतेकडे केनियाच्या खरेदीदाराचा नजराणा वळला आहे. एक्झिम फार्मर इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (इंघ्ण्ण्घ) च्या निर्यात-प्रमोशन मोहिमेअंतर्गत केनियातील आंतरराष्ट्रीय खरेदीदार श्रीमती पेरिस यांनी २ नोव्हेंबर रोजी वायगावसह तालुक्यातील हळद प्रक्रिया उद्योगांना भेट देत स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधला. स्मार्ट प्रकल्पांतर्गत क्रिशोन्नती शेतकरी उत्पादक कंपनी वायगाव येथे वायगाव हळदीच्या उत्पादन, प्रक्रिया व निर्यात संधींवर सविस्तर चर्चा झाली. संचालक पितांबर घुमडे, नितेश थुल, आशिष ठाकरे आणि जयश्री दिने यांनी या प्रसंगी कंपनीच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. किशोर घुमडे यांच्या हळद लागवडीची आणि प्रक्रिया गोडाऊनची पाहणी करण्यात आली.यानंतर विदर्भ नैसर्गिक शेतमाल किसान प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, खैरगाव येथील प्रक्रिया केंद्रासह शोभा गायधने यांच्या हळद शेतीची पाहणी करण्यात आली. एफपीओ संचालक सुरज मोहिते आणि विठ्ठल कारवठकर यांनी चालू कामकाजाचा आढावा सादर केला.डॉ. नलिनी भोयर, प्रकल्प संचालक आत्मा वर्धा, यांनी वायगाव हळदीचे वैशिष्ट्य, आरोग्य विषयक फायदे आणि जागतिक बाजारपेठेतील संधी यांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच, रोहन झंझारे (स्मार्ट नोडल अधिकारी, वर्धा), स्वप्नील तोरणे (उपविभागीय कृषि अधिकारी, हिंगणघाट), आणि बारेकर मॅडम (स्मार्ट वर्धा) उपस्थित होते.या भेटीचे नियोजन तालुका कृषि अधिकारी श्रीमती हर्षदा खेकारे, सचीन सुतार, सचीन वाळके, अनिकेत भूसंगे, राजेश चांदेवार आणि सुधीर हिवसे यांनी केले.



संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वयन एक्झिम शेतकरी भारतीय वाणिज्य व उद्योग मंडळाचे अध्यक्ष प्रवीण सी. वानखडे यांनी केले.या भेटीमुळे वायगाव हळदीच्या जागतिक बाजारपेठेतील प्रवेशाला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## धावत्या कारने घेतला पेट : सुदैवाने कारमधील कुटुंब बचावले

**समुद्रपूर जनमाध्यम:** तालुक्यातील वर्धा मार्गावरील शेडगाव-मांडगाव रस्त्यावर धावत्या कारने अचानक पेट घेतला. सुदैवाने कारमध्ये प्रवास करणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्य सुरक्षित बचावले असून वाहन पूर्णतः जळून खाक झाले. ही घटना सोमवार ३ रोजी सकाळी घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील अशोक वनकर (६७), पत्नी नीलिमा (५०) हे एम. एच. २९ बी. डब्ल्यू. ६१०९ क्रमांकाच्या मारुती अर्टीका कारमध्ये जाम येथे सीएनजी भरल्यानंतर वर्धेकडे जात होते. सकाळी ९ वाजताच्या सुमारास शेडगाव-मांडगाव मार्गावर धावत्या कारच्या इंजिनमधून धूर निघू लागल्याचे चालकाच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी कार थांबवून सर्वांना खाली उतरवले. काही क्षणांतच कारने पेट घेतला आणि पाहता पाहता कार जळून राख झाली. नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळ गाठून आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत वाहन पूर्णतः जळून गेले होते. वाहनामध्ये महत्त्वाच्या कागदपत्रांची फाईल सुद्धा जळून खाक झाली. घटनास्थळी काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला होता. जाम महामार्ग पोलिसांनी दुर्घटनाग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

### ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानची जिल्हास्तरीय बैठक

## ज्येष्ठ नागरिकांनी संघटित राहणे गरजेचे - दत्ता मेघे

**वर्धा जनमाध्यम -** आपल्या कुटुंबातील सदस्य, मुले, नातवंडे कामानिमित्त गावाबाहेर किंवा देशाबाहेर असतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या अडीअडचणीत मदतीसाठी ज्येष्ठ नागरिकच धावून येऊ शकतात. म्हणूनच, ज्येष्ठ नागरिकांनी संघटित राहणे आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष, माजी खासदार दत्ता मेघे यांनी सावंगी येथे आयोजित प्रतिष्ठानच्या जिल्हास्तरीय बैठकीत केले.

या बैठकीला प्रतिष्ठानचे सचिव डॉ. राजू मिश्रा, मनोहर पंचारिया, रमेश खडसे, दामोधर राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठांचे जीवन आनंददायी करण्यासाठी तालुका आणि गावपातळीवर ज्येष्ठ नागरिक मंडळे स्थापन करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. राजू मिश्रा यांनी केले. या मंडळांना ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानसोबत संलग्न केल्यास दैनंदिन अडीअडचणी सोडविण्यापासून तर ज्येष्ठांची सहल, मनोरंजनाचे कार्यक्रम, वैद्यकीय उपचार, शासकीय योजना अशा विविध गोष्टींचा लाभ त्यांना देता येईल, असे डॉ. मिश्रा यांनी सांगितले. बैठकीला तालुका संयोजक यशवंत होले (आष्टी), अरूणा चाफले (कारंजा), दिलीप अग्रवाल (देवळी), अमीन ओलिया (पुलगाव), प्रदीप बजाज व गीता राऊत (वर्धा), अशोक कलोडे (सेलू), डॉ. विजय पर्वत (हिंगणघाट) यांच्यासह विनोद पवार, प्रफुल बाहे, अविनाश नानोटे, रवींद्र गोसावी, विजय उगले, सिंधू गोयनका, कमलाकर सायंकार, श्याम शंभरकर, सारिका नासरे, विक्रम कुरळकर, सुनील ठाकरे, जिल्हा निरीक्षक कालिंदिनी ढुमणे, ॲड. किरण मोहिते आदींनी उपस्थित राहून आपले विचार मांडले.

## निष्पक्ष न्यायप्रणाली आणि निवडणूक आयोगच लोकशाही वाचवू शकतील- निरंजन टकले

**वर्धा जनमाध्यम :** देशातील लोकशाहीची घडी कोलमडण्या मागे तिन्ही प्रमुख स्तंभांची निष्पक्षता धोक्यात आल्याची स्थिती निर्माण झाली आहे. कायदे मंडळ, न्यायपालिका आणि प्रशासकीय यंत्रणा आपल्या जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करत असल्यास लोकशाहीवर गदा येते. अशा परिस्थितीत न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगच लोकशाही टिकवू शकतात, असे मत ज्येष्ठ शोधपत्रकार निरंजन टकले यांनी व्यक्त केले.ते प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमालेच्या १८ व्या पुष्पात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी सध्याच्या राजकीय आणि प्रशासकीय धोरणांवर भाष्य करत शासनाने जनआंदोलनांना रोखण्यासाठी लादलेल्या दडपशाहीवर तीव्र टीका केली. सार्वजनिक वाचनालय येथे झालेल्या या कार्यक्रमाला वर्धेकर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य डॉ. अंबादास मोहिते होते. पदवीधर मतदारसंघाचे आमदार अभिजित वंजारी, अधिवक्ता प्रकाश मेघे, श्रीमती सविता मेघे आदी मान्यवर उपस्थित होते. रवी मेघे यांनी सर्व पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉ. मोहिते यांनी केंद्राच्या नवीन जनसुरक्षा विधेयकाला पूर्णतः चुकीचे ठरवत त्यावर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य दिनकरराव मेघे स्मृती ट्रस्टचे सचिव डॉ. अभ्युदय मेघे यांनी केले होते. अंशूदादा मेघे यांनी प्रास्ताविक केले, पल्लवी पुरोहित यांनी सूत्रसंचालन केले, तर आभारप्रदर्शन किरण मेघे यांनी केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनीषा मेघे, आभा मेघे, माधुरी मेघे, राजेंद्र कोरडे, अमर दीक्षित, गणेश कपडे आणि सुशांत वानखेडे यांचे विशेष सहकार्य लाभले.




## कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकले आष्टी शहर

### -निधीअभावी गाड्या ठप्प, नगर पंचायतीवर नागरिकांचा संताप

**आष्टी जनमाध्यम :** आष्टी नगर पंचायत स्वच्छता व्यवस्था कोलमडल्याने शहर आज अक्षरशः कचऱ्याच्या विळख्यात सापडले आहे. तीन दिवसांपासून कचरा उचलणाऱ्या गाड्या बंद असल्याने मुख्य बाजारपेठ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर, नगर पंचायत कार्यालय आणि रहिवासी वसाहतीत कचऱ्याचे ढीग साचले आहेत.नगर पंचायतकडे निधी उपलब्ध नसल्याने संबंधित कंत्राटदार एकलव्य ट्रेडिंग कंपनी, देवळी यांनी १ नोव्हेंबरपासून कचरा उचलणे थांबवले. त्यामुळे शहरभर दुर्गंधी पसरली आहे आणि नागरिक त्रस्त झाले आहेत.ग्रामपंचायत काळात केवळ १४ लाखांच्या खर्चात चालणारे हेच काम नगर पंचायत झाल्यानंतर तब्बल एक कोटी रुपयांवर गेलं, तरीसुद्धा सेवा ठप्प पडल्याने नागरिक संतापले आहेत.



कचराकुंड्या ओसंडून वाहत आहेत, रस्त्यांवर कचरा साठल्याने डास-माशांचा त्रास वाढला आहे.जिल्हा परिषद शाळेच्या प्रवेशद्वारा समोरच कचऱ्याचे ढीग पडले तर नगर पंचायत कार्यालयचा परिसर देखील घाणीत गुरफटला आहे. नागरिकांनी तातडीने कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

> नगर पंचायतकडे कंत्राटदाराला देण्यासाठी निधीच नसल्याने कचरा उचलणे थांबले आहे. निधी उपलब्ध होताच कामकाज सुरू केले जाईल.
>
> **श्री. गडलिंग, मुख्याधिकारी, आष्टी नगर पंचायत**

## दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना २५ वर्षे मोफत वीज

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील दारिद्र्य रेषेखालील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीजग्राहकांना पुढील २५ वर्षे मोफत वीज मिळण्यासाठी राज्य शासनाने स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजना सुरू केली असून, महावितरणने या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानामुळे लाभार्थी ग्राहकांना अत्यल्प हिस्सा भरून सौर ऊर्जेचा प्रकल्प बसविता येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवली जात असून, सौर ऊर्जेच्या वापरातून शाश्वत वीजपुरवठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.या योजनेअंतर्गत राज्यातील पाच लाख घरांना लाभ मिळणार असून, त्यापैकी १.५४ लाख दारिद्र्यरेषे खालील तर ३.४५ लाख आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांचा समावेश आहे. प्रत्येक पात्र घरावर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात येईल. या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट विजेची निर्मिती होईल. त्यामुळे घरातील आवश्यक वीज वापर भागून उर्वरित विजेची विक्री महावितरणला करता येईल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपयांचे अनुदान केंद्रातून मिळते. त्यासोबत राज्य शासनाकडूनही अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना केंद्र सरकारकडून ३० हजार व राज्य सरकारकडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांना केंद्राच्या अनुदानासोबत राज्य शासनाकडून दहा हजार रुपये मिळतील. अनुसूचित जाती-जमातीच्या ग्राहकांना राज्य शासन १५ हजार रुपयांचे अनुदान देणार आहे.महावितरणच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, पात्र वीजग्राहकांना लवकरच या योजनेचा लाभ मिळणार असल्याची माहिती कंपनीने दिली आहे.

### बोरगावात संतापाचा स्फोट

## सुपारी माता रस्त्याची अवस्था दयनीय, प्रशासन झोपेत

**वर्धा जनमाध्यम :** बोरगाव मेघे ते सावंगी मेघे जोडणारा सुपारी माता मंदिराचा मुख्य रस्ता सोमवारी नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत झाल्यानंतर आंदोलनाचे रणांगण बनला. अनेक वर्षे खड्ड्यांत हरवलेला हा रस्ता आणि प्रशासनाची अवस्था याविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंबिका हिंगमिरे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी सोमवारी रस्ता रोको करून संताप व्यक्त केला.विकासाच्या गप्पा मारणारे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी रस्त्यावरचे चिखलाचे डोह पाहायला तयार नाहीत. जिल्हा परिषदेने २० लाख रुपयांचा निधी मंजूर करूनही कामाचा वर्क ऑर्डर दिवाळीपासून फाइलमध्येच अडकलेला आहे. दिवाळी संपली, पण काम सुरू झाले नाही हेच जनतेचे दुःख अखेर आज संतापाच्या ज्वाळा रस्त्यावर पेटल्या. आंदोलनादरम्यान ग्रामविकास अधिकारी गायकवाड यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आठ दिवसांत काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. हे आश्वासन नागरिकांनी तात्पुरते मान्य केले पण आठ दिवसांत रस्ता काम सुरू न झाल्यास नागरिकांचे पुढचे आंदोलन अधिक तीव्र होईल, असा इशारा अंबिका हिंगमिरे यांनी दिला.या वेळी सीमा कोटनाके, रुपाली केचे, सीमा मसराम, कृष्णा सायंकार, वृषिकेश साटोने, प्रवीण बोटकुळे, आमिर दिघोळे, वैशाली डोळसकर आदींसह मोठ्या संख्येने महिला व युवक रस्त्यावर उतरले. प्रशासनाची झोप तोडण्यासाठी नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागणे हे शासनाच्या निष्क्रीयतेचे लक्षण असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली.



> गेले चार महिन्यापासून सुपारी माता मंदिर ते सावंगी मेघे रस्त्याच्या कामाचे नूतनीकरण करण्यासाठी जिल्हा परिषद कडे पाठपुरावा करीत आहे.मात्र प्रशासन वेळकाढूपना करीत आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याचा निषेध म्हणून आज रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.येत्या आठ दिवसांत काम सुरू करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.
>
> **-अंबिका हिंगमिरे,** सामाजिक कार्यकर्त्या वर्धा

### अंबिका हिंगमिरे यांच्या नेतृत्वात झाले रस्ता रोको आंदोलन


**CHANGE IN NAME**

My Name in my Pan Card, Aadhar card and Educational Record is Snehal Petkar and my name in my Previous passport is Snehal Raju Petkar which must be changed to Snehal Petkar.

Address: Grampanchayt Devali Road Ward No.1, Wardha Maharashtra - 442001



## कार्यालय ग्रामपंचायत सावंगी (मेघे) ता.जि.वर्धा

### निविदा सूचना / सन २०२५-२६

सर्व नोदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, **ग्रामपंचायत सावंगी (मेघे)** येथे २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नागरी सुविधा अंतर्गत मंजूर प्राकलनानुसार बांधकाम करीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून **बी-१** पध्दतीप्रमाणे (२ लिफाफ्यामध्ये) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | योजनेचे नांव | तां.मा.क्र. | अंदाजित निविदा (शेड्यूल-बी-प्रमाणे) | अनामत रक्कम | कोरी निविदा किंमत | काम करण्याचा कालावधी | निविदा विक्री व स्विकृती कालावधी | निविदा विक्री उघडण्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ता.वर्धा ग्रा.पं.सावंगी (मेघे) वार्ड क्र.६ अंतर्गत बालाजी मंदिर ते लांबट पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नागरी सुविधा योजना | 351/DE/2025-26 | ३,१६,९७६/- | ३,१६९/- | १०००/- | ६ महिने | ४.११.२०२५ ते १०.११.२०२५ | ११.११.२०२५ (शक्य असल्यास) किंवा मासिक सभा |
| २. | ता.वर्धा ग्रा.पं.सावंगी (मेघे) अंतर्गत वार्ड क्र.३ विठ्ठल तिमांडे येथील यवतमाळ रोड पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम | | 350/DE/2025-26 | १,१५,२९१/- | ११५३/- | १०००/- | ६ महिने | | |

निविदा मंजूर करण्यास अंतिम अधिकार ग्रा.पं.कडे राहील. तथा कोणतेही कारण न देता प्राप्त निविदा पैकी एखादी बाब किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार ग्रा.पं.कडे राखून ठेवत आहे व अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. या निविदा संबंधित सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत सावंगी (मेघे) येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

स्वा/-
प्रशासक,
ग्रामपंचायत सावंगी (मेघे),
ता.जि.वर्धा

स्वा/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत सावंगी (मेघे),
ता.जि.वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त




## माय भारत ॲपद्वारे युवकांना रोजगाराच्या संधी

### केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया

**मुंबई/प्रतिनिधी :** युवकांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी योगदान द्यावे. तसेच, युवकांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी माय भारत पोर्टल मार्गदर्शक ठरणार आहे. या पोर्टलद्वारे युवकांना नोकरीच्या संधी, कौशल्य विकास, ऑनलाईन स्पर्धा तसेच काम आणि विचारांची देवाणघेवाण यासंबंधीची सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. युवकांनी डिजिटल उपस्थिती वाढवून या पोर्टलचा सक्रिय वापर करावा, असे आवाहन केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी केले. गृह मंत्रालयाच्या सहकार्याने युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य पोलीस यांच्या समन्वयाने पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, येथे १७ वा आदिवासी युवा आदान-प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमात विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण विभाग) प्रवीण कुमार पडवळ, जिल्हा युवा अधिकारी (माय भारत, मुंबई) अनुप इंगोले, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य रवींद्र दळवी आणि ज्युडो कार्यक्रम समन्वयक यतिन बांगरा आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचा उद्देश आदिवासी युवकांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन अनुप इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत करण्यात आले. निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त फुलसिंग पवार यांनी प्रेरणादायी व्याख्यान दिले. या वेळी गृह मंत्रालयाच्या अवर सचिव पिंकी राणी, तसेच पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सहभागी युवक-युवतींनी अभिप्राय सत्रात आपले अनुभव सांगितले. यावेळी सांस्कृतिक व भाषण स्पर्धेतील विजेत्यांचा चषक देउन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम आदिवासी युवकांमध्ये राष्ट्रीय एकता, नेतृत्व व सांस्कृतिक जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने यशस्वीरीत्या संपन्न झाला, अशी माहिती जिल्हा युवा अधिकारी अनुप इंगोले यांनी दिली.



## दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदी हेमराज बागुल

**नवी दिल्ली :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदाचा कार्यभार संचालक हेमराज बागुल यांनी नुकताच स्वीकारला. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी हेमराज बागुल यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत केले. महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनिषा पिंगळे यावेळी उपस्थित होत्या. हेमराज बागुल महासंचालनालयातील ज्येष्ठ संचालक असून ते मंत्रालयातील मुख्यालयात संचालक (प्रशासन) या पदावर कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तसेच महासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभाग आणि छत्रपती संभाजीनगर - लातूर विभागाच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शासकीय सेवेत येण्यापूर्वी बागुल यांनी पत्रकारितेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. तसेच साहित्यविषयक विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनीही बागुल यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीरण योजनेच्या लाभासाठी 14 पर्यंत अर्ज करा

**मुंबई :-** अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खासगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी ड?. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अनुदानासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील संस्थांनी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी संजयकुमार शिंदे यांनी केले आहे. योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना दिला जाणार आहे. ज्या मदरसांना मदरशांमध्ये गुणवत्तापुर्ण शिक्षण देणा-या केंद्र शासनाच्या योजनांतर्गत लाभ मिळाला आहे अशा मदरशांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. अधिक माहितीसाठी ०२२ ६९४०३३७०/१९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अयोध्या जगाची आध्यात्मिक राजधानी करण्याचे ध्येय

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा निर्धार

**लखनौ /वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अयोध्या महायोजना २०३१ संदर्भातील प्रस्तावांचा आढावा घेताना म्हटले की, अयोध्येचा विकास हा भव्यता, आस्था आणि आधुनिकता या तिन्हींचा समन्वय असावा. या महायोजनेचे उद्दिष्ट अयोध्येला सुनियोजित, सुव्यवस्थित आणि शाश्वत विकासासह जगातील आध्यात्मिक राजधानी म्हणून स्थापित करण्याचे आहे. त्यांनी अधिका-यांना निर्देश दिले की विकास प्रकल्पांमध्ये अयोध्येची सांस्कृतिक ओळख, धार्मिक गौरव आणि पर्यावरणीय संतुलन यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जावे.



मुख्यमंत्री योगी यांनी सांगितले की अयोध्या व्हिजन २०४७ अंतर्गत अयोध्येला जागतिक आध्यात्मिक, ज्ञान आणि उत्सव नगरी म्हणून विकसित करण्यात येईल. यासोबतच तीर्थपर्यटनासाठी अनुकूल पायाभूत सुविधा, ऐतिहासिक परिक्रमा मार्ग, हेरिटेज वॉक, हिरव्या उर्जेवर आधारित स्मार्ट सिटी आणि आधुनिक नागरी सुविधा या योजनेत समाविष्ट आहेत. बैठकीत दिलेल्या माहितीनुसार, अयोध्या महायोजना २०३१ चे उद्दिष्ट शहराला ग्लोबल स्पिरिच्युअल आणि टुरिझम डेस्टिनेशन म्हणून विकसित करण्याचे आहे. या योजनेत अयोध्या विकास क्षेत्राला १८ झोनमध्ये विभागून संतुलित जमिनीचा वापर सुनिश्चित करण्यात आला आहे. योजनेनुसार, २०३१ पर्यंत अंदाजे २४ लाख लोकसंख्या लक्षात घेउन ५२.५६% क्षेत्र निवासी, ५.११% व्यावसायिक, ४.६५% औद्योगिक, १०.२८% सार्वजनिक उपयोगासाठी, १२.२०% वाहतुकीसाठी, आणि १४.३१% हरित व खुल्या क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्री यांनी औद्योगिक आणि मिश्र वापराच्या क्षेत्रात वाढ करण्याचे तसेच पंचकोसी आणि चौदाकोसी परिक्रमा मार्गांवर विविध क्रियांसाठी जमीन आरक्षित करण्याचे निर्देश दिले.




## एअर इंडियाच्या विमानाची इमर्जन्सी लँडिंग

### सर्व प्रवासी सुखरूप, सॅन फ्रान्सिस्कोहून दिल्लीला येत होते विमान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सॅन फ्रान्सिस्कोहून दिल्लीला जाणा-या एअर इंडियाच्या विमानाचे मंगोलियाची राजधानी उलानबातर येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. उड्डाणादरम्यान संशयास्पद तांत्रिक बिघाड झाल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे एअरलाइनने म्हटले आहे.एअर इंडियाने एक्स वर सांगितले २ नोव्हेंबर रोजीचे फ्लाइट एआय१७४ उलानबाटारमध्ये सुरक्षितपणे उतरले आहे. आता कर्मचारी तपास करत आहेत. आम्ही सर्व प्रवाशांना मदत करण्यासाठी आणि ते शक्य तितक्या लवकर त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचतील याची खात्री करण्यासाठी काम करत आहोत. विमानात किती प्रवासी संख्या होती, हे अद्याप समजू शकलेली नाही. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालय मंगोलियामध्ये अडकलेल्या प्रवाशांना मदत पुरवण्यासाठी काम करत आहे. यापूर्वी, १७ ऑक्टोबर रोजी इटलीच्या मिलानहून दिल्लीला जाणारे एअर इंडियाचे विमान तांत्रिक समस्येमुळे रद्द करण्यात आले होते. १९ ऑक्टोबर रोजी एका विशेष विमानाने २५६ अडकलेल्या प्रवाशांना परत आणण्यात आले.

## गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी

### महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत.



महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी ‘आदिशक्ती अभियानाला’ गती

### महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक महिलेच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणा-या आदिशक्ती अभियानाला राज्यभर गती मिळत आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील ३५१ तालुका आणि २६ हजार ५९ ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, या समित्यांचे प्रशिक्षण आणि अभियानाची कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. आदिशक्ती अभियान व पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी विभागनिहाय आढावा घेतला. या बैठकीस विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सहसचिव वि.रा. ठाकूर, सहआयुक्त राहूल मोरे, अवर सचिव सुनील सरदार उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागाचे आयुक्त, एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे, तसेच छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण, नागपूर आणि अमरावती विभागांचे विभागीय आयुक्त सहभागी झाले होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून महिला बचतगटांचे सक्षमीकरण, महिला सुरक्षा व न्यायप्रवेश, आरोग्य व पोषण जनजागृती, शैक्षणिक व व्यावसायिक उन्नती, नेतृत्व विकास आणि सामाजिक सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, या अभियानाच्या माध्यमातून महिलांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबतची जनजागृती ग्रामस्तरावरील प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचविणे हे ध्येय ठेवले आहे. जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समित्यांचे प्रशिक्षण तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी संबंधित विभागीय आयुक्तांना दिले. ग्रामसमृद्धी योजनेच्या धर्तीवर ग्रामसभांमध्ये या अभियानाच्या प्रसारासाठी कार्यवाही करावी, तसेच योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## विश्वविजय महिला क्रिकेट संघाचे क्रीडा मंत्र्यांकडून अभिनंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** संपूर्ण देशभरात भारतीय नागरिक तिरंगा हातात घेउन अभिमानाने विश्वविजयाचा आनंद साजरा करत आहेत. भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहास रचत विश्वविजेतेपद पटकावले असून, त्यांच्या या अभूतपूर्व यशाने संपूर्ण देशाचे मस्तक अभिमानाने उंचावले असल्याच्या भावना व्यक्त करत क्रीडा मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी विश्वकप विजेत्या महिला क्रिकेट चमूला शुभेच्छा दिल्या. राज्याचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी संघाचे अभिनंदन करताना म्हटले की, संधी मिळाली तर भारतीय मुली जग जिंकू शकतात, हे आपल्या महिला खेळाडूंनी सिद्ध करून दाखवले आहे. क्रिकेट इज अ जेंटलमन्स गेम ही संकल्पना आज आपल्या रणरागिणींनी मोडीत काढली, असे सांगत ते म्हणाले की या विजयी महिलांनी जगाला दाखवून दिलं की जेंटलवूमन मध्ये देखील क्षमता, गुणवत्ता आणि संघर्षपूर्ण समानता आहे. भारतीय स्त्रिया आता चूल आणि मूल यापलीकडे जाउन कर्तृत्वाच्या नव्या सीमारेषा गाठत आहेत. महिला क्रिकेट संघाच्या या विजयाने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की भारतीय मुली कोणत्याही अर्थाने मुलांपेक्षा कमी नाहीत . त्या अधिक जिद्दी, जाज्वल्य आणि समर्थ आहेत, असेही क्रीडामंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले.



## सर्व्हायकल कॅन्सर फ्री पुणे अभियानाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व्हायकल कॅन्सर फ्री पुणे अभियानाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डा. राजेश देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे जिल्हा आरोग्य अधिकारी डा. रामचंद्र हंकारे, उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव डा.संतोष भोसले, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, जीविका फाउंडेशन, युनियन बँक, अमेरिका - इंडिया फाउंडेशन या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.स्त्रियांमध्ये होणारा सर्व्हायकल कॅन्सर हा देशातील दुस-या क्रमांकाचा मोठ्या प्रमाणात आढळून येणारा आजार आहे. एचपीव्ही लस आणि वेळेवर केलेल्या स्क्रीनिंगमुळे या आजाराला प्रभावीपणे प्रतिबंध करता येउ शकतो. त्यामुळे या आजाराच्या बाबतीत महिलांमध्ये जनजागृती करणे आणि लसीकरणाचे प्रमाण वाढवण्याची गरज आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यावेळी अभियानासंदर्भात सादरीकरण केले.या प्रकल्पाचा उद्देश सर्व्हायकल कॅन्सरच्या संदर्भात प्रतिबंध,जनजागृती, लसीकरण आणि समायोजित स्क्रीनिंगच्या माध्यमातून कॅन्सरचं संपूर्णपणे निर्मूलन करणं हा आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये लसीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आशा सेविकांकडून घराघरात जाउन महिला वर्गासाठी सर्व्हायकल कॅन्सर स्क्रीनिंगची माहिती दिली जाणार आहे,अशी माहिती यावेळी देण्यात आली.



## आरोग्य क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्यास प्राधान्य-अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** कोरोनाच्या काळात आपल्याला आरोग्य विभाग वैद्यकीय शिक्षण विभाग, तेथील पायाभूत सुविधांचे महत्त्व लक्षात आले. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय तसेच त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास राज्य शासनाने प्राधान्य दिले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रभादेवी येथील इंडियन डेंटल असोसिएशनच्या सभागृहात इंडियन डेंटल असोसिएशन, पुणे जिल्हा परिषद आणि जिल्हा शासकीय रुग्णालय, औंध यांच्यात औंध येथे बहुउद्देशीय दंत रुग्णालय आणि संशोधन केंद्र स्थापनेबाबत सामंजस्य करार करण्यात आला.




यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शुभ्रा नंदी, डेंटल असोसिएशनचे सचिव डॉ.अशोक ढोबळे, उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव डॉ. संतोष भोसले उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, हा सामंजस्य करार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेतील नवा अध्याय आहे. या केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात दंत विषयक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. आरोग्य म्हणजे केवळ कोणत्याही आजारावर उपचार नसून प्रतिबंध, जनजागृती, शिक्षण आणि सेवा या चार घटकांचा योग्य समन्वय आहे. या केंद्राच्या स्थापनेतून हे ध्येय साध्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) ही संस्था देशभरातल्या दंतवैद्यांच्या सशक्त नेटवर्कमुळे अगदी गावखेड्यात दातांच्या आरोग्याविषयी जागृती करत आहे,असे सांगत उपमुख्यमंत्री पवार यांनी डेंटल असोसिएशनच्या कार्याचे कौतुक केले.

## मुलांमधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी एसओपी तयार करणार-सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ राहावे आणि सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा विनासायास उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासन सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अनेक उपक्रम राबवत आहे. याच पार्श्वभूमीवर मुलांमधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना (एसओपी) तयार करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

मुलांमधील असंसर्गजन्य आजार एक वाढती समस्या या विषयी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. कार्यशाळेस युनिसेफचे संजय सिंह, आरोग्य सेवा संचालक, विजय कंदेवाड (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरू मृदुला फडके, युनिसेफचे मंगेश गाधारी उपस्थित होते. काही लोकप्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, सुदृढ बालके आपल्या देशाचे भविष्य असून त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक करणे आहे. मुलांमधील असंसर्गजन्य आजार याविषयी अधिक व्यापक जनजागृती होण्यासाठी अधिवेशन काळात विधिमंडळ सदस्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली जाईल असेही त्यांनी सांगितले. राज्याचा आरोग्य विभाग व युनिसेफ यांच्यामार्फत आरोग्यदायी बालपण ही संकल्पना राबविण्यात येणार असून यामध्यो लोकप्रतिनिधींचा सहभाग व पुढाकार महत्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, आधुनिक जीवनशैली, बदलती आहार पद्धती आणि शारीरिक निष्क्रियतेमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक ताणतणाव यासारखे असंसर्गजन्य आजार वाढत आहेत. यावर मात करण्यासाठी समाज, शाळा, पालक आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी महत्वाची आहे. आपल्या भागातील प्रत्येक बालक सुदृढ, निरोगी राहावे, ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असावे यासाठी आरोग्य विभागामार्फत राबविण्यावर येणारे उपक्रम यशस्वीपणे राबिण्यावर भर देण्यात यावा. तसेच शाळांमध्ये नियमित आरोग्य तपासणी शिबिरे, तंदुरुस्त बालपण मोहीम आयोजन, पौष्टिक आहार आणि शारीरिक क्रियाशीलतेबाबत जनजागृती आणि मुलांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे, असे आवाहन त्यांनी केले. आधुनिक जीवनशैली, असंतुलित आहार आणि शारीरिक निष्क्रियतेमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा, मधुमेह, अस्थमा, मानसिक आरोग्य या समस्या आणि रक्तविकार झपाट्याने वाढत आहेत. भावी पिढीसाठी ही चिंतेची बाब असून लोकप्रतिनिधी, शाळा, पालक सामाजिक संघटनांनी एकत्र येउन या आजाराविरुद्ध यशस्वी लढा देण्यात पुढाकार घ्यावा. महाराष्ट्र राज्याने बाल मृत्यूदर कमी करण्यात देशाला दिशा दिली आहे. त्याचप्रमाणे बालकामधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी राज्याने दिशादर्शक असे काम करावे, अशी अपेक्षा युनिसेफचे संजय सिंह यांनी यावेळी व्यक्त केली.




किशोरवयीन मुलांमध्ये अस्थमा, लठ्ठपणा, मधुमेह वाढत आहे असे सांगून ड?. मृदला फडके म्हणाल्या असंसर्गजन्य आजारांबाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. असंसर्गजन्य आजारात किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी युनिसेफचे ड?. मंगेश गाधारी आणि आरोग्य सेवा संचालक यांनीही मनोगत व्यक्त केले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# डबल धमाका

रविवारचा दिवस भारतीयांकरीता 'सुपर संडे' ठरला. कारण टीम इंडियाच्या दोन्ही संघांनी क्रिकेटचे मैदान गाजवले. पुरूषांच्या तिसऱ्या टी ट्वेंटीत अटीतटीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला धूळ चारली तर महिला क्रिकेट संघाने एकदिवसीय विश्वचषकात द. आफ्रिकेवर ५२ धावांनी मात करत प्रथमच विश्वचषक पटकाविला. होबार्टला झालेल्या रोमांचक सामन्यात भारतीय फलंदाजांनी निकराची लढत देत सामना खेचून आणला तर महिला संघाने दमदार फलंदाजी आणि गोलंदाजीत कमाल करत पहिलावहिला विश्वचषक जिंकला आहे. विजेतेपद पटकावून ५२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला क्रिकेट विश्वचषकावर आपले नाव कोरले. या अंतिम सामन्यात भारताने २९९ धावांचे ठेवलेले आव्हान दक्षिण आफ्रिकेला पेलवले नाही आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद २४६ धावा करून तंबूत परतला.या क्षणाची प्रतीक्षा १४५ कोटी भारतीय गेली अनेक दशके करत होता. रविवारी नवीमुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने विजय मिळवून देशवासीयांना दिवाळीची अनोखी भेट देतील याची चाहूल शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यातच लागली होती. ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेमिना रॉड्रिग्स हिने अविश्वसनीय खेळ करून भारताला अंतिम फेरीत पोहचवले. अंतिम फेरीत भारताचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होता. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतीय संघ विश्चषकावर नाव कोरेल असा विश्वास देशवासीयांना होताच. वास्तविक भारतीय महिला क्रिकेट संघ २००५ मध्ये (यजमान; दक्षिण आफ्रिका) पहिल्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचला होता, पण तेव्हा ऑस्ट्रेलियाने भारताला नमवले होते. होता आणि भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २०१७ मध्ये भारतीय संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला होता (यजमान; इंग्लंड) तेव्हा इंग्लंडने विजेतेपद पटकावून बाजी मारली होती. त्यामुळे महिलांच्या या पहिल्यावहिल्या विश्वचषक अंतिम विजेतेपदाला विशेष झळाळी प्राप्त झाली आहे.हरमनप्रीत कौरच्या फौजेने महिनाभर चालू असलेली विश्वविजयाची मोहीम फत्ते केली आहे.कपिल देव (१९८३), महेंद्रसिंग धोनी (२००७, २०११), रोहित शर्मा (२०२४) या दिग्गजांच्या मांदियाळीत आता हरमनप्रीत कौरच्या नावाचा समावेश झाला आहे. नवी मुंबईतील नेरुळ येथील डी. वाय. पाटील अकादमी स्टेडियमवर ३५०००हून अधिक चाहत्यांच्या साक्षीने हरमनप्रीतने जेतेपदाचा करंडक उंचावला आणि देशभरातल्या क्रिकेटचाहत्यांच्या डोळ्याच्याकडा पाणावल्या. क्रिकेटच्या मैदानावर नेहमीच पुरुषांचे वर्चस्व राहिले आहे. ऑक्टोबर २०२१ पर्यंत क्रिकेटमध्ये बॅट्समन, थर्ड मॅन आणि नाईटवॉचमन हे शब्द वापरले जात होते. काळ बदलला आहे, प्रत्येक क्षेत्राप्रमाणे, भारतीय महिलांनी केवळ क्रिकेटच्या मैदानावरच स्वतःला सिद्ध केले नाही तर दोनदा क्रिकेट विश्वचषक फायनलमध्ये पोहोचून जगभरात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.आता तर विश्वकप जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. खेळाडू, प्रशिक्षक, प्रशासक आणि प्रेरणेचा स्त्रोत म्हणून क्रिकेटमध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. त्या मैदानावर कामगिरी करतात, खेळाच्या विकासात प्रशासक म्हणून योगदान देतात आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देतात. भारतीय महिलांची ही कामगिरी महिला क्रिकेट संघासाठी संजीवनी देणारी ठरणार आहे कारण आपल्या देशात महिला क्रिकेटला कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. हा विश्वचषक असल्याने याचे थेट प्रेक्षपण केले गेले मात्र द्विपक्षीय मालिका टीव्हीवर दाखवल्या जात नाहीत. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात हेच या विश्व विजयाने दाखवून दिले आहे.थोडक्यात काय तर आपल्या दोन्ही संघांनी सुपर संडेला सुपरहीट कामगिरी करून देशवासियांच्या अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. आपल्या महिला संघाची कामगिरी पाहता 'म्हारी छोरीयां किसी छोरोंसे कम नहीं' असे म्हणावे लागेल. यापूर्वीही भारतीय महिला संघाने फायनल पर्यंत मजल मारली होती, मात्र प्रयत्न अपुरे पडले होते. यावेळी मात्र जिद्दीने पेटून उठत त्यांनी इतिहास घडवला आहे. २०२५ चा हा दिग्विजय महिला क्रिकेटच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरला आहे. जेवढे महत्त्व १९८३ च्या विजयाचे आहे, अगदी तितकेच महत्त्व २०२५ च्या विजयाचे आहे. भारतीय क्रिकेटच्या दोन्ही संघाचे हार्दिक अभिनंदन.

# प्रशांत किशोर 'किंगमेकर' ठरतील?

**बिहारमध्ये मागील विधानसभा निवडणुकीत एनडीए विजयी झाली असली, तरी महागठबंधनपेक्षा त्यांचे मताधिक्य एक टक्केच जास्त होते. अशा स्थितीत जनसुराज पक्षामुळे मतविभाजन झाल्यास त्याचा फटका कुणाला बसणार, हे पाहावे लागेल. या पक्षाला १०-१५ जागा मिळाल्या, तर प्रशांत किशोर त्यांची इच्छा नसली, तरी 'किंगमेकर' बनू शकतात.**



बिहारमधील विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे. या निवडणुकीत केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि विरोधकांची इंडिया आघाडी यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. विशेषतः बिहारच्या सत्तेवर एकछत्री अमल निर्माण केलेल्या सुशासनबाबू नितीश कुमारांसाठी यंदाची निवडणूक अधिक महत्त्वाची असणार आहे. त्याचबरोबर बिहारवर एकेकाळी हुकूमत गाजवणाऱ्या लालूप्रसादांचे चिरंजीव तेजस्वी यादव यांची वैयक्तिक प्रतिष्ठाही या निवडणुकीत पणाला लागलेली आहे. अलीकडेच बिहार विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत महागठबंधनने पत्रकार परिषद घेत तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले आहे.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते अशोक गेहलोत यांनी ही घोषणा केली आहे. वर्षभरापूर्वी झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करणे टाळले होते; पण बिहारमध्ये हा पायंडा मोडत तेजस्वींच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या काही दशकांचा बिहारमधील राजकारणाचा इतिहास पाहिल्यास एनडीए आणि महागठबंधन यांच्यातील द्विध्रुवीय संघर्षामध्येच विधानसभा निवडणुका पार पडत असत; परंतु यंदा या संघर्षाला तिसरा कोन प्राप्त झाला असून, तो निर्णायक ठरण्याच्या शक्यता व्यक्त होत आहेत. हा कोन म्हणजे राजकीय रणनीतीकार म्हणून सबंध देशभरात ख्यातकिर्त झालेल्या प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाचा. या पक्षाने बिहारच्या रणसंग्रामात उडी घेतल्यामुळे काही महिन्यांपूर्वीपर्यंत एकतर्फी वाटणारी ही लढाई आता अधिक औत्सुक्याची बनली आहे.

जनसुराज पक्षाची स्थापना नुकतीच २ ऑक्टोबर २०२४ रोजी झाली असली, तरी उमेदवारांची नावे जाहीर करण्यात त्यांनी बाजी मारली आहे. इतर राजकीय पक्ष अजूनही मित्रपक्षांमधील जागावाटपावर चर्चा करत असताना प्रशांत किशोर यांनी ९ ऑक्टोबर रोजी २६ जिल्ह्यांतील ५१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. विविध पक्षांना निवडणुकीच्या राजकारणाचे व्यवस्थापन करून विजयापर्यंत घेऊन जाण्याचा फॉर्म्युला सांगणाऱ्या प्रशांत किशोर यांना बिहारच्या सामाजिक गुंतागुंतीची पूर्ण जाण आहे आणि आपल्या पहिल्या यादीतून त्यांनी आपले आकलन किती प्रगल्भ आहे, याचे दर्शनही घडवले आहे. या यादीमध्ये १७ अत्यंत मागासवर्गीय वर्ग (ईबीसी), ११ इतर मागासवर्गीय वर्ग, ७ मुस्लीम, अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव जागा आणि ९ सामान्य वर्गाचा समावेश आहे.

बिहार जात सर्वेक्षण २०२३ नुसार या राज्यात ईबीसींचे प्रमाण सर्वाधिक आहे आणि ओबीसींचे प्रमाण २७.१२ टक्के आहे. त्यामुळे या दोन्ही वर्गांना सर्वाधिक उमेदवार प्रशांत किशोर यांनी दिले आहेत. तसेच १७.७ टक्के असलेल्या मुस्लिमांना ७ उमेदवार देण्यात आले आहेत. लोकसंख्येच्या १५.५२ टक्के असलेल्या सामान्य वर्गाला ९ जागा देण्यात आल्या आहेत. महिला उमेदवारांची संख्या खूपच कमी आहे. तथापि, उमेदवारांची संपूर्ण यादी जाहीर झाल्यानंतर हे प्रमाण बदललेले असेल.

गतवर्षी जनसुराज पक्षाची स्थापना करणाऱ्या प्रशांत किशोर ऊर्फ 'पीके' यांनी बिहारच्या राजकारणाचे व्याकरण बदलण्याची सुरुवात पूर्वीच केली आहे. पीके यांनी असा युक्तिवाद केला आहे की, काही हजार कुटुंबांनी बिहारच्या संपूर्ण राजकारणावर कब्जा केला आहे. एकतर ते राजकीय वंशावळीतील आहेत, माफिया (बाहुबली) आहेत किंवा फक्त एका राजकीय पक्षातून दुसऱ्या राजकीय पक्षात उड्या मारणारे आहेत किंवा प्रचंड भ्रष्ट, घोटाळेबाज आणि गंभीर गुन्ह्यांचे आरोप असणारे आहेत. सुशासनासाठी तिसरा पर्याय हवा असेल, तर या सर्वांपासून अलिप्त असणारा उमेदवार असायला हवा अशी मांडणी त्यांनी केली आणि त्यांचे जवळजवळ सर्व ५१ उमेदवार त्या निकषांना पात्र ठरणारे आहेत. यामध्ये नवीन चेहरे, डॉक्टर, प्रामाणिक पोलिस अधिकारी, प्रामाणिक नोकरशहा, शिक्षणतज्ज्ञ, वकील, गायक, ट्रान्सजेंडर आणि व्यावसायिक आहेत. यापैकी कोणाचेही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही, कोणीही पक्ष बदलणारे नाही, कोणीही राजकीय घराण्यातील नाही. एकमेव अपवाद म्हणजे बिहारच्या माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांची नात जागृती ठाकूर यांचा समावेश, ज्यांना जननायक (लोकांचा नायक) म्हणूनही ओळखले जाते.

प्रशांत किशोर बिहारच्या राजकारणात गेल्या तीन दशकांपासून प्रभुत्व मिळवलेल्या जातीय गणितांपलीकडे जाण्याचा प्रयत्न करताहेत. प्रशासन, प्रामाणिकपणा आणि कामगिरी यांच्या आधारे मतदारांनी आपल्या लोकप्रतिनिधींची निवड करायला हवी, यासाठी ते प्रबोधन करताहेत. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी, २०१५ मध्ये नितीश कुमार आणि अनेक स्थानिक नेत्यांसाठी विजयी अभियान रचलेल्या किशोर यांना आता आपला फॉर्म्युला स्वतःसाठी वापरायचा आहे. यासाठी त्यांनी ६६५ दिवसांत २,६०० किलोमीटरची पदयात्रा केली आहे. यादरम्यान त्यांनी २३५ ब्लॉक्स आणि सुमारे २,७०० गावांना भेट दिली. या दौऱ्यातून बिहारमधील मतदारांना तिसरा पर्याय हवा आहे, असा दावा ते करताहेत. प्रशांत किशोर यांनी बिहारच्या प्रतिष्ठित राजकीय कुटुंबांपासून स्वतःला दूर ठेवले आहे. त्यांच्यावर घराणेशाहीचा किंवा भ्रष्टाचाराचा डाग नाही. 'आपल्या मुलांच्या भविष्याकरिता मतदान करा' असा नारा ते देताहेत.

बेरोजगारी, स्थलांतर आणि नितीश कुमार व लालूप्रसाद यांच्या वारशामुळे उद्भवलेल्या असंतोषात वाढलेल्या तरुण, महत्त्वाकांक्षी मतदारांमध्ये त्यांचे आवाहन प्रभावी ठरताना दिसत आहे. त्यांची प्रचार पद्धती वेगळी आहे. मोठ्या रॅली किंवा सेलिब्रिटी समर्थनावर अवलंबून न राहता सूक्ष्म संवादावर लक्ष केंद्रित करण्यावर त्यांचा भर आहे. बिहारमधील अनेक मतदार नितीश कुमार यांच्या कोलांटउड्या आणि राजदच्या घराणेशाहीला कंटाळल्या आहेत. जनसुराज पक्ष त्यांच्यासाठी तिसरा आश्वासक पर्याय असल्याचे किशोर यांचे म्हणणे आहे.

किशोर यांनी अलीकडेच उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि इतर भाजप नेत्यांविरुद्ध थेट भ्रष्टाचाराचे आरोप केले असून यामुळे बिहारच्या राजकीय चर्चेत जोश निर्माण केला आहे. अर्थात, निवडणुका जिंकण्यासाठी केवळ प्रभावी मांडणी किंवा सर्वदूर असणारी ओळख पुरेशी नसते. पदयात्रेमुळे त्यांना सबंध बिहारमध्ये ओळख मिळाली; परंतु बूथ एजंट आणि कार्यकर्त्यांची फळी तसेच निवडणुका जिंकण्यासाठीचे नेटवर्क यामध्ये ते अद्याप पिछाडीवर आहेत. यामुळेच २०२४ च्या पोटनिवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला प्रतिजागा ५,००० ते ३७,००० मते मिळाली होती. शहरांतील शिक्षित तरुण किशोर यांच्या दृष्टिकोनाचे कौतुक करतात; पण ते मतांमध्ये परावर्तीत होणार का, हा खरा प्रश्न आहे. सर्वांत कळीचा प्रश्न आहे तो म्हणजे, जनसुराजचे उमेदवार उभे राहिल्याने कोणाच्या मतांचे प्रमाण कमी होणार? एनडीएच्या की महागठबंधनच्या? कारण, त्यावरच बिहारचा निकाल ठरणार आहे. प्रशांत किशोर यांच्या उमेदवारांनी ५ ते ७ टक्के मते घेतली, तरी अनेक संकिर्ण जागांमध्ये ही मते निकाल बदलू शकतात. भ्रष्टाचार आणि बेरोजगारीवर लक्ष केंद्रित करून, त्यांनी एनडीएच्या विकासकथेला आव्हान दिले आहे. ३५ वर्षांच्या भ्रष्ट द्विध्रुवीयतेचा मुद्दा मांडून त्यांनी नितीश आणि लालू यांच्या वारशाला टार्गेट केले आहे. यामुळे जनसुराज पक्षाच्या उमेदवारांमुळे एनडीएविरोधी मतांचे विभाजन होण्याच्या शक्यता अधिक दिसताहेत.

२०२० च्या निवडणुकीत एनडीएने बिहारमध्ये सत्ता काबीज केली असली, तरी महागठबंधनपेक्षा रालोआला मिळालेली मते जेमतेम एक टक्क्यानेच जास्त होती. अशा संकीर्ण मैदानात जनसुराजकडे रालोआविरोधी मतांचा प्रवाह वळल्यास बिहार निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, अपेक्षेपेक्षा जास्त जागा मिळाल्यास प्रशांत किशोर बिहारचे 'किंगमेकर' बनू शकतात का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

जनसुराजने १० ते १५ जागा जिंकल्या, तर ते 'किंगमेकर' बनण्याची शक्यता नाकारता येणार नाही; पण किशोर यांना स्वतःला 'किंगमेकर' बनायचे नाही. एक तर सत्तेत किंवा रस्त्यावर अशी त्यांची भूमिका आहे. सध्या किशोर यांची आक्रमकता दोन्ही गटांना वेगवेगळ्या प्रकारे नुकसान करत आहे. एकीकडे नितीश कुमार यांच्या नेतृत्वाच्या नैतिक वैधतेला त्यांनी तडाखा दिला आहे आणि भाजपच्या राज्य यंत्रणेला भ्रष्टाचार आणि अहंकारी म्हणून लक्ष्य केले आहे, तर दुसरीकडे उद्योजक, तरुण आणि सुधारणावादी राजकारणाच्या बाजूने असणाऱ्या मध्यम मतदारांना खेचून राजदच्या पारंपरिक मतपेटीवर हात मारला आहे.

**डॉ. जयदेवी पवार**

# ...अजुनही व्यवस्थेतील कुंभकर्णींना जाग नाही हेच दुर्दैव !

***महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ च्या निवडणूकी नंतर राजकीय नेत्यांनी जे पेरले त्याची कटूफळ सध्या जागोजागी अनुभवास येताना दिसत आहेत. राज्यात बदलापूरच्या अक्षय शिंदेच्या एनकाऊंटर नंतर शिक्षण विभागाशी संबंधित दुसरे एनकाऊंटर पवई मुंबईत पहायला मिळाले आहे. तर फलटणमध्ये महिला डॉक्टर संपदा मुंडे हिची आत्महत्या नसून हत्या असल्याच्या पुरावे, वस्तुस्थिती आणि संशयापर्यंत आता प्रकरण पोहोचले आहे. साखर कारखान्यावर बीड जिल्ह्यातून येणारे मजूर मुकादम यांचा छळ करण्यासाठी सत्तेचा वापर कसा केला जात होता याच्या कहाण्या समोर येवुनही अजुनही व्यवस्थेतील कुंभकर्णी धुरिणांना जाग येत नाही हेच दुर्दैव म्हणायला हवे.***

चौकशी करण्याआधीच जाहिर क्लीन चिट?

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावेळी पीडित मुलीची आई व मुंडे कुटुंबातील लोकांशी फोनवरून संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. घाबरु नका आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष सरकारवर दबाव आणेल, असे आश्वासन त्यांनी दिले. राहुल गांधी यांनी संपाच्या कुटुंबियांकडून प्रकरणाची संपूर्ण माहितीही घेतली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, डॉक्टर संपदा मुंडे यांच्यावर चुकीचे कामे करण्यासाठी प्रचंड दबाव आणला जात होता, त्यांचा प्रचंड छळ करण्यात आला. नाईक निंबाळकर यांच्या गुंडगिरीच्या अनेक घटना प्रकाशात आल्या आहेत. या घटनेतील कळस म्हणजे चौकशी करण्याआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रणजितसिंह निंबाळकर यांना जाहिर क्लिन चिट देऊन टाकली हे संताप आणणारे आहे. या प्रकरणाची चौकशी फलटण बाहेर करावी, उच्च पदस्थ महिला अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशी मागणी करत डॉ. संपदा मुंडेला न्याय मिळवूण देण्यासाठी दिल्लीत कालच युवक काँग्रेसने आंदोलन केले आहे. महिला काँग्रेसही याप्रकरणी राज्यभर आंदोलन करेल.

### सिलेक्टिव कलेक्टिव आणि एक्टिव-इनॅक्टिव खेळ?

या प्रकरणी महिला आयोगाची भूमिकाही संताप आणणारी असून पीडित कुटुंबाला भेटून त्यांच्याकडून माहिती न घेता त्यांनी आधी पोलीसांची भेट घेऊन सारवासारव करणारी वक्तव्ये का केली हा देखील प्रश्नच आहे. महिला आयोगाने महिलांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन काम करणे गरजेचे आहे पण त्यांनी तसे न करता आरोपींची वकिली केल्याचे समोर आले आहे. डॉ. संपदा मुंडे ज्या समाजाची आहे त्या समाजातील एकही लोकप्रतिनिधी का बोलत नाही? बीड जिल्ह्यात मध्यंतरी काही घटना झाल्या त्यावेळी येथील सत्ताधारी पक्षाचे एक आमदार दररोज प्रसार माध्यमासमोर येऊन भूमिका मांडत होते, आज ते गप्प का आहेत.? संपदाच्या समाजाच्या मंत्री पंकजा मुंडे गप्प आहेत, मुंबईतील एक सामाजिक कार्यकर्त्या अनेक विषयावर आक्रमक भूमिका घेत असतात त्यांनीही या विषयावर सोयीस्कर मौन का बाळगले आहे?. मात्र शिवसेनेच्या सुषमा अंधारे किंवा राष्ट्रवादी शप चे मेहबूब शेख हे दोघे रोज नवे नवे पुरावे समोर आणून यंत्रणेला सवाल करताना दिसत आहेत. सारे काही सिलेक्टिव कलेक्टिव आणि एक्टिव-इनॅक्टिव असा खेळ का सुरू आहे?

### कंत्राटदारांचे एक लाख कोटी रूपये थकले?

दुसरे प्रकरण मुंबईच्या पवईचे आहे, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा ही योजना ज्या कंत्राटदाराकडून चालविण्यात आली असा हा माणूस त्याला त्याचे पैसे मिळावेत म्हणून त्याने चुकीच्या पध्दतीने कृती करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा एनकाऊंटर करुन त्याला संपविण्यात आले. त्याला जिवंत पकडून चौकशी केली असतीतर मागच्या काळातील शिक्षण विभागातील घोळ भ्रष्ट्राचार समोर आले असते? अशी भिती कुणाला वाटली का? कारण राज्यातील कंत्राटदारांचे सुमारे एक लाख कोटी रूपये थकले आहेत त्यांना त्यांचे पैसे सरकारकडून मिळत नसल्याने त्यांच्यावर अनावस्था प्रसंग ओढवले आहेत, हे भयानक वास्तव मात्र दुर्लक्षीत केले जात आहे. एक शिक्षण विभागाचा कंत्राटदार एका प्रकल्पासाठी व्याजाने पैसे काढून खर्च करतो, मात्र योजना सरकारने गुंडाळली पण मागच्या तीन वर्षापासून कंत्राटदारांचे पैसेच दिले नाहीत, रोहित आर्याचे बिल निघत नसल्याने त्यांने सनदशीर सारे मार्ग वापरले अर्ज विनंती भेटीगाठी विनविण्या उपोषण सारे करून झाले. मात्र त्याच्या मागे कर्जदारांचा तगादा लागला असताना त्याचे बिल निघत नव्हते, हे वास्तव काय दर्शवते.

### समूह माध्यमांवरील प्रतिक्रिया

मंत्री दीपक केसरकर, स्वच्छ प्रतिमेचे आयुक्त (ज्यांच्यावर कृषी खात्यातील बदल्यामध्ये १५० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे) सुरज मांढरे यांना तो भेटतो त्यांचे प्रोटोकॉल पण पूर्ण करतो..पण त्याला हे लोक दाद देत नाहीत.. त्यामुळे या लोकांच्या नावाने हा आंदोलन करतो उपोषण करतो.. याला हे सगळ करून त्याचे बिल निघत नाही..शेवटी हा १७ मुलांना बंधक बनवून साऊथ स्टाईल हिरो व्हायला जातो.. त्याला वाटत त्याच बिल निघेल.. पण प्रशासनाच्या दृष्टीने हा मनोरुग्ण...त्याला गोळ्या घातल्या आणि मुलांना सुरक्षित वाचवले.. आता मंत्री आणि अधिकाऱ्यांनी फसवलेला कोणी कॉन्ट्रॅक्टर असा वेडेपणा नाही करणार... माजी मंत्री दीपक केसरकर आणि आयुक्त सुरज मांढरे यांना शांत झोप लागेल एक मनोरुग्ण त्यांना कधीच बिल मागणार नाही..हे सारे प्रकार ज्या सरकारच्या कार्यकाळात झाले ते सरकारच पळवापळवी करुन स्थापन करण्यात आलेले सरकार होते. यापूर्वी याच सरकारमध्ये बदलापूरमध्ये एका शाळेत चिमुकल्यांवर अत्याचार झाले त्यात एक संशयित आरोपी अक्षय शिंदे याला न्यायालयात नेतानाच संपविण्यात आले होते. त्या प्रकरणात शिंदे हा बळीचा बकरा होता आणि बड्या धेंडाना वाचविण्यातसाठीच त्याला संपविण्यात आले का? तो सत्य न्यायालयात सांगेल म्हणून त्याला चकमकीत मारण्यात आले का? अश्या शंका घेण्यात आल्या होत्या. मात्र आता तो विषय मागे पडला. सरकारच्या चुकीच्या आर्थिक नियोजनाचे बळी राज्यातील कंत्राटदार होत आहेत, त्यांना दिलासा देण्यासाठी काही करायचे सोडून आर्या सारखा माणुस जो खोटी गन घेवून मला फक्त उघडपणे काही नेत्यांशी संवाद साधायचा आहे असे म्हणत होता. त्याला त्याने काही नेत्यांना एकस्पोज करू नये म्हणून संपवले असेल का?अश्या शंका आता विचारल्या जात आहेत. मात्र आणखी कुणी असे कृत्य करु नये म्हणून तर त्याचा एनकाऊंटर केला नाही ना? असेही आता विचारले जावू लागले आहे.

### राज ठाकरेंचे आवाहन

या सगळ्या घडामोडीत निवडणुका या पारदर्शक पद्धतीने व्हाव्यात आणि मतदार यादीतील गोंधळ दुरुस्त झालेच पाहिजेत याबद्दल आग्रही असणाऱ्या राजकीय पक्षांनी मुंबईत, १ नोव्हेंबर २०२५ रोजी, 'सत्याचा मोर्चा' काढला होता. त्यावेळेस शरद पवारांपासून ठाकरेबंधू राष्ट्रवादी आणि काँग्रेस सह सर्वच भाजपविरोधी पक्षांच्या मान्यवर नेत्यांनी जमलेल्या नागरिकांना संबोधित केले. या मोर्चानंतरही या सा-या नेत्यांपैकी कुणीच प्रत्यक्षात निवडणूक आयोगाच्या मतदारयाद्यांच्या विहित हरकती-सूचनांच्या कार्यक्रमात हरकती दाखलच केल्या नसल्याचा दावा सत्ताधारी भाजप करत आहे. त्यामुळे मोर्चा किंवा पुढे जावून या नेत्यांकडून मतदानावर बहिष्कारासारखे पाऊल टाकण्यात आले तरी फारसे काही हशील होणार नाही. राज्यात मतदारयाद्या दुरुस्त करुन मगच निवडणूका घ्या या आवाहना नंतर काही महापालिकांमध्ये आता दुबार नावे मृत किंवा जागा सोडून गेलेल्या मतदारांना शोधण्याचा कार्यक्रम राबविला जात आहे. मात्र त्यातून नेमके काय हाती लागणार आहे ते आताच सांगता येणार नाही. कारण राज ठाकरे म्हणाले तसे कल्याण, मुरबाडचे साडेचार हजार मतदार तिकडेही मतदान करतात आणि मलबार हिलमध्येही मतदान करतात. असे महाराष्ट्रात लाखो लोकं असतील. हा फार मोठा विषय नाही, साधी गोष्ट आहे, त्याशिवाय राज ठाकरेंनी पुन्हा EVM मध्ये गडबड असल्याचं मी २०१७ पासून सांगतोय. २३० जागा जिंकूनही महाराष्ट्रात सन्नाटा होता, कारण विधानसभेला निवडून येणाऱ्यांची सोय आधीच झाली होती असे सांगत मतदार याद्यांशिवाय हा मुद्दा जुन्या मार्गावर देखील नेण्याचा प्रयत्न केला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थाच्या गेली पाच वर्षे निवडणूक घेतलेली नसताना मतदारयादी दुरुस्तीसाठी अजून काही दिवस गेले तर असं काय नुकसान होणार आहे? पण जी माणसं मतदारयादीत घुसवली आहेत त्यांचं काय? मात्र जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा दुबार तिबार मतदान करायला आलेल्या लोकांचा चांगला समाचार घेऊन मग त्यांना पोलिसांच्या हवाली करा. हे राज ठाकरे यांचे आवाहन ऐन निवडणूकीच्या दिवशी धमाल निर्माण करू शकते नाही का?

### लोकसभेसारखाच पुन्हा फेक नरिटिव्ह

या मोर्चानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यानी मात्र वेगळीच प्रतिक्रिया दिली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पराभवाच्या भीतीपोटी लोकसभेसारखाच पुन्हा फेक नरिटिव्ह पसरवण्याचा कट आहे, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केला. हा कट उधळून लावण्यासाठी भाजपाच्या बूथ स्तरापासूनच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने पेटून उठायला हवे असेही त्यांनी सांगितले. महाविकास आघाडीचा खोटा प्रचार आणि भ्रम निर्माण करण्याचे डाव हाणून पाडण्यासाठी, मविआच्या दुटप्पी भूमिकेची पोलखोल करण्यासाठी शनिवारी गिरगाव चौपाटी येथे करण्यात आलेल्या मूक आंदोलनावेळी चव्हाण म्हणाले की, प्रत्येक नागरिकाच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवण्यासाठी महायुती सरकार झोकून काम करत असताना महाविकास आघाडी राज्यात अराजक माजवून पिछाडीवर नेण्याचा प्रयत्न करत आहे. परदेशी शक्ती आणि फंडिंगच्या मदतीने पोसणा-या सामाजिक संस्थांना हाताशी घेऊन विकास रोखण्याचे आणि दिशाभूल करून अस्थिरता निर्माण करण्याचे काम ही मंडळी करत आहेत. या आंदोलन करणा-यांमध्ये एखादा सचिन वाझे देखील असू शकतो, असा सावधानतेचा इशारा देत जनतेने डोळसपणे यांचा कुटिल उद्देश, डाव समजावा असे आवाहन त्यांनी केले.

ठाकरे बंधूंवर निशाणा साधत चव्हाण म्हणाले की हे बंधू वक्त्तृत्वशैलीच्या बळावर जनतेला महाराष्ट्राच्या अस्मितेवरून भावनिक आवाहनांमध्ये अडकवून त्यांची दिशाभूल करत आले आहेत. महाराष्ट्राला सर्वात वाईट दिवस ठाकरे बंधूंनी दाखवले. राज्यात महायुती सरकारच्या काळात राज्याला पुढे नेण्यासाठी होत असलेले प्रकल्प, योजना याकडे डोळे उघडे ठेवून पहा असे आवाहन चव्हाण यांनी केले. प्रत्येक गरीबाला हक्काचे घर मिळायला हवे हे बाळासाहेब ठाकरेंचे स्वप्न आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांतून साकार होत आहे. असेही चव्हाण म्हणाले . लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गाधी यांनी पुराव्यासह उघड करून दाखवले पण केंद्रीय निवडणूक आयोगाने त्यावर संपूर्ण देशभर एस आय आर करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. गंमत म्हणजे सत्याचा मोर्चा निघत असताना सत्ताधाऱ्यांनी मूक मोर्चा काढला आहे. हा मूक मोर्चा मात्र कुणाच्या विरोधात होता असा सवाल नंतर उपस्थित करण्यात येत होता. कारण सत्ताधारी पक्षाच्याही अनेक विद्यमान नेते आमदारांकडून निवडणूक आयोगाकडे तक्रारीही करण्यात आल्या आहेत त्या का याचाही विचार करायला हवा नाही का ?

**किशोर आपटे**

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या उमेदवारीसाठी अनेकांची पक्षश्रेष्ठीकडे तोबागर्दी

## महिलांना ना पसंती:तर नविन चेहऱ्यांना मिळावी संधी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : तालुक्यात जिल्हा परिषद गटांचे आणि पंचायत समितीच्या गणांचे आरक्षण निश्चित झाल्याने चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे उमेदवारी मिळविण्यासाठी आता इच्छुकांची धावपळ सुरू झाली. त्यामुळे पक्षश्रेष्ठींकडे इच्छुकांसह त्यांच्या समर्थकांची वर्दळ वाढली आहे. शिवाय आपणच कसे सक्षम उमेदवार आहोत हे सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या पोस्टद्वारे दाखविण्याचा प्रयत्नही केला जात आहे.

नुकतेच पंचायत समितीच्या सभापतीपद सर्व साधारण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. जिल्हा परिषदेचेही आरक्षण निश्चित झाले आहे. या आरक्षणामुळे प्रमुख कार्यकर्त्यांची मात्र कोंडी झाली आहे. त्यामध्ये विविध पक्षांतील काही मातब्बरांचा समावेश आहे. विस्थापित झालेल्या मातब्बरांकडून सुरक्षितची चाचपणी केली जात असली तरी त्यात त्यांना कितपत यश मिळेल, याची उत्सुकता आहे. त्यामुळे कोणत्या प्रवर्गासाठी कोणता गट व गण आरक्षित आहे, हे ही स्पष्ट झाल्याने त्या त्या प्रवर्गातील इच्छुकांनी आता उमेदवारीसाठी धावपळ सुरू केली आहे. त्यातच प्रमुख नेत्याकडे इच्छुक त्यांच्या समर्थकांसह हजेरी लावत आहेत. आपण किंवा गणातून इच्छुक असल्याचा संदेश पक्षश्रेष्ठीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न इच्छुकांकडून केला जात आहे. त्यामुळे पक्षांची अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांच्या गर्दीनी गजबजलेली दिसून येत आहेत. निवडणुकीचा कार्यक्रम अद्याप जाहीर झालेला नाही परंतु याच महिन्यात कार्यक्रम लागण्याची शक्यता आहे. मात्र सोशल मीडियावर गावपातळीवरील कार्यकर्ते व त्यांच्या समर्थकांकडून विविध प्रकारच्या पोस्टचा भडिमार सुरू आहे. जनतेच्या कामांसाठी धावून येणारा, विकासरत्न, गुलाल आम्हीच उधळणार अशा आशयाच्या पोस्ट सध्या इच्छुकांच्या समर्थकांकडून सोशल मीडियावर पोस्ट केल्या जात आहेत. या माध्यमातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचा संदेश नेत्यांसह व गणांतील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या नगरपरिषद निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे, नगराध्यक्ष हा थेट जनतेतून निवडून द्यायचा असल्यामुळे अनेकांनी आपली मोर्चे बांधणी सुरू केलेली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ही अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता आहे.

पुसद शहरातील जनतेचा कौल घेतला असता यामध्ये गेल्या वीस वर्षात महिला अध्यक्षपदी नगरपरिषदेच्या राहिले आहे परंतु कोणताही विकास झालेला नाही तसेच जुने नगरसेवक यांनीही कोणताही विकास केलेला नसल्यामुळे त्यांना नागरिकातून ना पसंती होत आहे. आणि नवीन चेहऱ्याला पक्षश्रेष्ठीकडून संधी मिळावी हे शहरातील सुज्ञ नागरिकांचे स्पष्ट मत आहे. सध्यातरी इच्छुकांची आपल्या सोयीनुसार या पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे सुरू असून "तळ्यात मळ्यात" अशीच स्थिती असल्याने जनतेच्या मनातही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विविध पक्षाकडून अजून कोणताच ठोस निर्णय घेतला नसल्याने कार्यकर्ते सद्यातरी संभ्रमात आहेत.

# विकासात माघारलेल्या गुंज सर्कलसाठी निवडणूक लढविणार : कोमल लखन राठोड

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - तालुक्यातील एक युवा कार्यकर्त्या तसेच नेहमी सक्रिय भूमिका बजावणाऱ्या जनहितासाठी अहोरात्र लढणाऱ्या कोमल लखन राठोड यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. येत्या काही दिवसातच जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक लागणार आहे.

येत्या दोन ते तीन महिन्यांतच येऊन ठेपलेल्या या निवडणुकीसाठी अनेक राजकीय पुढाऱ्यांनी कमर कसुन तयारी सुरू केली आहे. गुंज सर्कल मधुन या वेळेस जि.परिषद गटातुन गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना (शिंदे गट) पक्षासाठी एकनिष्ठेने निस्वार्थपणे काम करीत असलेल्या शिवसेना ( शिंदे गट ) च्या निकटी असलेल्या गुंज सर्कल मधील कर्तव्यदक्ष महिला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोमल लखन राठोड यांना शिवसेना च्या वतीने जि.परिषद गटातुन उमेदवारी मिळाली तर निवडणूक लढणार असे मत व्यक्त केले आहे. उच्च शिक्षित नव तरुण यांना संधी मिळावी म्हणून मतदार संघातील जनताही त्यांच्या मागे खंबीरपणे उभी आहे. व त्यांना भरघोस मताने निवडून आणू अशी भावनीक इच्छा ही मतदारांनी व्यक्त केली आहे. राठोड ताई ह्या गेल्या अनेक वर्षांपासून आपल्यावर सोपविलेल्या पक्षाच्या जबाबदारी एकनिष्ठेने पार पाडत असुन आपल्या परिसरातील आजुबाजुच्या गावगाड्यातील नागरिकांसाठी नेहमी तत्पर राहुन जनसामान्यांच्या कामकाजात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांनी सर्कल मधील मतदार संघात चांगलाच ठसा उमटविला आहे. सामान्य नागरिकांच्या अडी अडचणीत विकासात्मक कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक वेगळीच छवी असते. अशी छवी गुंज सर्कल मधील राठोड ताई यांनी आपल्या कर्तृत्वाने निर्माण केली असल्याचे बोलल्या जात आहे. त्यामुळे जनतेमधुनही राठोड ताई यांना उमेदवारी मिळावी म्हणून चर्चा केली जात आहे मात्र अनेक पुढाऱ्यांनी प. समितीच्या उमेदवारीसाठी तयारी सुरू केली असल्याने आता श्रेष्ठी एकनिष्ठेने पक्षासाठी काम करून झुंज घेणाऱ्या कार्यकर्त्याला उमेदवारी मिळणार किंवा नाही हे वरिष्ठ निर्णय घेतील मात्र राठोड यांना जि.परिषद उमेदवारी उपेक्षितच आहे.

# पुसदचा विकास करुन भ्रष्टाचार मुक्त करणार : पुसद विकास मंच !

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पुसद : शहराचा गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला सर्वांगीन विकास व भ्रष्टाचार मुक्त प्रशासनासाठी सर्मपित पुसद विकास मंचची स्थापना करण्यात आली असुन आगामी २०२५ ची नगर परिषद निवडणुक नगराध्यक्षसह सर्व नगर सेवक पदासाठी पॅनल तर्फे निवडणुक लढविणार असल्याचे ॲड.अनिल ठाकुर यानी दि.०२/११/२०२५ रोजी पुसद येथील अनुप्रभा हॉटेल येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

सामाजिक राजकिय, संबंधीत अनेक मुद्दे छेडुन पुसद शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटीबद्ध राहू असे जाहिर पत्रकात सुध्दा त्यांनी जाहिर केले आहे. यामध्ये अनेक विषयावर स्पष्ट व परखड मत प्रदर्शीत करीत पुसद विकास मंच तर्फे नगराध्यक्ष पदासाठी स्वतः अनिल ठाकुर व या पॅनलच्या नगर सेवकांना निवडुण देण्याचे आवाहन या पत्रकार परिषदेत त्यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत बोलतांना ते पुढे म्हणाले नगर परिषद पुसद सन २००१ पासुन २०२२ पर्यंत सतत एकहाती सत्ता असुन या काळात शहराचा कोणत्याही प्रकारचा विकास झाला नाही. उलट प्रचंड भ्रष्टाचार व सर्वपक्षीय भुमिकेमुळे पुसद शहर अधोगतीला गेले आहे. यासाठीच पुसद विकास मंच हा भ्रष्टाचार मुक्त व सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातुन निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. अनेक विषयावर मुद्दे स्पष्ट करतांना ते म्हणाले आम्ही जनसेवेतून सर्व त्रुटी दूर करण्याचा पुसद विकास मंच प्रयत्न करेल यामध्ये बाजार पेठ, दिल्ली, जापान सारख्या शाळा निर्माण करणे. दारिद्रय रेषेखालील मुलांन करीता सर्व सोई युक्त अत्याधुनिक वस्तीगृह, प्रत्येक वार्डात उद्यान, अंडरग्राऊंड विजपुरवठा व्यवस्था, सोलार सिस्टीम, पाकींगची व्यवस्था, शहर झोपडीमुक्त करणे व्यवसायीक मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर घेणे. शुद्ध जल पुरविणे, सर्व शासकिय भूखंड धारकांना नमुना ड बनवुन देण्याची व्यवस्था, मागील २० वर्षात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन दोषीवर कठोर कारवाई करणे, पुसद जिल्हा होण्यासाठी प्रयत्न करणे व मागणी करणे, न.प.प्रशासकीय इमारतीत ऑडीओ, व्हिडीओ सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे. शेतक-यांसाठी अत्याधुनिक विश्रामगृह, २०००/हजार युवक युवतींना नोकरी, २०००/हजार महिलांना लघु उद्योग सुरु करुन देण्यासाठी माजी सैनिक व त्यांच्या परिवारासाठी कल्याणकारी योजना राबविणे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील व पुला जवळील हिंदु दफन भुमीचा विकास करणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह बांधणे, पत्रकार भवन उभारणे, पोलीस भरती सैन्य भरती प्रशिक्षण उपलब्ध करणे, शहरातील अतिक्रमण हटवून पर्याय व्यवस्था करणे, या सारखी अनेक कामे करुन व विविध विशेष उपक्रम राबवुन पुसदचा विकास करण्यासाठी आमचा पुसद विकास मंच कटीबध्द राहुन काम करेल,असे ॲड. अनिल ठाकुर यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहिर पत्रकाद्वारे पुसद विकास मंचला निवडुण देण्याची आवाहन ॲड. उमेश जाजु यांनी केले.

# युवकांनी राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा : आ. प्रा. राजू तोडसाम

## घाटंजी येथे झालेल्या युवा संवाद व मंडळ कार्यकारिणीच्या बैठकित केले प्रतिपादन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - काल दिनांक 02 नोव्हेंबर 2025 रोजी एलएसडी हॉल घाटंजी येथे भाजपा युवा मोर्चा तर्फे संवाद व कार्यकारिणी बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक मा. आमदार राजूभाऊ तोडसाम, देवानंद भाऊ पवार भाजपा नेते व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष मा. श्री सूरज गुप्ता,प्रिया ताई शिंदे-तोडसाम भाजपा उपाध्यक्ष यवतमाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीत मा. आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून युवक या देशाचा भविष्य आहे, देशात बदल घडविण्याची ताकत ही युवकात आहे त्यासाठी युवकांनी राजकारणात मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन युवकांशी संवाद साधताना केले.देवानंद भाऊ पवार,श्री सूरज गुप्ता,प्रिया ताई शिंदे-तोडसाम यांनीही तालुक्यातील युवा मोर्चाच्या पदाधिकारी यांच्यासोबत संवाद साधला व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका बाबत मार्गदर्शन केले. या बैठकीचे आयोजन युवा मोर्चा महामंत्री विशाल कदम, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष श्री चेतन जाधव युवा मोर्चा तालुका अध्यक्ष महेश जाधव व युवा मोर्चा शहराध्यक्ष आशिष शेंडे यांनी केला.या बैठकीला प्रमुख उपस्थिती विजय बैस भाजपा तालुका अध्यक्ष,गजानन ढवळे भाजपा शहर अध्यक्ष, सुरेशजी डहाके सर,मुज्जम्मील पटेल, बाळू जाधव, राम खाडरे, अनुप देठे, कन्हैया कावळे, विजय कनाके, अंकित नैताम, तेजस आंबेडकर, प्रसाद पेंदोर, विकास चौधरी, कैलास मोहुर्ले, संदीप मोहुर्ले, रोहन दुलारवार, सुरज गटलेवार, सागर चौधरी,रवी चवके, अमोल चौधरी, आकाश येवले, भूषण चौधरी, आशुतोष चौधरी, विराज निवल, सुरेंद्र मेश्राम,देविदास शिंदे, सुरज टोंगे, विकास डंभारे, कृष्णा गोर्लेवार, ईश्वर मोहिजे, गोलू आडे, निखिल मडावी, पार्थ जमदापुरे. आदी पदाधिकारी व युवा मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "पांढरकवड्यात सुजाण पालकत्वाचा प्रकाश 'बेटा जरा जपून' कार्यशाळेची महाराष्ट्रभर चर्चा!'

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा : युवा टायगर फोर्स, पांढरकवडा व परिसरातील शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने "सुजाण पालकत्व कार्यशाळा – बेटा जरा जपून" या महत्त्वपूर्ण व ज्ञानदायी कार्यशाळेचे भव्य आयोजन मित्र क्रीडा मैदान, पांढरकवडा येथे करण्यात आले. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाला पांढरकवडा व परिसरातील हजारो पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, हा उपक्रम आता राज्यभर चर्चेचा विषय झाला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात गुरुदेव सेवा मंडळ, केळापूर तालुका यांच्या सुरेल कीर्तन-भजनाने करण्यात आली. कार्तिकी एकादशीनिमित्त भक्तिभावाने विठ्ठल-रुक्माईची आरती करून कार्यक्रमाला मंगल आणि अध्यात्मिक सुरुवात मिळाली. यानंतर दीपप्रज्वलन करून सरस्वती माता व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहण्यात आली.

सूत्रसंचालन: प्रा. राहुल भानेगावकर प्रास्ताविक: युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी सादर केले. त्यांनी पालकत्वातील जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित करत या उपक्रमाच्या उद्दिष्टाची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय: सौ. अपर्णा देशपांडे यांनी करून दिला.

कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक : यवतमाळ येथील सुप्रसिद्ध डॉक्टर डॉ. गिरीश माने व डॉ. वृषाली माने. त्यांनी पालकत्वातील संवाद, बालसंस्कार, मोबाईलचे व्यसन, शाळा-घरातील समन्वय, आधुनिक काळातील आव्हाने यावर प्रभावी व अचूक मार्गदर्शन केले. "पालकांनी मुलांसोबत भावनिक नाते दृढ ठेवणे गरजेचे आहे. सुजाण पालकत्वानेच सुजाण पिढी तयार होते," असा हृदयस्पर्शी संदेश त्यांनी दिला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून दोन ते तीन तास रंगलेल्या या सत्रात उपस्थित पालकांनी मार्गदर्शन घेतलं आणि आवडीनं प्रश्न विचारले. स्वागत: डॉक्टरांचे स्वागत पर्यावरणपूरक वृक्षप्रदानाद्वारे करण्यात आले. आभार प्रदर्शन: श्री. स्वप्निल कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमासाठी समन्वय व योगदान देणारे प्रमुख कार्यकर्ते : मदन जिद्देवार,भाऊराव मराPे, अंकित नैताम, आनंद वैद्य, मनोज भोयर, संजय चन्नावार, श्रीकांत काळे, सुनील कोपुलवार, अशोक भेंडाळे, विलास गोडे, संजय झोटिंग, अभय डोंगरे, संजय औदार्य, सागर व्यास, राम भेंडाळे, रामचंद्र अडते,दत्तात्रय ठाकरे,रवी नसकुलवार, श्वेता काळपांडे,रितेश मुप्पीडवार तसेच परिसरातील सर्व शैक्षणिक संस्थांचे संचालक, शिक्षक व कर्मचारी. आदी उपस्थित होते

# वेचक

## डॉ. देवयांश निमोदिया यांना एम.डी. रेडिओडायग्नोसिसमध्ये सुवर्णपदक



यवतमाळ - दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (DMIHER), वर्धा येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजचे पदव्युत्तर निवासी डॉक्टर डॉ. देवयांश ललित निमोदिया यांना शैक्षणिक सत्र २०२५ साठी एम.डी. रेडिओडायग्नोसिसमध्ये सर्वोच्च गुण मिळविल्याबद्दल विद्यापीठ सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. त्यांनी आतापर्यंत ३० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संशोधन लेख प्रकाशित केले असून एशियन-ओशिनियन काँग्रेस ऑफ रेडिओलॉजीमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांचे विशेष क्षेत्र इंटरव्हेन्शनल आणि व्हॅस्क्युलर रेडिओलॉजी आहे. ते यवतमाळच्या संजीवन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रोमोटर डायरेक्टर डॉ. ललित निमोदिया यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठ प्रशासनाने त्यांचे अभिनंदन केले.

## भाजपा किसान मोर्चा जिल्हासचिवपदी नितीन राठोड



घाटंजी - तालुक्यातील नितीन शालिक राठोड यांची शेतकरी, शेतमजूर आणि समाजाबद्दल असलेली निष्ठा, त्यांनी केलेले सामाजिक कार्य आणि भाजपाप्रति असलेली निष्ठा व समर्पनाची जान लक्षात घेऊन किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री पंजाबभाऊ जाधव यांनी नितीन राठोड यांची जिल्हा सचिवपदी नियुक्ती दिली आहे. यावेळी किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर चिरडे, सचिव सुधाकर बोबडे, बोरी मंडळ अध्यक्ष राजेंद्र चिरडे, ग्रामीण अध्यक्ष अविनाश निमकर आदी उपस्थित होते.

## कृषी समृद्धी योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

यवतमाळ : कृषी समृद्धी योजनेअंतर्गत २०२५-२६ या वर्षाकरिता इच्छुक शेतकरी गट तसेच शेतमाल उत्पादक कंपन्यांकडून 6 नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यात विविध कृषी क्षेत्रातील योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये तीळ, चिया, रब्बी ज्वारी, भुईमूग या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढ योजना, औषधी वनस्पती व स्ट्रॉबेरी लागवड क्षेत्र वाढ योजना, हिरवळीचे पिक लागवड, बायोचार युनिट, माती परीक्षण प्रयोगशाळा, जीवामृत स्लरी टँक, किसान ड्रोन योजना, बांधावरील जैविक प्रयोगशाळा, शुगरकेन हार्वेस्टर, गोडावून व थ्रेशिंग यार्ड बांधकाम, क्लिनिंग ग्रेडिंग युनिट, मोहफुल संकलन जाळी संच, हळद प्रक्रिया रोपण यंत्र,कापणी यत्र,उकळणी भट्टी पॉलिशिंग यंत्र तसेच कडुनिंब (ढेप, पावडर, तेल) प्रक्रिया युनिट अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. या सर्व योजनांसाठी तालुकानिहाय लक्षांक निश्चित करण्यात आले आहेत. तथापि, लक्षांकांपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास पात्र शेतकरी, गट किंवा शेतमाल उत्पादक कंपन्यांची निवड सोडतीद्वारे करण्यात येणार आहे. निवडीनंतर १० दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

## दिग्रस येथे इंदिरा गांधी योजनांसाठी डिजिटल लाईफ सर्टिफिकेट शिबीर आयोजन

यवतमाळ : दिग्रस नगर परिषद हद्दीतील इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग योजनेतील शहरातील लाभार्थ्यांसाठी डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (डी.एल.सी.) शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत नगर परिषद शाळा क्र. ८, संभाजीनगर येथे होणार आहे. सर्व लाभार्थ्यांनी आपले डिजिटल लाईफ सर्टिफिकेट काढून घ्यावे, कारण प्रमाणपत्र केल्यानंतरच अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित लाभार्थ्यांनी या विशेष शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार मयूर राऊत यांनी केले.

# सर्जनशील क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता माणसाची जागा घेऊ शकत नाही : प्रा. हेमंत खडके

## उबंटू इंग्लिश स्कूल, यवतमाळ येथे ६९व्या विदर्भ साहित्य संमेलनात रंगला परिसंवाद

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - "सर्जनशील क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) माणसाची जागा घेऊ शकत नाही. नवसर्जनामध्ये संस्कृती, परंपरा आणि कलावंताचा जीवनानुभव महत्त्वाचा असतो. एआय जीवनाचा अनुभव घेऊ शकत नाही, त्यामुळे तिची निर्मिती अखेर मानवाचीच ठरते," असे प्रतिपादन प्रा. हेमंत खडके यांनी केले.

उबंटू इंग्लिश स्कूल, जाब रोड येथे पार पडलेल्या ६९व्या विदर्भ साहित्य संमेलनातील 'सर्जनशील क्षेत्रात युवक, बेरोजगार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' या परिसंवादात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या परिसंवादात पत्रकार मिलिंद कीर्ती, प्रा. ज्ञानेश्वर गटकर आणि प्रा. अन्नपूर्णा चौधरी यांचा सहभाग होता. प्रा. खडके म्हणाले की, "एआय माणसाला सहाय्यकारी ठरू शकते, मात्र मानव-मानव संबंधांना पर्याय ठरू शकत नाही. शिक्षण, वैद्यक, पत्रकारिता यांसारख्या क्षेत्रांतील संवेदनशीलता आणि मूल्यदृष्टी एआय शिकू शकत नाही." पत्रकार मिलिंद कीर्ती यांनी एआयवरील बड्या कंपन्यांच्या नफेखोर वृत्तीचा संदर्भ देत तंत्रज्ञानाच्या वापरातील विषमता अधोरेखित केली. तर प्रा. गटकर यांनी चॅटजीपीटीने तयार केलेले गीत आणि एआयने रेखाटलेल्या चित्राचे उदाहरण देत यंत्रनिर्मित कलात्मकतेचा दाखला दिला. या प्रसंगी संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रमाकांत कोलते, वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, आमंत्रक तीर्थराज कापगते, आयोजक हेमंत कांबळे, पत्रकार श्रीपाद अपराजित यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# औषधांचा सुरक्षित व जबाबदारपणे वापर करणे संदर्भात जनजागृती

## औषध सुरक्षा सप्ताह निमित्त फार्मासिस्ट प्रशांत गावंडे यांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**जनमाध्यम प्रतिनिधी**





पुसद - महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, औषध माहिती केंद्र (DIC) अंतर्गत MEDSAFETY WEEK 2025 (औषध सुरक्षा सप्ताह ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५)ही जनजागृती मोहीम Uppsala Monitoring Centre (UMC), स्वीडन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली आहे.

औषधांचा सुरक्षित आणि जबाबदार वापर याबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे योग्य माहिती देऊन औषध साक्षरता वाढवणे,फक्त नोंदणीकृत फार्मासिस्टकडूनच औषध खरेदी करण्याचे फायदे सांगणे समाजात फार्मासिस्टचे स्थान अधिक दृढ करणे, एक जबाबदार फार्मासिस्ट म्हणून पेशंटला ग्राहकांना चांगले मार्गदर्शन करणे, तुमच्या छोट्या प्रयत्नातून समाजात मोठा बदल घडू शकतो. सुरक्षित औषध वापर म्हणजेच सक्षम आरोग्य व्यवस्थेचा पाया! हे उद्दिष्ट समोर ठेवून औषध सुरक्षा सप्ताह ची सुरुवात जिल्हा परिषद मराठी शाळा बोरगडी येथून सुरुवात करून पुसद फार्मासिस्ट परिवाराचे समन्वयक फार्मासिस्ट प्रशांत गावंडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यांच्या सोबत फार्मासिस्ट तेजस देशमुख हजर होते. आपल्या बोरगडी जिल्हा परिषद मराठी शाळेला स्व. जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटीचे अध्यक्ष तथा पुसद फार्मासिस्ट परिवाराचे समन्वयक प्रशांत गावंडे यांनी गेल्या बऱ्याच वर्षापासून लागणाऱ्या प्रथमउपचार औषधी मोफत देऊन, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मनोबल वाढवण्यासाठी सन्मानपत्र व गोल्ड मेडल आपल्या विद्यार्थ्यांना वाटप करून सामाजिक बांधिलकी राखून नेहमीच मदत करण्यात अग्रेसर असतात, असे शाळेचे मुख्याध्यापक रमेश अडकिने सर सांगून जुन्या सामाजिक कार्याचा उजाळा देत आभारप्रदर्शन केले.

# गवळी समाजातील पहिली चार्टर्ड अकाउंटंट ! : कु. अंकिता सुधाकरराव डोळे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - कुमारी अंकिता सुधाकरराव डोळे हिने अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठित अशा चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) परीक्षेत उत्तीर्ण होऊन समाजाचा मान अभिमानाने उंचावला आहे. विशेष म्हणजे, ती गवळी समाजातील पहिली चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) ठरली असून, या अभूतपूर्व यशामुळे समाजभर आनंद आणि अभिमानाची लाट पसरली आहे.

अंकिताने आपल्या चिकाटी, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. शिक्षण क्षेत्रात गवळी समाजातील कन्येने मिळवलेले हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आणि गौरवशाली क्षण ठरला आहे. तिच्या या यशामुळे नव्या पिढीसमोर एक प्रेरणादायी उदाहरण उभं राहिलं असून, 'गवळी समाजातील कन्या काहीही करू शकते' हा विश्वास अधिक दृढ झाला आहे. या यशामागे तिचे आदरणीय वडील सुधाकर राघोजी डोळे यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन, कष्ट आणि मार्गदर्शन तसेच आई नीलिमा सुधाकर डोळे यांचे प्रेम, संस्कार आणि साथ हे मोलाचे योगदान आहे. तसेच तिचे भाऊ डॉ.सौरभ डोळे आणि सारंग डोळे यांचे प्रोत्साहन, आधार आणि प्रेमही या यशामध्ये महत्त्वाचे ठरले आहे. पालकांचे आशीर्वाद आणि भावंडांचा पाठिंबा या संगमातून हे सुवर्णयश साकार झाले आहे. कुमारी अंकिताचे हे यश तिच्या कुटुंबासाठी, गावासाठी आणि संपूर्ण गवळी समाजासाठी मानाचा तुरा ठरले आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# महागाव न्यायालयात बॅडमिंटन स्पर्धा संपन्न

## वकील बांधवांसह न्यायालयीन व सुरक्षा कर्मचाऱ्याचा सहभाग



**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - न्यायालयात दिवाळी निमित्त महागाव वकील संघाच्या वतीने बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यात वकिलांसह सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. महागाव येथील न्यायालयात महागाव तालुका वकील संघाच्या वतीने दिवाळी निमित्त बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यास्पर्धेत प्रथम क्रमांक पुसद येथील विधीज्ञ ॲड .श्रीपाद राजे, दुसरा क्रमांक महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान एकनाथ पवार तर तृतीय क्रमांक न्यायालयाचे कर्मचारी पवार यांनी पटकाविला.

यामध्ये न्यायालयात वकिली करणाऱ्या वकिलांसह महागाव तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.एस. एन. कवाने, व्हि. बी.देशमुख,एस. पी.देशमुख,एस,आर,राऊत,अविनाश वजिराबादे, एस.एस.राऊत, आर. बी.जाधव,एस.एन.लकडे,झेड. भंडारी ,झहीर खान,एस. ए. चाटसे, एल. ए.भांगे,आकाश साबळे,नितीन इंगळे यांच्यासह महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान सहभागी झाले होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी अर्ज मागविण्याची घोषणा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका तसेच नगराध्यक्ष पदांसाठी उमेदवारी अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांना आपले अर्ज १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत डिमांड ड्राफ्टसह सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवारांनी संबंधित तालुक्यातील तालुका अध्यक्ष व विधानसभा अध्यक्ष यांच्याकडून अर्ज घ्यावेत व तेच डीडीसह सादर करावेत. तर नगरपालिका व नगराध्यक्ष पदासाठीचे अर्ज संबंधित शहराध्यक्ष व विधानसभा अध्यक्ष यांच्याकडून घेऊन निश्चित तारखेपूर्वी जमा करावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. हा ही माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून यवतमाळ जिल्हाध्यक्षा श्रीमती वर्षा निकम यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

# टिबीमुक्त भारत अभियानमध्ये महानगरपालिकेचा सक्रीय सहभाग

**अमरावती/का.प्र.**

टिबीमुक्त भारत अभियानां तर्गत मनपा आयुक्त यांचे दालनात मोहीमेचा आढावा घेण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. सभेला मा. अतिरिक्त आयुक्त मनपा अमरावती, जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, १३ श.आ.कें. चे स्त्री वैद्यकीय अधिकारी, १८ एचडब्ल्युसी दवाखाने, २३ ओपीडी दवाखाने हयांचे वैद्यकीय अधिकारी हजर होते. हया आरोग्यसंस्थां मार्फत मोहीम राबविण्यात येत असून तपासणी करण्यात येत आहे.



सभेत टिबीमुक्त भारत अभियानाचा व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा निर्देशांक निहाय आढावा घेण्यात आला. खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्यात. सभेत सदर निर्देशांकाचा सखोल आढावा घेण्यात आला. ३१ ऑक्टोबर २०२५ पूर्वी सर्व श. आ. के. निहाय नोंदी करणे अपेक्षित होते. त्या पूर्ण न झाल्याने मुदत वाढ देवून दि. ७ नोव्हेबर पावेतो सर्व नोंदी पूर्ण करुन अद्ययावत करणेच्या सक्त सुचना मा. आयुक्त महोदया हयांनी सर्व उपस्थित वैद्यकीय अधिकारी हयांना दिल्यात. नोंदी अपूर्ण राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी श.आ.कें. चे वैद्यकीय अधिकारी हयांची राहील व त्यांना कामात कुचराई केले बाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल हयाची गंभीरतेने नोंद घेणे बाबत सुचना देण्यात आली. सर्व प्रलंबित नोंदी ७ दिवसात पूर्ण कराव्यात. तदनंतर आठवडयाचा एक दिवस निश्चित करुन त्या दिवशी टिबीचे काम करावे व सर्व निर्देशांकांची माहिती अद्ययावत कराबी, एक्सरे तपासणी बाबत दररोज आरोग्य संस्था निहाय अहवाल मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी हयांना सादर करावा व आठवडी अहवाल मा. आयुक्त हयांना सादर करावा. तसेच एक्सरेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक हयांचेशी सामंजस्य करार करणे,असे आवाहन टिबीमुक्त भारत अभियान १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ हया कालावधीत राबविण्यात येत आहे. त्याचा लाभ अमरावती शहराचे जोखीमग्रस्त/ वरिष्ठ/ स्त्रिया/ सामान्य नागरिक हयांनी घ्यावा आयुक्त सौम्या शर्मा चांडक, मा. अति. आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान हयांनी केले आहे.

# स्कायवॉक मार्ग अडकला अडथळ्यात

**अमरावती / का.प्र.**

विदर्भातील नंदनवन असलेल्या चिखलदरा शहराला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळवून देण्याचे उद्दिष्ट असलेल्या महत्त्वाकांक्षी स्कायवॉक प्रकल्पाला अनेक अडथळे असून सरकार आणि प्रशासन या मुद्द्यावर निष्क्रिय का बसले आहे असा प्रश्न पर्यटकांना पडत आहे.

निसर्गाने चिखलदरा शहराला मुबलक नैसर्गिक संसाधनांनी भरभराटीला आणले आहे, परंतु सरकार आणि प्रशासनाची इच्छाशक्ती कमी आहे.निधीअभावी, त्याच्या विकासाला वारंवार अडचणी आल्या आहेत.

हे ज्ञात आहे की स्कायवॉकचे बांधकाम कधीकधी वन विभागाच्या अडचणींमुळे तर



कधीकधी तांत्रिक अडचणींमुळे अडथळे निर्माण करते. लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एकीकडे, पर्यटन आदिवासी समुदायांना रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाचे आश्वासन देते, तर दुसरीकडे, मोठ्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.हे लक्षात घेण्यासारखे आहे की स्कायवॉक प्रकल्प हा चिखलदऱ्याच्या पर्यटनाला पुनरुज्जीवित करणारा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. एकदा पूर्ण झाल्यानंतर चिखलदऱ्याची अर्थव्यवस्था भरभराटीला येईल. सिडको मार्फत चिखलदरा येथे कोट्यवधी रुपयांचे काम सुरू आहे.

तथापि, या प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आरोप वारंवार केले जात आहेत.

गेल्या सहा वर्षांपासून स्कायवॉकचे बांधकाम सुरू आहे. हे काम जलदगतीने पूर्ण करावे अशी नागरिकांची मागणी आहे.

## 'जयंत पवार कथा स्पर्धा २०२५' मध्ये

# प्रा.प्रसेनजीत तेलंग यांच्या कथेला प्रथम पारितोषिक जाहीर

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्राच्या वांड्मयीन विश्वात अनुष्टुभ नियतकालिकास अत्यंत सन्मानाने ओळखल्या जाते. याच माध्यमातून, अनुष्टुभ प्रतिष्ठान यांच्या वतीने घेण्यात आलेल्या, ' जयंत पवार कथा स्पर्धा-२०२५' चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या कथा स्पर्धेत प्रा.प्रसेनजीत तेलंग यांची कथा प्रथम पुरस्काराची मानकरी ठरली आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून १९६ कथा आल्या होत्या. यातल्या प्राथमिक छाननीमध्ये उत्कृष्ट चाळीस कथा अंतिम निवडीसाठी बाहेर काढण्यात आल्या. विशेष म्हणजे कोणत्याही कथेवर कथालेखकाचे नाव न टाकता त्यांना १ ते १९६ असे क्रमांक देऊन ते परिक्षणासाठी परीक्षकांकडे पाठविण्यात आले होते. यातून प्रा. प्रसेनजीत तेलंग यांची कथा सर्वोत्कृष्ट कथा म्हणून प्रथम पुरस्कारासाठी निवडण्यात आली, ही विशेष बाब होय.



प्रा. तेलंग यांची ही कथा सामाजिक आशयाने परिपूर्ण असून, वांड्मयीन मूल्यदृष्ट्या ही कथा अत्यंत सरस असल्याचे मत अनेकांनी या कथेबद्दल व्यक्त केले आहे. प्रा. प्रसेनजीत तेलंग हे प्रोग्रेसीव्ह रायटर्स असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे कार्यवाह आणि पी. डब्ल्यू. ए. चे नॅशनल कौन्सिलचे सहस्य म्हणूनही ते राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत. विशेष म्हणजे गेल्या चार महिन्यांत प्रा. प्रसेनजीत तेलंग यांची कथा दुसऱ्यांदा राज्यपुरस्काराची मानकरी ठरली आहे. श्रीकृष्ण महाविद्यालय, आमला विश्वेश्वर येथून प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झालेल्या प्रा. तेलंग यांना मुंबई येथे होणाऱ्या विशेष कार्यक्रमात रोख रक्कम आणि सन्मचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल प्रसिद्ध समीक्षक डॉ. प्रमोद मुनघाटे, ज्येष्ठ पत्रकार अविनाश दुधे, पत्रकार प्रा. रवींद्र मेंढे, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व साहित्यिक अरूणा सबाणे, डॉ.कमलाकर पायस, कवी सुखदेव ढाणके, कवी व प्रसिद्ध चित्रकार सुनिल यावलीकर, प्रसिद्ध टी.व्ही.पत्रकार संजय शेंडे, प्रसिध्द साहित्यिक व समीक्षक जी. के. ऐनापुरे, मनोविकास प्रकाशन पुणे चे अरविंद पाटकर, समीक्षक दा गो काळे, महाराष्ट्र राज्य प्रगतीशील लेखक संघ, आणि महाराष्ट्रातील अनेक गणमान्य साहित्यिक व परिसरातील अनेक मित्रमंडळींनी प्रा. प्रसेनजीत तेलंग यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. अमरावती जिल्हा आणि विशेषत: चांदूर रेल्वेसाठी ही विशेष अभिमानाची बाब आहे.

## एईएफईटीओ व अ. भा. शिक्षक महासंघांतर्फे बालदिनी धरणे

**अमरावती**- केंद्र सरकारने गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षणाशी संबंधित आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यो सोडवल्या नाहीत. अलिकडेच, सर्वोच्च न्यायालयाने सर्व शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केली आहे. या निर्णयामुळे देशभरातील लाखो शिक्षकांवर अन्याय झाला आहे. संघटनेने बाल दिनी दिल्लीतील जंतरमंतर येथे निषेध धरणे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.आंदोलनात महाराष्ट्रातून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या नेतृत्वात हजारो शिक्षक सहभागी होणार आहे.आंदोलनाच्या मुख्य मागण्या मध्ये कार्यरत शिक्षकांसाठी टीईटीची सक्ती रद्द करा.आवश्यक बदल करण्यासाठी आरटीई कायद्यात सुधारणा करा. गुणवत्ता सुधारण्यासाठी, कार्यरत शिक्षकांसाठी रिफ्रेशर कोर्सेस आयोजित करा, इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार तीन टप्प्यात

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्या आहेत. आता त्या तीन टप्प्यात होण्याची शक्यता आहे. प्रभाग रचना आणि ओबीसी आरक्षणाची प्रक्रिया देखील पूर्ण झाली आहे. आयोगाला राज्यातील २९ महानगरपालिका, २४६ नगरपरिषदा, ३२ पंचायत समित्या आणि ४२ जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घ्यायच्या आहेत. सूत्रांच्या मते आयोग लवकरच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करू शकते.

पहिला टप्पा महानगरपालिका आणि नगरपरिषदांसाठी असेल आणि दुसरा जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी असेल. शेवटच्या तिसऱ्या टप्प्यात मुंबईसह सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुका असतील. वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर निवडणुकीच्या तारखा स्पष्ट होतील, परंतु न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाल्यास, आयोग जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल.हिवाळी अधिवेशनानंतर लगेचच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात निवडणुका होऊ शकतात असे म्हटले जात आहे. निवडणुका दोन टप्प्यात होण्याचीही शक्यता आहे. पहिला अंतिम टप्पा डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होऊ शकतो, त्यानंतर दुसरा टप्पा शेवटच्या आठवड्यात होऊ शकतो.

सर्व राजकीय पक्ष आगामी निवडणुकांसाठी सज्ज झाले आहेत. मोर्चे, निषेध आणि आरोप-प्रत्यारोपांचे वादळ निर्माण होत आहे. मत चोरी, ईव्हीएम छेडछाड आणि मतदार यादीतील दुरुस्ती यासारखे मुद्दे जोरात आहेत. राज्यातील दोन्ही आघाडीतील घटक पक्ष, महायुती आणि महाविकास आघाडी, आपापल्या रणनीती आखण्यात व्यस्त आहेत. सध्याचे चित्र असे दर्शवते की दोन्ही आघाडीतील सर्व पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याची तयारी करत आहेत. भाजप आणि कॉंग्रेसने आधीच स्वतंत्रपणे लढण्याचा त्यांचा मानस व्यक्त केला आहे. मुंबई निवडणुकीसाठी शिवसेना, युबीटी आणि मनसे एकत्र आले आहेत. भाजपने बूथ पातळीवर आपली तयारी पूर्ण केली आहे, तर कॉंग्रेसही आपली उपस्थिती दाखवत आहे. निवडणूक आयोग निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.

-------

## रजिया सुलताना यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती**- स्तंभलेखीका आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रजिया सुलताना ह्यांच्या मुक्ता साळवेच्या निबंधातील सामाजिक वास्तव या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच बालगंधर्व पुणे येथे झालेले आहे. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी माजी आमदार, लोककला व संत साहित्याचे अभ्यासक उल्हस पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणुन शिवस्फूर्ती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राजा चोपदार, ॲड शैलजा मोडक, प्रविण गायकवाड, ज्ञानेश्वर मोळक, सुरेश पाटील, नारायण मठाचे अण्णा महाराज मंचावर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते रजिया सुलताना ह्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झालेले आहे.कार्यक्रमाला मनोविकास चे प्रकाशक अरविंद पाटकर, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अन्वर राजन, भारूड सम्राट ह.भ.प. लक्ष्मण महाराज, राजगुरू आणि चळवळीतील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला भातकुलीत प्रारंभ

## आ.वानखडे यांच्या हस्ते रथाला हिरवी झेंडी

**टाकरखेडा संभू/ वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ भातकुली तालुक्यात आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते करण्यात आला. भातकुली पंचायत समितीच्या परिसरातून जनजागृती साठी 'जनजागृती रथ' (चित्ररथ) ला हिरवी झेंडी दाखवून अभियानाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. या रथाच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये अभियानाची माहिती आणि जनजागृती केली जाणार आहे.याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते राणा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बालासाहेब बायस, गटविकास अधिकारी तुषार दांडगे, सहायक बीडिओ प्रवीण वानखडे, सहायक बीडिओ सुनील गवई, सोपान गुडदे



आदी अधिकारी कमर्चारी उपस्थित होते.प्रास्ताविक बीडिओ तुषार दांडगे यांनी करताना अभियानाचे उद्दिष्ट व अंमलबजावणीची माहिती दिली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस यांनी ग्रामपंचायतींना पुरस्कार पात्रतेसाठी आवश्यक निकष, गुण प्रणाली आणि विविध योजनांचे मूल्यमापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी पंचायत विस्तार अधिकारी प्रल्हाद तेलंग, हरणे कर्मचारी मंचाने 'मुख्यमंत्री समृद्ध ग्राम' या विषयावर सादर केलेल्या गीताने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर आमदार राजेश वानखडे यांनी जनजागृती रथाला हिरवी झेंडी दाखवून दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली.या अभियानांतर्गत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर ग्रामपंचायतींना कोट्यवधी रुपयांच्या पुरस्काराने गौरविण्याची तरतूद असून, ग्रामविकासात उल्लेखनीय काम करणाऱ्या पंचायतांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. या कार्यक्रमाला सरपंच ,उपसरपंच, सदस्य, ग्राम सेवक, ग्राम रोजगार सेवक, आदींसह अंगण वाडी सेविका व बचत गटांच्या महिलांची देखील उपस्थिती होती.

# शिक्षक मतदार नोंदणीतील विसंगतीबाबत निवेदन

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या मतदार नोंदणी प्रक्रियेदरम्यान उद्भवलेल्या विसंगतींबाबत 'टीचर डेमोक्रॅटिक फ्रंट' तर्फे डॉ. प्रशांत विघे यांच्या नेतृत्वात मा. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त, अमरावती विभाग यांना निवेदन सादर करण्यात आले.

सन २०२६ मध्ये होणाऱ्या शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणीची प्रक्रिया सध्या सुरू असून ती ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. मात्र, या प्रक्रियेदरम्यान अमरावती विभागातील विविध तालुक्यांतील तहसील कार्यालयांकडून शिक्षक मतदार अर्ज स्वीकारताना काही ठिकाणी विसंगती आढळून आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.विशेषतः वरुड, यवतमाळ, मालेगाव, बुलढाणा आणि रिसोड या तालुक्यांमधील काही तहसील कार्यालयांकडून शिक्षकांचे अर्ज फेटाळले जात



असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

कारण म्हणून संबंधित शिक्षकांचे आधारकार्ड अमरावती विभागाबाहेरील असल्याने अर्ज स्वीकारला जाणार नाही, अशी भूमिका घेतल्याचे समोर आले आहे.

या संदर्भात डॉ. प्रशांत विघे यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, 'शिक्षक मतदार संघासाठीचा मुख्य निकष हा 'अर्जदार संबंधित विभागात शिक्षक म्हणून कार्यरत असणे' हा आहे, न कि त्याचा 'कायम रहिवास त्या विभागात असणे' हा. त्यामुळे इतर विभागातून अमरावती विभागात नोकरीसाठी आलेल्या शिक्षकांना आधारकार्डच्या पत्त्यावरून अपात्र ठरविणे ही अन्यायकारक व अयोग्य भूमिका आहे.' विघे निवेदनात पुढे म्हटले आहे की, शिक्षकत्व सिद्ध करणारी कागदपत्रे म्हणजे शाळा/महाविद्यालयाचे कार्यरत प्रमाणपत्र, नियुक्ती आदेश अथवा शिक्षण विभागाचे मान्यता आदेशही असावीत.

आधारकार्ड हे केवळ ओळखपत्र असून, मतदार पात्रतेसाठीचा प्रमुख पुरावा नाही.अमरावती विभागातील सर्व तहसीलदारांना एकसमान आणि स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, कार्यरत शिक्षकांचे अर्ज आधारकार्ड विभागाबाहेरील असले तरी स्वीकारावेत, मतदार नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि एकसमानता राखावी, जेणेकरून कोणताही पात्र शिक्षक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये.यावर प्रतिक्रिया देताना अप्पर आयुक्त हजारे म्हणाले की, मतदान नोंदणी करताना रहिवासाचा पुरावा आधार कार्ड आपल्या विभागातील नसेल तर, त्याला इतर पर्यायी देऊन फॉर्म सादर करता येईल अशा स्वरूपाच्या सूचना संबंधित अधिकाराला देण्यात असे यांनी आश्वासन दिले. जेणेकरून कोणी मतदान नोंदणी पासून वंचित राहणार नाही, असे आश्वासित केले.याप्रसंगी शिष्टमंडळात शिवसेना शिक्षक सेनेचे रुपेश टाले, दिपेश ,संदीप राऊत आदी शिक्षक होते.

## कुडोपटू अंशू शर्मा सिल्व्हर मेडलचा मानकरी

**अमरावती**- श्री गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती व्दारा संचालित प्रेमकिशोर सिकची विद्यालयाचा कुडोपटू अंशू कमलेश शर्मा याने नुकतेच सुरत (गुजरात) येथे झालेल्या १६ वी कुडो नॅशनल टूर्नामिंट-२०२५ मध्ये सिल्व्हर मेडल प्राप्त केले, तर अक्षयकुमार १७ वी कुडो इंटरनॅशनल स्पर्धेत ब्रांझ मेडल प्राप्त केले आहे.त्याने यशाचे मुख्याध्यापक राजेश पवार, क्रीडा शिक्षक अजय केवाळे व प्रशिक्षक असलम शहा यांना दिले आहे. अध्यक्ष वसंतकुमार मालपाणी, सचिव डॉ. गोविंद लाहोटी तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळा समिती अध्यक्ष प्रकाश हेडा, अभिनंदन केले.

# बालरंगभूमी परिषद शाखा अमरावतीची कार्यकारिणी जाहीर

**अमरावती / का.प्र.**

बालरंगभूमी परिषद शाखा अमरावतीची कार्यकारिणी जिल्हा प्रमुख विशाल रमेश तराळ यांनी जाहीर केली. अध्यक्ष मंगेश बक्षी, उपाध्यक्ष (प्रशासन) डॉ. श्याम देशमुख, उपाध्यक्ष (उपक्रम), कार्याध्यक्ष भूषण उंबरकर, प्रमुख कार्यवाह - विवेक राऊत, सह कार्यवाह रसिका वडवेकर वानखडे, शर्वरी पुरोहीत ठाकरे, कोषाध्यक्ष- स्वाती विशाल तराळ, प्रसिद्धी प्रमुख उदय चाकोते, सोशल मिडिया प्रमुख अनुराग वानखडे, कार्यकारिणी सदस्य - विलास पकडे, प्रथमेश वानखडे, अमित सोनारकर, पुजा देशमुख, जिल्हा प्रमुख व प्रवक्ता - विशाल रमेश तराळ तर मुख्य सल्लागार समिती एम. टी. देशमुख, संजिवनी पुरोहित, अजित





## अध्यक्ष मंगेश बक्षी, कार्यवाह विवेक राऊत, कोषाध्यक्ष स्वाती विशाल तराळ तर कार्याध्यक्ष भूषण उंबरकर

वडवेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

बालरंगभूमी परिषद, मुंबई ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांची घटक संस्था आहे. बाल रंगभूमी ही एक अशी संस्था आहे जी मुलांसाठी नाट्य आणि सादरीकरण कलांच्या विविध पैलूंमध्ये प्रशिक्षण आणि सादरीकरणाच्या संधी प्रदान करते. या संस्थांमध्ये मुलांना नाटक, अभिनय, नृत्य, संगीत आणि इतर सादरीकरण कलांमध्ये प्रशिक्षण दिले जाते आणि त्यांना मंचावर सादरीकरण करण्याची संधी दिली जाते.

बाल रंगभूमी मुलांच्या विकासासाठी एक उत्तम मार्ग आहे आणि त्यांना विविध कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकते.

आज बालरंगभूमी परिषद, मुंबईच्या ॲड. नीलम शिर्के सामंत यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात एकूण २७ शाखा कार्यरत आहे.

# एवढे अनर्थ एका कायद्याने केले

शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी का होतो? या प्रश्नाचे उत्तरही तेच आहे जे शेतकरी आत्महत्या का करतो, या प्रश्नाचे आहे. शेतकऱ्यांच्या दररोज आत्महत्या होतात, त्याची तुम्ही दखल घेतली नाही. असो, कर्जमाफीच्या निमित्ताने का होईना त्याचा विचार करायचे म्हणतात. हेही नसे थोडके. शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होतो, याला शेतकरी कारणीभूत नसून खुद्द सरकार कारणीभूत आहे हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. कमाल शेतजमीन धारणा कायद्यामुळे जमिनीचे विखंडन झाये आहे. आज सरासरी धारणा (होल्डिंग) २ एकर पेक्षा कमी झाली आहे. हे क्षेत्र आजच्या शेती पद्धतीत 'अन-इकॉनॉमिक' मानले जाते. हा सीलिंगचा कायदा कालबाह्य झाला आहे. तो आणला होता सरकारने, राबवला सरकारने, रद्द कोण करणार? सरकारलाच रद्द करावा लागेल. हा कायदा रद्द करणे राज्य सरकारच्या अधिकारात आहे. केवळ सीलिंग कायदाच नव्हे, त्याच्या जोडीला आवश्यक वस्तू कायदा ही तेवढाच राक्षसी आहे.

**आवश्यक वस्तू कायदा**

आवश्यक वस्तू कायदा- १९५५ हा कायदा जनतेला 'आवश्यक वस्तू' वाजवी दरात मिळाव्यात म्हणून आणला, असे सरकार तर्फे सांगण्यात आले होते, पण प्रत्यक्षात त्याचा लाभ गोरगरिबांना कधीच मिळाला नाही. उलट या कायद्याचा लाभ उठवून पुढारी व अधिकारी मात्र गब्बर झाले. आवश्यक वस्तू कायद्याचा वापर करून शेतमालाच्या किंमती पाडण्यात आल्या, या कायद्याच्या धास्तीने साठवणुकीच्या व्यवस्था निर्माण होऊ शकल्या नाहीत. या कायद्याचा आधार घेऊन नोकरशाहीने भरपूर भ्रष्टाचार केला, कृत्रिम टंचाईमुळे महागाई वाढली, बाजाराचे 'मागणी आणि पुरवठ्याचे' तत्व पायदळी तुडवले केले, बचत न राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले, म्हणून शेतकरी वारंवार कर्जबाजारी होतो. एवढे अनर्थ एका कायद्याने केले. आवश्यक वस्तू कायद्याने अनेक अनर्थ केले आहेत. त्यांचा आढावा पुढे घेण्यात आला आहे.




शेतमालाच्या किंमतीवर नियंत्रण- सरकार या कायद्याखाली धान्य, डाळी, तेलबिया, साखर इत्यादी वस्तूंवर साठवणूक, वाहतूक, दर नियंत्रण यासाठी सक्ती करू शकते. त्यामुळे व्यापारी आणि प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांकडून योग्य दराने खरेदी करत नाहीत. परिणामत: शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य बाजारभाव मिळत नाही आणि तोटा होतो. वारंवार तोटा होत राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले.

गुंतवणूक आणि साठवणुकीवर प्रतिकूल परिणाम-उद्योगपतींना भीती वाटते की, सरकार केव्हाही साठा 'जप्त' करू शकते. त्यामुळे कोल्ड स्टोरेज, वेअरहाउसिंग आणि अन्नप्रक्रिया उद्योगात गुंतवणूक करीत नाहीत. परिणामत: कृषी विपणन साखळी नीटपणे बनू शकली नाही आणि शेतमालाची नासाडी वाढली. शेती व्यावसाय अडचणीत आला.

बाजारात अनिश्चितता आणि भ्रष्टाचार-आवश्यक वस्तू कायद्यामुळे सरकारी अधिकारी वर्गाला साठेबाजी विरोधी व अन्य बाबतीत कारवाईचे अमर्याद अधिकार मिळाले आहेत, हे अधिकार मनमानी, भ्रष्टाचार आणि दडपशाहीसाठी वापरले गेले. परिणामत: प्रामाणिक व्यापारी व शेतकरी दोघेही त्रस्त झाले.

कृत्रिम तुटवडा आणि महागाई- जेव्हा सरकार बंधन घालते तेव्हा व्यापारी आपला माल बाजारात आणत नाहीत. पुरवठा कमी होतो, आणि कृत्रिम टंचाईतून कृत्रिम महागाई निर्माण होते. त्यामुळे जनतेला वस्तू महाग मिळतात. ज्या वस्तू 'स्वस्त मिळाव्यात' म्हणून कायदा बनवला गेला, असे सरकार म्हणत होते, त्याच कायद्यामुळे महागाई वाढू लागली. ही विपरीत परिस्थिती अनेकदा दिसून आली तरी कोणतेच सरकार त्याबाबत पुनर्विचार करीत नाही..

**कृषी बाजार व्यवस्थेतील हस्तक्षेप व विकृती**

बाजारात मागणी-पुरवठ्याच्या नैसर्गिक संतुलनावर सरकारी हस्तक्षेपामुळे दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकरी उत्पादनाच्या योजना आखू शकत नाहीत.कोणते पीक पेरावे, किती उत्पादन घ्यावे, याबाबत अनिश्चितता वाढते. हा कायदा लोकहितासाठी आहे, असा सरकारचा दावा असला तरी दीर्घकाळात त्याने शेतकऱ्यांच्या व्यावसाय स्वातंत्र्यावर, कृषी बाजारावर आणि गुंतवणुकीवर विपरीत परिणाम केला आहे, असे दिसून येते.

देशाचे नुकसान करणारा कायदा- आवश्यक वस्तू कायद्याने देशाला दुबळे बनवले आहे. या कायद्यामुळे देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली.

१) कायम दुरुपयोग-या कायद्याने सरकारला मिळालेल्या अधिकाराचा सातत्याने दुरुपयोग केला. ज्या कायद्याचा कायम दुरुपयोगच झाला असेल तर असा कायदा का कायम ठेवायचा? या दुरुपयोगाने देश क्षीण झाला आहे.

२) एक चाक रुतले-या कायद्याचा सर्वात जास्त फटका शेतकाऱ्यांना बसला. वाजवी भाव मिळाला नाही म्हणून शेतकऱ्याकडे 'बचत' राहिली नाही. बचत न राहिल्यामुळे तो 'ग्राहक' बनू शकला नाही. शेतकाऱ्यांची क्रयशक्ती क्षीण राहिल्यामुळे, देशी बाजार पेठेत मागणी कमी राहिली. मोठा ग्राहक वर्ग क्रयशक्ती अभावी बाजारापासून दूर राहिला. त्याचा भारतीय उत्पादकतेवर विपरीत परिणाम झाला. भारतीय अर्थ व्यवस्थेचे एक चाक कायम रुतलेले राहिले म्हणून विकासाचा वेग मंदावला.

३) मूल्यवृद्धीपासून वंचित- आवश्यक वस्तू कायद्यातील बंधनांमुळे ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग निर्माण झाले नाहीत. त्यामुळे शेतीमालाची नासाडी होत राहिली. शेतमालावर प्रक्रिया केल्याने होणाऱ्या मूल्यवृद्धीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकला नाही.

४) किसानपुत्रांची बेरोजगारी- आवश्यक वस्तू कायद्याने ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात मोठा अडथळा निर्माण केला. त्यामुळे किसानपुत्रांना रोजगार मिळू शकले नाही. ग्रामीण भागातील लोकांना सक्तीचे स्थलांतर करावे लागले. या स्थलांतराने शहरीकरणाचा नवा गंभीर प्रश्न निर्माण झाला. स्थलांतरित किसानपुत्रांमुळे शहरी व्यवस्थांवर नवे ताण आले.

५) भ्रष्टाचाराचे गटार-हा कायदा भ्रष्टाचाराचे गटार मानला जातो. या कायद्याने सरकारी अधिकाऱ्यांना दिलेले अवाजवी अधिकार व लायसन्स, परमिट, कोटा या पद्धतीच्या वापरामुळे आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात प्रशासकीय भ्रष्टाचार माजला. लोकपाल नेमल्याने भ्रष्टाचार कमी होणार नाही पण आवश्यक वस्तू कायदा रद्द केला तर या देशातील ८० टक्के भ्रष्टाचार नक्की संपेल. ही गटारगंगा दिल्ली पासून गल्ली पर्यंत वाहात आली आहे.

६) सरकार पोषित कारखानदारी- आवश्यक वस्तू कायद्यातील लायसन्स, परमिट, कोटा या पद्धतीने सरकार पोषित कारखानदारी निर्माण केली. या पद्धतीने राजकर्त्यांनी आपल्या बगलबच्च्यांना पोसले. बगलबच्या कारखानदारांनी देश काबीज केला आहे. कालपर्यंत वाटत होते की राज्यकर्ते कारखानदारांना संरक्षण देतात, आज कारखानदार जणू देश चालवत आहेत असे चित्र निर्माण झाले आहे.

७) राजकारणी उच्छाद-आवश्यक वस्तू कायद्याचे लाभार्थी असलेल्या लोकांनी आज राजकारणात उच्छाद मांडला आहे. सरकारी लायसन्स कोटा परमीत यांचा लाभ न घेतलेला राजकारणी क्वचित दिसेल. या उच्छादाला आपल्या देशातील निवडणूक पद्धतीने हातभार लावला आहे.

एकंदरीत, शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होण्याचे मूळ कारण सीलिंग, आवश्यक वस्तू या शेतकरीविरोधी कायद्यात आहे. आवश्यक वस्तू कायद्याने एका बाजूला अर्थव्यवस्था उद्धवस्त केली, शेतकाऱ्यांना उध्वस्त केले व त्याच बरोबर देशाचे मोठे नुकसानही केले. एवढे अनर्थ एका कायद्याने केले! असे कायदे कायम ठेवून तुम्ही कर्ज-बेबाकी केली तर शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होणारच.



**अमर हबीब,**
आंबाजोगाई
किसानपुत्र आंदोलन
मो. ८४११९०९९०९

# महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !

२ नोव्हेंबर २०२५ हा दिवस भारतीय महिला क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदवला जाणार आहे कारण यादिवशी भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवत विश्व विजयाला गवसणी घालत ऐतिहासिक कामगिरी केली. या क्षणाची प्रतीक्षा १४५ कोटी भारतीय गेली अनेक दशके करत होता. रविवारी नवीमुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने विजय मिळवून देशवासीयांना दिवाळीची अनोखी भेट देतील याची चाहूल शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यातच लागली होती. ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेमिना रॉड्रिग्स हिने अविश्वसनीय खेळ करून भारताला अंतिम फेरीत पोहचवले. अंतिम फेरीत भारताचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होता. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतीय संघ विश्चषकावर नाव कोरेल असा विश्वास देशवासीयांना होताच मात्र दक्षिण आफ्रिकेला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नव्हता कारण साखळीत या संघाने भारताला नमवले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी दिली. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी शतकी सलामी देऊन भारताला चांगली सुरुवात करून दिली. भारताची सलामीवीर शेफाली वर्माने धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या ७८ चेंडूत ८७ धावा केल्या विशेष म्हणजे ती भारताच्या मुख्य संघात नव्हती मात्र प्रतिका रावल ही दुखापतग्रस्त झाल्याने तिची भारतीय संघात निवड झाली आणि तिने मिळालेल्या संधीचे सोने केले. धडाकेबाज फलंदाजीसोबतच तिने दोन बळी घेऊन अष्टपैलू कामगिरी केली आणि सामनावीर किताब मिळवला. दीप्ती शर्मा या आणखी एका अष्टपैलू खेळाडूने अर्धशतक झळकावले आणि गोलंदाजीत ५ बळी मिळवले.

स्पर्धेत २०० च्या वर धावा आणि सर्वाधिक २२ बळी या तिच्या अष्टपैलू कामगिरीची दखल घेऊन तिला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. शेफाली आणि दीप्तीला स्मृती मानधना, हरमनप्रित कौर, जेमिना रॉड्रिग्ज, रिचा घोष यांची चांगली साथ दिल्याने भारताने २९८ धावा काढल्या. अंतिम सामन्यात या धावा पुरेशा ठरल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केल्याने भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी सहज नमवता आले. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा हिने झुंझार शतक झळकावत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला पण तिचे प्रयत्न अपुरे ठरले आणि भारताने ऐतिहासिक विजय मिळवत पहिल्यांदाच विश्वचषकावर नाव कोरले. भारतीय महिलांची ही कामगिरी महिला क्रिकेट संघासाठी संजीवनी देणारी ठरणार आहे कारण आपल्या देशात महिला क्रिकेटला कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. हा विश्वचषक असल्याने याचे थेट प्रेक्षपण केले गेले मात्र द्विपक्षीय मालिका टीव्हीवर दाखवल्या जात नाहीत. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात हेच या विश्व विजयाने दाखवून दिले आहे. याआधी भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी दोनदा विश्वचषक जिंकला आहे मात्र वरिष्ट संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश येत होते. दोनदा भारतीय संघ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचला होता मात्र त्या संघांना विश्व विजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते त्यामुळे भारताच्या वरिष्ट संघाला विजेतेपद मिळवणे शक्य नाही अशी टीका होत होती. साखळी फेरीतही भारतीय महिला संघाने सलग तीन सामने गमावल्या नंतर या संघावर टीका होऊ लागली मात्र भारताच्या महिला खेळाडूंनी या टीकेकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वांनाच चकित केले. भारतीय महिला संघाने फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर अप्रतिम कामगिरी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी या संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघाला विश्व विजयी करण्यात मोलाची कामगिरी बजावली. एकूणच सांघिक कामगिरी करून भारताने हा विश्वविजय मिळवला आहे. भारताच्या महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या महिला खेळाडूंच्या कामगिरीचा देशातील १४५ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच हरमनप्रित कौरच्या या संघाने करून दाखवले आहे. पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून भारताच्या या महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या महिला खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या महिला संघाने यापूर्वी देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात गांभीर्याने घेतले जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विश्व विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. पहिल्यांदाच विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!!

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५



# विश्वचषक विजेतेपद !

भारतीय महिला क्रिकेट संघाने नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्टेडियमवर खेळवल्या गेलेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाला पराभवाची धूळ चारली आणि अंतिम विजेतेपद पटकावून ५२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला क्रिकेट विश्वचषकावर आपले नाव कोरले.

या अंतिम सामन्यात भारताने २९९ धावांचे ठेवलेले आव्हान दक्षिण आफ्रिकेला पेलवले नाही आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद २४६ धावा करून तंबूत परतला. वास्तविक भारतीय महिला क्रिकेट संघ २००५ मध्ये (यजमान; दक्षिण आफ्रिका) पहिल्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचला होता, पण तेव्हा ऑस्ट्रेलियाने भारताला नमवले होते. होता आणि भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २०१७ मध्ये भारतीय संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला होता (यजमान; इंग्लंड) तेव्हा इंग्लंडने विजेतेपद पटकावून बाजी मारली होती. त्यामुळे महिलांच्या या पहिल्यावहिल्या विश्वचषक अंतिम विजेतेपदाला विशेष झळाळी प्राप्त झाली आहे. भारतीय संघातील सर्वच मुलींनी आपला सर्वोत्कृष्ट खेळ केला. आयसीसीकडून विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाला ३९.७८ कोटी रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत.

याशिवाय बीसीसीआयने महिला संघ आणि स्टाफला ५१ कोटी रुपये बक्षीस म्हणून देण्याचा निर्णय घेतला आहे. या पूर्वी ऑस्ट्रेलिया (सात वेळा), इंग्लंड (चार वेळा) आणि न्यूझीलंड (एकदा) या तीन संघांनी महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता. त्यात आता भारतीय महिला संघाची भर पडली आहे, ती समस्त भारतीयांसाठी सुखावह आणि अभिमानास्पद आहे.

**प्रदीप मोरे**

# क्रिकेट विश्वात महिलांचा अटकेपार झेंडा

२ नोव्हेंबर हा दिवस भारतीय क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून पहिल्यांदाच आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकला. संपूर्ण संघ दृढनिश्चयाने आणि भीतीशिवाय खेळला. क्रिकेट विश्वात भारतीय महिलांनी अटकेपार झेंडा रोवला दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला आणि पहिल्यांदा एकदिवसीय विश्व करंडक जिंकला गेल्या दीड वर्षात भारतीय पुरुष आणि महिलांची आयसीसीचे तीन करंडक जिंकून आपली मक्तेदारी सिद्ध केली.

प्रत्येक क्षेत्रात आज महिलांचा सहभाग वाढला आहे.कोणत्याच क्षेत्रात आज स्त्रिया मागे नाहीत.रिक्षा चालकापासून तर अंतराळक्षेत्रापर्यंत महिलांनी आपली भागीदारी सिद्ध करत आपले नाव नावलौकिक केले आहे.क्रिडा क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व होते.विशेष म्हणजे क्रिकेट सारख्या खेळात महिलांची सहभागिता फार कमी होती..क्रिकेट चे मैदान देखील आता स्त्रिया गाजवत आहे..नुकतेच महिला विश्व क्रिकेट मध्ये भारताच्या मुलीनी.दक्षिण आफ्रिका संघाला नमवून महिला विश्व कप जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

क्रिकेटच्या मैदानावर नेहमीच पुरुषांचे वर्चस्व राहिले आहे. ऑक्टोबर २०२१ पर्यंत क्रिकेटमध्ये बॅट्समन, थर्ड मॅन आणि नाईटवॉचमन हे शब्द वापरले जात होते. काळ बदलला आहे, प्रत्येक क्षेत्राप्रमाणे, भारतीय महिलांनी केवळ क्रिकेटच्या मैदानावरच स्वतःला सिद्ध केले नाही तर दोनदा क्रिकेट विश्वचषक फायनलमध्ये पोहोचून जगभरात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.आता तर विश्वकप जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली.

खेळाडू, प्रशिक्षक, प्रशासक आणि प्रेरणेचा स्रोत म्हणून क्रिकेटमध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची महत्त्वाची ठरत आहे. त्या मैदानावर कामगिरी करतात, खेळाच्या विकासात प्रशासक म्हणून योगदान देतात आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देतात. अलिकडेच, भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२५ चा महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकून इतिहास रचला, लिंग समानतेला प्रोत्साहन दिले आणि भविष्यातील महिला खेळाडूंसाठी मार्ग मोकळा केला.हरमनप्रीत कौरच्या फौजेने महिनाभर चालू असलेली विश्वविजयाची मोहीम फत्ते केली आहे. भारताच्या महिला क्रिकेट संघाने महिला विश्वचषक २०२५ च्या जेतेपदावर आपलं नाव कोरलं आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचं आव्हान परतावून लावत भारतीय महिला संघाने पहिलंवहिलं ऐतिहासिक जेतेपद पटकावलं आहे. कपिल देव (१९८३), महेंद्रसिंग धोनी (२००७, २०११), रोहित शर्मा (२०२४) या दिग्गजांच्या मांदियाळीत आता हरमनप्रीत कौरच्या नावाचा समावेश झाला आहे. नवी मुंबईतील नेरुळ येथील डी. वाय. पाटील अकादमी स्टेडियमवर ३५०००हून अधिक चाहत्यांच्या साक्षीने हरमनप्रीतने जेतेपदाचा करंडक उंचावला आणि देशभरातल्या क्रिकेटचाहत्यांच्या डोळ्याच्याकडा पाणावल्या.

महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेसमोर २९८ धावांचा डोंगर उभा केला होता. सलामीवीर शेफाली वर्माने ७८ चेंडूत ७ चौकार व २ षटकरांच्या मदतीने झटपट ८७ धावांची खेळी साकारली. तर, दीप्ती वर्माने अर्धशतकी खेळी (५८ चेंडूत ३ चौकार व एक षटकार) करत भारतीय संघाला विजय मिळवून दिला.भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिल्यांदाच एकदिवशीय विश्व करंडकावर मोहर उंटवली. या संस्मरणीय जेतेपदामध्ये मराठमोळ्या व्यक्तींचा मोलाचा वाटा लाभला आहे. मुंबई क्रिकेट मध्ये अमूल्य योगदान दिलेले अमोल मजुमदार यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाला मार्गदर्शन केले आहे. तसेच मुंबईचे माजी वेगवान गोलंदाज आविष्कार साळवी हे या विश्वविजेत्या संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक आहेत. याशिवाय फिटनेस ट्रेनर म्हणून आनंद दाते यांनी काम पाहिले अनिरुद्ध देशपांडे यांच्याकडे ॲनालिस्टची जबाबदारी होती.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

## वैकुंठ चतुर्दशी

कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्दशी तिथीला वैकुंठ चतुर्दशीचा सण साजरा केला जातो. यावर्षी वैकुंठचतुर्दशी मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी आहे.हा दिवस पुष्कळ महत्त्वाचा आहे कारण या दिवशी भाविकांसाठी वैकुंठाचे दरवाजे उघडे असतात, असे मानले जाते. जो भक्त या दिवशी थोडीशीही विष्णुभक्ती करतो, त्याच्यासाठी वैकुंठधामात स्थान मिळणे सुनिश्चित आहे. श्रीविष्णूचे ध्यान आणि त्याच्या कथेच्या श्रवणाने समस्त पापांचा नाश होतो, तसेच वैकुंठ धामाची प्राप्ती होते. या दिवशी श्री विष्णूचा नामजप 'श्री विष्णवे नमः।' किंवा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' किंवा अन्य कोणत्याही रूपाचा नामजप, विष्णूसहस्त्रनाम स्तोत्र किंवा श्री रामरक्षा यांचे पठण किंवा अगदी काहीच शक्य नसल्यास श्री विष्णूची मानसपूजा आणि भावपूर्ण प्रार्थना असे प्रयत्न आपण करून श्री विष्णूची कृपा प्राप्त करण्याचा प्रयत्न करू शकतो.

**आदिती देखणे**

## त्रिपुरी पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला, या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे असून त्याला अभेद्य तट होता. देवांनी भगवान शंकराची प्रार्थना केली. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पोर्णिमा असे म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच , आनंदोत्सव साजरा करतात.त्रिपुरारी पौर्णिमेला मोठ्या उंच दगडी खांबाला सभोवती दिवे लावण्याची व्यवस्था करून तिथे दिवे लावले जातात. हा दिवस भगवान शंकरानी जे सामर्थ्य दाखवुन त्रिपुरासुरा च्या त्रासातून देवांना आणि इतरांना मुक्त केले त्यामुळे हा दिवस दिपोत्सवाच्या रूपात साजरा केला जातो.

**वर्षा आवदे**

## अंधःकारातून प्रकाशाकडे

त्रिपुरारी पौर्णिमा हा उत्सव कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी भगवान शंकरांनी त्रिपुरासुर या दैत्याचा नायनाट केला, म्हणून या दिवसाला त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हटले जाते.त्रिपूर नावाच्या राक्षसाने ब्रह्मदेवाची कठोर आराधना करून त्यांची कृपा प्राप्त केली. त्याने ब्रह्मदेवाकडे अमरत्वाचे वरदान मागितले.तो अत्यंत अहंकारी झाला आणि देवतांचा छळ करू लागला. अगदी श्रीविष्णूलाही त्रिपुराचा सामना करता आला नाही.तेव्हा भगवान शंकरांनी तीन दिवस प्रखर युद्ध करून कार्तिक शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी त्रिपुरासुराचा वध केला. तेव्हापासून दरवर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. या दिवशी उंच दगडी खांबांच्या दिवे लावले जातात.पवित्र स्नान, दीपदान आणि भगवान शंकराची पूजा केली जाते.

तेजाचे अधिष्ठान असलेला हा दीपोत्सव श्रद्धेने साजरा करू या. मनातील अंधःकार, दुष्प्रवृत्ती आणि अहंकार यांचा नाश होऊन अंतःकरण निर्मळ व्हावे, अशी या शुभ पौर्णिमेच्या निमित्ताने भगवान शंकराच्या चरणी प्रार्थना करू या.

**प्रिया बागडदेव**

# ॲड. आंबेडकर यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह पोस्ट करणा–यांवर गुन्हा दाखल करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

***बहुजन नेते ॲड. प्रकाश आंबेडकर आणि सुजात आंबेडकर यांच्या विरोधात सोशल मीडियावर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह पोस्टप्रकरणी वंचित बहुजन आघाडीने कडक भूमिका घेतली आहे. या प्रकरणात संबंधित व्यक्तींवर अनुचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी ॲक्ट) तसेच इतर लागू कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करत अकोट शहर व अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.***



ही तक्रार वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चरण इंगळे आणि लता कांबळे यांनी दाखल केली. तक्रारीनुसार काही फेसबुक पेजेस तसेच व्यक्तींनी अँड. प्रकाश आंबेडकर आणि सुजात आंबेडकर यांच्या विरोधात अवमानकारक, बदनामीकारक आणि समाजात तणाव निर्माण करणारे व्हिडिओ प्रसारित केले आहेत. हे व्हिडिओ २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, समाजात असंतोष आणि द्वेष पसरवण्याचा हेतू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात भारतीय दंड संहिता कलम २९९, १९६, ३५७, तसेच इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट आणि ॲट्रॉसिटी ॲक्ट १९८९ च्या कलम ३(१)(r)(s) अंतर्गत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रार दाखल करताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, लता कांबळे, शोभा शेळके, निलेश झाडे, प्रमोद सोनोने, तुषार पाचकोर, देवानंद फुसे, संभा थोरात, युवा तालुकाध्यक्ष आशिष रायबोले, महाचिव अमन गवई, जावेद बागवान, रोहित धांडे, सुनील घनबहाद्दूर, सुभाष तेलगोटे, केशव बिलविले, निखिल गावंडे, मंगेश चिखले, विनायक भरक्षे, सचिन सरकटे, मनोहर शेळके, दिनेश सरकटे, हिरा सरकटे, विकी धाडे, स्वप्निल दहिभात, भाऊराव धांडे, भूषण रंधे, अजिज अहेमद, करूणा तेलगोटे, विनोद नांदुरकर, प्रेम भटकर, राजू भटकर, शारदा वानखडे, मंगला खांडेकर आणि प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे यांचा समावेश होता. वंचित बहुजन आघाडीने या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# वणी येथे सहभागात्मक मूल्यांकन सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न कृषी महाविद्यालय, अकोला येथील सत्र सातमधील विद्यार्थ्यांनी वणी (ता. व जि. अकोला) येथे सहभागात्मक मूल्यांकन सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी गावातील शेती, नैसर्गिक व मानवी संसाधने, सामाजिक व आर्थिक स्थिती तसेच गावातील विविध समस्यांचा सखोल अभ्यास केला. गावकऱ्यांच्या सहभागातून विद्यार्थ्यांनी लोकसंख्या, साक्षरता, शेती पद्धती, जमिनीची गुणवत्ता, पाण्याची उपलब्धता आणि ग्रामविकासासंबंधी महत्त्वाची माहिती संकलित केली.



या सर्वेक्षणाचे नियोजन कृषी महाविद्यालय, अकोला येथील सत्र सातच्या विद्यार्थ्यांनी केले असून, यात आशीष शर्मा, ब्रिजेश तिवारी, अभिषेक यादव, लोकेश कुमार, विकास नागर, अनिल कुमार, अश्वनी कुमार आणि कोमारी बालकृष्ण या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

सदर कार्यक्रमासाठी डॉ. संजय भोयर (सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, अकोला), डॉ. गिरीश जेऊघाले (शिक्षण विभाग प्रमुख), डॉ. वैभव उज्जैनकर (कार्यक्रम अधिकारी) आणि डॉ. अनिल खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या सहभागात्मक उपक्रमाचे गावकऱ्यांनी व महाविद्यालयीन अधिकाऱ्यांनी कौतुक केले.


**NAME CHANGE**

I Have change my name from **MOHD IRSHAD ABDUL SATTAR** As per old passport name to **MOHAMMAD IRSHAD ABDUL SATTAR** New name as per on two photo ID. my passport no is **K5421323** my Residence Address is - police Station ke piche paith mohalla ward no 17 Nandura Dist. Buldana -443404

**CHANGE IN NAME**

I have Changed My Name Form **RAVIKUMAR PANDEY** TO **RAVI PANDEY** My residential Address in Sarkari godaun mange,pardesi pura khadan Akola 444001

**Change In Name**

My Old name was **ABDUL ZAMEER ABDUL RASHEED** now my new name is **ABDUL NASEER ABDUL RASHEED** Address Amin Pura Akot Dist Akola 444101 ( M S )


# मूर्तिजापूर येथे क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचे वाटप

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उप जिल्हा रुग्णालय येथे आमदार हरिष पिंपळे यांच्या हस्ते पोषण आहार कीटचे वाटप करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ राजेंद्र नेमाडे, नंदुभाऊ राऊत, हर्षल साबळे, बंडूभाऊ लांडे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत 'निक्षय मित्र' उपक्रम सुरु आहे. क्षय् रुग्णांना सामुदायिक सहाय्य हा आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाचा एक महत्वाचा उपक्रम आहे.



रुग्णांना अतिरिक्त सहाय्य मिळावे या करिता आमदार हरिष पिंपळे यांनी क्षय रुग्णांना दत्तक घेऊन पोषण आहार कीट वाटप करण्यात आले.

पोषण आहार कीटमध्ये गहू, तुरडाळ, शेंगदाणे, तेल, मटकी, गूळ आदींचा समावेश असतो. हा उपक्रम डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा मार्गदर्शनात सुरु आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुधीर कराळे,राजेंद्र दारोकार, वसंत उन्हाळे, हरिष बंड, सचिन पाटील आदींचे उपक्रमाला सहकार्य लाभले.

समाजातील सहकारी संस्था, कॉर्पोरेट कंपनी, एनजीओ, वैयक्तिक व्यक्ती, लोकप्रतिनिधी या सर्वांनी उपक्रमामध्ये सहभागी होऊन निक्षय मित्र बनवून क्षय रुग्णांना सहाय्य करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा यांनी केले आहे

# संभाजीनगर येथील डेक्कन एंटरप्राईजेस यांना अकोला न्यायालयाकडून २,२९,४२२ रकमेचा दंड

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोल्यातील न्यायालयात दाखल झालेल्या धनादेश उडाल्याच्या (चेक बाउंस) प्रकरणात न्यायालयाने फिर्यादीच्या बाजूने निकाल देत आरोपीला दोषी ठरविले आहे. या निर्णयात न्यायालयाने आरोपींना २,२९,४२२ इतक्या भरपाईचा दंड तसेच १२ महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

फिर्यादी आर. बी. इंटरप्राईजेस हे व्यावसायिक असून ते ग्राहकांना उधारीवर माल पुरवित असतात. त्यांनी आरोपी मिनाज भाई यांच्या डेक्कन एंटरप्राईजेस, संभाजीनगर या फर्मला १,१४,७११ किमतीचा माल उधारीवर दिला होता. त्याबदल्यात आरोपीने सही केलेला धनादेश दिला होता. मात्र, तो धनादेश बँकेत जमा केल्यानंतर 'अकाउंटमध्ये अपुरे पैसे' या कारणावरून अपूर्ण राहिला.यानंतर फिर्यादीने कायदेशीर नोटीस देऊनही रक्कम न भरल्यामुळे न्यायालयात दावा दाखल केला. प्रकरणाची सुनावणी ९ वे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी श्री. संजय मुळीक यांच्या न्यायालयात झाली. फिर्यादीतर्फे ॲड. सुमित महेश बजाज यांनी प्रभावीपणे बाजू मांडत ठोस पुरावे सादर केले. त्यांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने फिर्यादीचा दावा ग्राह्य धरत आरोपी मिनाज भाई (डेक्कन एंटरप्राईजेस, संभाजीनगर) यांना दोषी ठरवले. या प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. वर्षा सरदार, ॲड. अजय भारसाकळे आणि ॲड. शुभम कर्डिले यांनी सहकार्य केले.

## अंतिम मतदार यादी अकोला जिल्ह्याच्या संकेतस्थळावर

**अकोला :** जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. मतदार यादी त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समिती मधील निवडणूक विभाग व निर्वाचक गणाकरीता दि. १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून अंतिम मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

# शासकीय आश्रमशाळांत रिक्त पदांवर भरती

**अकोला :** अकोला येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या अकोला, वाशिम व बुलडाणा या जिल्हयामधील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत आहेत. पदभरतीसाठी बाहयस्त्रोत संस्था मे. छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व मे. महाराष्ट्र विकास ग्रुप यांना आदेश देण्यात आले आहेत. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात एकूण ८ शासकीय आश्रमशाळा येत असुन सदर आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षक , पदविधर प्राथमिक शिक्षक, व माध्यमिक शिक्षक या रिक्त पदावर (कंत्राटी पदे) पात्र उमेदवारांना https://mvgcompany.in सदर लिंकवर अर्ज करण्यासाठी आवहन करण्यात येत आहे. उच्च माध्यमिक शिक्षक (भौतिकशास्त्र), माध्यमिक शिक्षक (मराठी व विज्ञान), पदवीधर प्राथमिक शिक्षक (इंग्रजी), प्राथमिक शिक्षक (सर्व विषय) तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी खाली दिलेल्या लिंकवर अर्ज करण्याची कार्यवाही दि. ८ नोव्हेंबरपूर्वी करावी.


## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १२२/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३१३६/२०२५ दि. २७/१०/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** कुशिनारा बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्ट, चिखली (मुर्तीजापूर) ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार -** सौ. मनिषा भारत राऊत रा. चिखली पो. सोनोरी ता.मुर्तीजापूर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदर चा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **९००/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे चा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ११५/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** गुप्तेश्वर सेवाधारी मंडळ सिरसोली ता. तेल्हारा जि.अकोला

**अर्जदार :** श्री. प्रवीण हरिभाऊ बोर्डे रा. सिरसोली ता. तेल्हारा जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन): **१०००/-रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालया चे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियतन आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०३/११/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.


# वडिलांचे स्वप्न साकार करत भूषण गोरे झाले चार्टर्ड अकाउंटंट!



■ प्रतिनिधी | अकोला ■

कष्ट आणि जिद्द यांची शिदोरी घेत आयुष्याचा प्रवास करणारे काही तरुण समाजाला प्रेरणा देतात. अकोला पोलिस दलातील दिवंगत हेडकॉन्स्टेबल स्व. बळीरामजी गोरे यांचा सुपुत्र भूषण बळीरामजी गोरे याने अगदी अशक्य वाटणारा शिखर गाठत चार्टर्ड अकाउंटंट (सीए) या प्रतिष्ठित परीक्षेत यश संपादन केले आहे. तो प्रमोद नगर कौलखेड येथील रहिवासी आहे. यावर्षी या परीक्षेचा निकाल केवळ २५ टक्के लागला आहे.

काही वर्षांपूर्वी अपघातात वडिलांचे दुःखद निधन झाले होते. त्या काळात संपूर्ण कुटुंबावर दुःखाचे सावट आले, परंतु या वेदनेलाच प्रेरणेत रूपांतरित करत भूषणने 'वडिलांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करायचे' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवले. आज तेच स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. भूषण यांनी अकोला येथील नोव्हेल कॉन्व्हेंट स्कूल मधून शिक्षण घेतले असून, इयत्ता दहावीमध्ये त्यांनी ९३ टक्के गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळवले होते. पुढील शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील नामवंत बी.एम.सी. कॉलेज ची निवड केली. अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षा, बौद्धिक उपक्रम आणि महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेत अनेक बक्षिसे आणि गौरव मिळवले. वडिलांच्या आठवणींना प्रेरणा मानत भूषण यांनी अथक परिश्रम घेतले आणि आज त्या परिश्रमाचे सोनं झाले आहे. त्यांच्या या यशाने अकोला जिल्हा तसेच पोलिस परिवारातही अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

'आमचा भूषण आता खऱ्या अर्थाने वडिलांचे स्वप्न पूर्ण करणारा भूषण ठरला आहे!' असे उद्गार कुटुंबीयांनी आनंदाश्रूंच्या माध्यमातून व्यक्त केले.

## कलियुगात भक्तिमार्ग श्रेष्ठ
### हभप सोहम महाराज काकडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रभप्राप्ती साठी ज्ञानयोग अर्थात ज्ञानाचा मार्ग, कर्मयोग म्हणजे कर्माचा मार्ग, व भक्तियोग म्हणजे भक्तीचा मार्ग हे मुख्य तीन मार्ग सांगितल्या गेले आहेत.

मात्र ज्ञान व कर्म तसेच योगमार्ग हे सत्ययुग,त्रेतायुग व द्वापर युगात अत्याधिक प्रभावी होते,या मार्गाचा प्रभाव कलियुगात नसून हे मार्ग आजच्या भक्तांसाठी क्लेशदायक आहेत.यापेक्षा साधा व सरळ मार्ग म्हणजे भक्तिमार्ग असून या भक्ती मार्गाची कास धरून सर्व संतानी प्रभूप्राप्ती केली असून सामान्य गृहस्थांनी पण भक्ति मार्गाच्या नाम स्मरण ची कास धरून प्रभू कृपा प्राप्त कारण्याचा हितोपोदेश हभप सोहम महाराज काकडे यांनी केला.

# सिंधी समाजाच्या अवमानना विरोधात आज जाहीर निषेध मोर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

छत्तीसगडचेत तथाकथित नेते अमित बघेल यांनी सिंधी समाजाविरुद्ध तसेच ईष्टदेवता भगवान श्री झूलेलालजी यांच्याबद्दल केलेल्या अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ सकल सिंधी समाजाच्या वतीने निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. पूज्य सिंधी जनरल पंचायत अकोला यांच्या वतीने आज मंगळवार दिनांक ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सिंधी कॅम्प रोडवरील बाबा हरदासराम भवन येथून हा निषेध मोर्चा निघणार आहे.समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक भावना दुखावणाऱ्या या वक्तव्याच्या विरोधात हा मोर्चा पोलिस मुख्यालयापर्यंत काढण्यात येईल आणि त्यानंतर पोलिस अधीक्षकांना निवेदन दिले जाईल. तसेच खदान पोलिस ठाण्यात अमित बघेल यांच्या विरोधात पोलीस तक्रार दाखल करण्यात येणार आहे.सिंधी समाजातील सर्व युवक व नागरिकांनी या निषेध मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन समाजाच्या एकतेचे प्रदर्शन करावे असे आवाहन पूज्य सिंधी जनरल पंचायत अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना अर्ज करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अल्पसंख्याक विकास विभागातर्फे डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेत सन २०२५-२६ या वर्षाकरिता विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छुक मदरशांनी शासन निर्णयानुसार विहीत नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रे जोडून जिल्हा नियोजन समिती, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे दि. १४ नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव २ प्रतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची यादी http:// mdd. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला

मुर्तिजापूर रोड, अकोला - ४४४००१
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/२६६८/ २०२५ दिनांक : ०३/११/२०२५

### निविदा सुचना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ३६ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत लंघापुर ५० गावे प्रादे. पा.पु. योजना Supply and installation with test & trail of Ultrasonic insertion type at WTP Khandla व अनुषंगीक इत्यादी कामे | रु.३,७३,७६०/- |
| २ | क्रमांक ३७ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत अकोट ८४ गावे प्रादे. पा.पु. योजना Supplying & recting flowmeter remote monitoring system with allid work at wan dam व अनुषंगीक इत्यादी कामे | रु.२,६०,९३१/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन मागविण्यांत येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. ०४.११.२०२५ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म. जी. प्रा. विभाग, अकोला


# लालाजींच्या स्मृती दिनी 'मातृशक्ती'ला आधार

## गिरिश गोखले यांच्या पुढाकाराने केवायसी कॅम्पचे यशस्वी आयोजन

**अकोला :** दिवंगत आमदार, माजी मंत्री गोवर्धन शर्मा अर्थात 'लालाजी' यांच्या दुसऱ्या स्मृती दिनाचे औचित्य साधत, स्थानिक माजी नगरसेवक ॲड. गिरीश गोखले यांनी मातृशक्तीच्या हिताचा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम हाती घेतला. लालाजींच्या जनसेवेच्या आणि अंत्योदया च्या शिकवणीनुसारच हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे गोखले यांनी स्पष्ट केले.राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण योजने' साठी महिलांना अत्यंत आवश्यक असलेले ई-केवायसी मोफत करून देण्याचा विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला. एकाच दिवशी या शिबिरात एक हजार हून अधिक महिलांचे ई-केवायसी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले.



माजी मंत्री डॉ. रणजीत पाटील यांनी या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले. गोर-गरीब आणि गरजू महिलांना सरकारी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी ॲड. गिरीश गोखले यांनी केलेले हे प्रयत्न अत्यंत स्तुत्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. 'जनसेवेसाठी समर्पित असलेले लालाजी यांचे कार्य पुढे नेण्याचे काम अॅड. गोखले करत आहेत. आजच्या काळात सरकारी योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी दूर करणे हे खऱ्या अर्थाने जनकल्याणाचे काम आहे,' असे गौरवोद्गार डॉ. पाटील यांनी काढले.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक ॲड. गिरीश गोखले म्हणाले, 'दिवंगत गोवर्धन शर्मा उपाख्य लालाजींनी आयुष्यभर गोर-गरीब जनतेची निःस्वार्थ सेवा केली. त्यांची 'जनकल्याण आणि अंत्योदय' ही शिकवण माझ्यासाठी प्रेरणास्रोत आहे. त्यामुळेच, दुसऱ्या स्मृती दिनानिमित्त कोणताही दिखावा न करता, थेट गरजू महिलांना लाभ मिळवून देणारा हा उपक्रम आम्ही हाती घेतला.' ई-केवायसीच्या या यशामुळे अनेक महिलांना 'लाडकी बहीण' योजनेचा त्वरित लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. माजी मंत्री डॉ. पाटील यांच्यासह अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिकांनी या उपक्रमास भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले. ॲड. गोखले यांच्या यशस्वी नियोजनामुळे हा कॅम्प सुरळीत पार पडला आणि परिसरातील महिलांनी या सेवेबद्दल त्यांचे आभार मानले.

ई केवायसी ची सोय गिरिश गोखले यांनी केल्याबद्दल मातृशक्तीने देखिल गोखले यांचे कौतुक केले. केवायसी काय हाच प्रश्न आम्हाला पडला होता. तो गोखले यांच्या टिमने अतिशय सोप्या पध्दतीने सोडविला. लाडक्या बहिण योजनेसाठी केवायसी कॅम्प आयोजिक केल्याबद्दल महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद या कॅम्पला दिला.


जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# भाजप-काँग्रेसचा दमदार सामना गफाट, संचारिया, बावनकर यांची पक्षांतर्गत शर्यत

## काँग्रेसकडून पवार-मोरे सज्ज मतदारांच्या चर्चांना उधाण

**आंजी (मोठी)/जनमाध्यम**
येथील जिल्हा परिषद सर्कल ओबीसी (नामनिर्दिष्ट) राखीव मतदारसंघात भाजप आणि काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांमध्ये उमेदवारीसाठी घमासान झडत असून गावागावांतील राजकारणाच्या पातळीवर तापमान वाढले आहे. निवडणुकीची घोषणा अद्याप झालेली नसली, तरीही या सर्कलमध्ये उमेदवारांच्या हालचालींनी निवडणूकपूर्व गुलाल उधळला आहे.



जि.प. सर्कल आंजी (मोठी)

भाजप शिबिरात सर्वाधिक गदारोळ दिसतो आहे. माजी जिल्हा परिषद सभापती जयश्री सुनील गफाट यांच्या कार्यकाळानंतर त्यांच्या पती आणि माजी जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांची पुन्हा उमेदवारी निश्चित मानली जाते. गफाट दांपत्याचे जिल्हाव्यापी संपर्क जाळे आणि मंत्री, आमदार ते खासदारांपर्यंतचे संबंध त्यांना प्रक्रिया लाभदायक ठरू शकतात. परंतु याच वेळी भाजपातील दुसरे दिग्गज जगदीश संचारिया आणि दीपक बावनकर हेही मैदानात उतरले आहेत.संचारिया हे दोन कार्यकाळ सरपंच आणि एकदा पंचायत समिती सदस्य राहिले आहेत, तर बावनकर तिनवेळा सरपंच तसेच त्यांच्या पत्नी उज्वला बावनकर माजी जि.प. सदस्य आहेत. त्यामुळे आंजी (मोठी) सर्कलमध्ये भाजपाची उमेदवारी 'घरच्या घरात' निश्चित होणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

कार्यकर्त्यांमध्ये तणाव आणि आतर्गत गटबाजीही डोकावते आहे. काँग्रेस शिबिरातही चळी वाढली आहे. माजी आमदार रंणजीत कांबळे यांचे निकटवर्तीय सतीश पवार आणि बोरगाव-सावळीचे माजी सरपंच महेश मोरे हे दोघेही जि.प. उमेदवारीसाठी तयारीत आहेत. पवार हे दोन-तीन कार्यकाळ ग्रामपंचायत सदस्य राहिलेले असून स्थानिक पातळीवरील कामामुळे ओळख निर्माण केली आहे. तर महेश मोरे हे आपल्या अनुभवावर राजकीय तोल सांभाळत आहेत. दरम्यान, अनुभवी नेता राजेंद्र डोळसकर यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष आहे.

या सगळ्या राजकीय हालचालींमुळे आंजी (मोठी) परिसरातील वातावरण प्रचंड तापले आहे. गावांचे कट्टे, बाजारपेठा, अगदी चहाच्या टपऱ्यांवरही एकच चर्चेचा विषय आहे कोणाला मिळणार तिकीट? भाजपातील अंतर्गत संघर्ष आणि काँग्रेसची रणनीती, या दोन्हींचा मुकाबला थेट मतदारांच्या मनावर होणार आहे. त्यामुळे येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आंजी सर्कल निर्णायक रणांगण ठरणार, हे निश्चित झाले आहे.

# भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्यांनाही मदतीचा लाभ द्यावा

## मनसेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**
जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत जाहीर केली असली, तरी ती फक्त सातबाऱ्यावर नाव असलेल्या जमिनमालकांपुरती मर्यादित आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जमिन कसणाऱ्या भाडेतत्त्वावर (मक्त्याने) शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेतून वंचित राहावे लागू शकते. या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात मनसेने शासनाकडे मागणी केली की, भाडेकरू शेतकऱ्यांनाही मदतीचा लाभ मिळाला पाहिजे.



नुकसानीचा पंचनामा तलाठीमार्फत थेट शेतावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून करण्यात यावा. तसेच ज्या शेतकऱ्यांकडे भाडेतत्त्वावर शेती करण्याचे लेखी हमीपत्र आहे, त्यांना त्याच आधारे अनुदान मंजूर करण्यात यावे.मनसेचे जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे यांनी सांगितले की, भाडेतत्त्वावर शेती करणारे शेतकरीच बियाणे, खते, औषधे व मजुरीवर खर्च करत असून अतिवृष्टीचा फटका त्यांनाच बसतो. त्यामुळे त्यांनाही आर्थिक सहाय्य मिळणे अपरिहार्य आहे.या निवेदनावेळी जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर, तालुका अध्यक्ष धर्मदीप हिवरकर, संघटक नितीन परतेकी, उपाध्यक्ष जीवन पोहनकर, शहर अध्यक्ष ओम क्षीरसागर, शहर उपाध्यक्ष राहुल नागोसे, सर्कल अध्यक्ष शंकर वासनिक, नितीन दाभेकर तसेच अमर व्यापारी, आर्यन बांगरे, सतीश व्यापारी, किशोर भुरे, मेहेर अळसपुरे, जयस दौड, वासुदेव अवचट आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**संक्षिप्त**

## शेतकऱ्याने विष प्राशन केले

**आर्वी -** तालुक्यातील धनोडी बहादूरपूर येथील एका शेतकऱ्याने कमी उत्पादन आणि बँक कर्जामुळे विष प्राशन करून आत्महत्या केली. यावर्षी जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचा जोर पुन्हा सुरू झाला आहे. धनोडी येथील रहिवासी वासुदेव नाना मुडे (६०) यांच्याकडे साडेपाच एकर जमीन होती. त्यांनी यावर्षी सोयाबीन आणि कापूस लावला होता. पीक खर्च भागवण्यासाठी त्यांनी रोहणा येथील बँकेकडून १,५०,००० रुपयांचे कर्ज घेतले होते. तथापि, अतिवृष्टी आणि विविध संसर्गामुळे सोयाबीनचे उत्पादन कमी झाले. मुडे यांना त्यांच्या कापूस पिकात रोग होण्याची शक्यता असल्याने काळजी वाटत होती. परिणामी, त्यांनी शुक्रवारी घरी विष प्राशन केले. हे कळताच त्यांना ताबडतोब आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, परंतु त्यांचा आधीच मृत्यू झाला होता.

# तळेगाव एसटी डेपोचा भोंगळ कारभार उघड

## दिवाळीनंतर शाळेच्या पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थी एसटी अभावी शाळेला मुकले

**कारंजा घाडगे/जनमाध्यम**
प्रवाशांच्या सेवेसाठी ब्रीद मिरवणाऱ्या तळेगाव (शा.प) एसटी डेपो चा भोंगळ कारभार सर्वत्र परिचित असतानाच दिवाळीच्या शालेय सुट्टीनंतर ३ नोव्हेंबर रोजी शाळेला सुरुवात झाली.परंतु शाळेत जाण्यासाठी एसटीची वाट पाहत असलेल्या अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एसटी न आल्यामुळे शाळेपासून वंचित राहावे लागले.



अनेक ग्रामीण भागात मध्ये शाळा सुरू असताना एसटी बसेस जातात शाळेला सुट्टीच्या दिवशी मात्र एसटी बसेस जात नाहीत. जेव्हा बसेस ग्रामीण भागामध्ये जात नाहीत तेव्हा ग्रामीण भागातील जनतेला मोठा त्रास सहन करावा लागतो जास्त पैसे देऊन खाजगी वाहनाने जाणे-येणे करावे लागते. परंतु ३ नोव्हेंबर पासून वर्धा जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा सुरू झालेल्या आहेत तरीही बऱ्याच गावांमध्ये कारंजा घाडगे येथून ग्रामीण भागात येणाऱ्या बसेस गावांमध्ये आल्याच नसल्याने अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीनंतर पहिल्याच शाळांपासून वंचित रहावे लागले.

अनेक माध्यमिक शाळांची आता दिवाळी नंतरची शालेय प्रथम सत्रांत परीक्षा सुरू असून विद्यार्थ्यांना एसटीच्या भोंगळ कारभारामुळे पेपर पासून सुद्धा वंचित राहावे लागते. तळेगाव एसटी डेपो ची ही नेहमीचीच समस्या असल्याने अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेकदा शाळांपासून वंचित राहावे लागते त्यामुळे तळेगाव एसटी डेपोच्या भोंगळ कारभाराला ग्रामीण भागातील जनता त्रासली असून या गंभीर बाबीकडे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आह. अशी विद्यार्थ्यांसोबतच पालकांची मागणी आहे

# आज संयुक्त आदिवासी संघर्ष कृती समितीचा मोर्चा

**वर्धा/जनमाध्यम**
संयुक्त आदिवासी संघर्ष कृती समितीच्या वतीने विविध मागण्याकरिता महाआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

जुने आरटीओ कार्यालय मैदान, बॅचलर रोड ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येईल. इतर जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यात येवू नये, आदिवासींच्या जमिनी किरायाने देण्याबाबतचा शासनानिर्णय तात्काळ रद्दकरण्यात यावा, आदिवासींच्या कल्याणाकरीता असलेल्या योजनांची रक्कम इतर योजनांकडे वळती करण्यात येवू नये, छोट्याा बिंदु नामावलीबाबत ६ मार्च २०२४ चा शासननिर्णय रद्द करूंन पुर्वरत बिंदु नामावली मध्ये सुधारणा करून शासन परिपत्रक २९ में २०१७ नुसार क्रमांक २ वर कायम ठेवण्या साठी सुधारीत शासन निर्णय काढण्यात यावा, वर्धा शहराच्या आदिवासी सांस्कृतिक भवनाकरीता १०,००० स्क्वेअर फुट जागा उपलब्ध करुन आदिवासी समाज भवन निर्माण करण्यात यावे आदी मागण्यांच्या अनुषंगाने हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे पत्रकात सांगण्यात आले.

# जिल्ह्यातील रेतीघाटांचा प्रस्ताव पर्यावरण विभागाकडे

**वर्धा/जनमाध्यम**
जिल्ह्यातील नागरिकांना रास्त दरात रेती मिळावी म्हणून ४२ रेती घाटांचा प्रस्ताव पर्यावरण विभागाला जिल्हा प्रशासनाच्या वतीने सादर करण्यात आला आहे. अद्यापही या प्रस्तावावर पर्यावरण विभागाने सकारात्मक किंवा नकारात्मक असा ठोस निर्णय घेतलेला नाही.

जिल्ह्यातील एकाही वाळू घाटाचा अद्याप लिलाव झालेला नसून नदी व नाल्यांचे पात्र पोखरून चोरीच्या रेतीची चढ्या दराने विक्री केली जात आहे. हाच रेती तस्करीचा गोरखधंदा जीव घेत आहे. देवळी तालुक्यातील अंदोरी येथील रवींद्र पारिसे हत्या प्रकरण पुढे आल्यानंतरही प्रशासनाची कोणतीच हालचाल नाही. वर्धा, वणा, वेणा, यशोदा, बाकळी आदी १२ प्रमुख नद्या तसेच नाल्यांच्या पात्रातून सध्या रेतीमाफियांकडून उत्खनन करीत चोरीच्या रेतीची चढ्या दराने विक्री केली जात आहे. या प्रकारामुळे शासनाचा मोठा महसूल बुडत आहे. रेती चोरांसह अवैध वाहतूक करणाऱ्यांवर पोलीस आणि महसूल विभाग धडक कारवाई करीत असले तरी महसूल विभागाला हे रेतीचोर घाबरत नसल्याचा प्रकार गुंजखेडा येथे घडला आहे. जिल्हा खनिकर्म विभागाकडून ९ ऑक्टोबरला पर्यावरण अनुमतीसाठी जिल्ह्यातील ४२ रेतीघाटांचा प्रस्ताव पर्यावरण विभागाला पाठविण्यात आला. त्यात आष्टी तालुक्यात ७, आर्वी तालुक्यात ३, देवळी तालुक्यात ११, समुद्रपूर तालुक्यात ८, हिंगणघाट तालुक्यात १३ घाटांचा समावेश आहे. हा प्रस्ताव सादर झाल्यावर एसईएसी व एसईआयएएच्या दोन बैठका झाल्या. त्यात कुठलाही ठोस निर्णय अद्याप घेण्यात आला नसल्याचे वास्तव आहे. नदी व नाले पोखरून चोरीच्या रेतीची अवैध वाहतूक सर्वाधिक हिंगणघाट व देवळी तालुक्यात होत आहे. शिवाय याच तालुक्यातून चोरीची रेती जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वर्धा शहरात आणून नागरिकांना चढ्या दराने विकली जात आहे. आष्टी तालुक्यातून अमरावती जिल्ह्यात जात आहे. या तालुक्यातील महसूल विभागातील बडे अधिकारी रेतीमाफियांवर धडक कारवाई करण्याचे टाळत असल्याने त्यांच्या कार्यप्रणालीवर पर्यावरणप्रेमींमध्ये उलट-सुलट चर्चा होत आहे.

# पुलगांव नाल्यांमध्ये कचऱ्याचे साम्राज्य

**पुलगांव/जनमाध्यम**
पुलगांव येथील प्रभाग क्र. ७ मधील सत्तार बाबा दरगाह शेजारील नाली अनेक दिवसांपासून कचऱ्याने तुडुंब भरली असून, त्यातील दूषित पाणी थेट डांबरी रस्त्यावर वाहत आहे. या मार्गावरून दररोज हजारो नागरिकांचे आवागमन होत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांना भयंकर त्रास सहन करावा लागत आहे.



स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतरही नगर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. शहरात स्वच्छता विभाग कार्यरत आहे की नाही, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. पुलगांवातील अनेक भागात रस्ते व नाल्या कचऱ्याने भरल्याचे चित्र दिसत आहे.नागरिकांच्या मते, नगर परिषदेत गेल्या चार वर्षांपासून 'प्रशासन राज' सुरु आहे. मुख्याधिकारी यांचे नागरिकांच्या सोयीसुविधांकडे नसून, केवळ नव्या कामांमध्ये कमिशन मिळविण्यावर केंद्रित असल्याचा आरोप केला जात आहे.नगरपरिषदेत प्रभावी देखरेख नसल्यामुळे अधिकारी बेलगाम झाले आहेत. पुलगांव शहरातील समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत, पण मुख्याधिकारी डोळेझाक करीत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.आता पुलगांवकरांचे लक्ष आमदार राजेश बकाणे यांच्याकडे लागले असून, गलिच्छ आणि निष्क्रिय प्रशासनाविरुद्ध ठोस पावले उचलली जातील, अशी जनतेची अपेक्षा आहे.

# सिंदी बाजार समितीला हमीभाव खरेदीची जबाबदारी

## शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्याचा नवा विश्वास

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**
कृषी उत्पन्न बाजार समिती सिंदी यांना शासनाच्या हमीभाव खरेदी (इएए) योजनेची जबाबदारी प्राप्त झाली आहे. ही कामगिरी मिळाल्याने स्थानिक शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या अंतर्गत ही योजना राबविण्यात येत असून राज्यातील २५ बाजार समित्यांना या योजनेची केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. नागपूर विभागातून नागपूर, हिंगणघाट, सिंदी आणि पुलगाव या चार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे.पूर्वी ही योजना सहकारी खरेदी-विक्री संस्थांमार्फत राबविली जात होती, परंतु बाजार समितीची सुविधा वापरली जाऊनही समितीला आर्थिक लाभ होत नव्हता. यंदा मात्र प्रत्यक्ष खरेदीची जबाबदारी बाजार समितीवर आल्याने तिच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.सभापती केशरीचंद खंगारे यांनी सांगितले की, ही योजना सिंदी बाजार समितीसाठी नवीन दिशा देणारी ठरेल. शेतकरी आणि समितीचे सर्व घटक यांच्या सहकार्याने ती यशस्वीपणे राबविण्यात येईल. खरेदी केंद्र सिंदी पिपरा रोड येथे सुरू करण्यात आले असून शेतकऱ्यांनी अद्यावत सातबारा, आधारकार्ड आणि आधार लिंक बँक पासबुकसह केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमाचे प्रशासकीय पाठपुरावा सचिव महेंद्र भांडारकर यांनी केला. महाराष्ट्र कृषि पणन मंडळ, पुणे आणि उपसरव्यवस्थापक सरोदे यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळाने आभार व्यक्त केले. समितीच्या सर्व सदस्यांनी या उपक्रमासाठी एकजुटीने परिश्रम घेतले आहेत.

# सुकळी स्टेशन ते तुळजापूर मार्गावर रेल्वेतून पडून एकाचा मृत्यू

**सेलू -** तालुक्यातील सुकळी स्टेशन ते तुळजापूर मार्गावरील रेल्वे लाइनवर रेल्वेतून पडून एकाचा मृत्यू झाला. ही घटना उघडकीस आली.सुकळी स्टेशन ते तुळजापूर मार्गावर अप लाईनवर पोल नंबर ७७८/२१-२३ जवळ रेल्वेचे पॉईन्टस मॅन रविंद्र जौजाळे यांना एक व्यक्ती मृत अवस्थेत आढळून आला. याची सुचना दहेगाव (गोसावी) पोलीसांना देण्यात आली. दहेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक फौजदार राजेश कंगाले, पोहवा नंदकिशोर दवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. घटनास्थळी निरीक्षण केले असता मृत व्यक्तीचे पँटमध्ये एक जुना वापरता मोबाईल, मृतक नेपाळी नागरीक असल्याचे प्रमाणपत्र आढळून आले.

संदीप अर्जुन थापा (३४), रा. नेपाळ असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मृत व्यक्तीचे मोबाईलवरून संपर्क केला असता त्याची ओळख पटली. मिळालेली कागद व लेखी तहरीरवरून दहेगाव पोलीस स्टेशनला मर्ग नोंद करण्यात आला. रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांचे रुग्णवाहीकेद्वारे त्याला उत्तीय तपासणीसाठी पाठविण्यात आले.

# महाबळा परिसरात रेतीमाफियांचा धुमाकूळ

**वर्धा -** नजीकच्या महाबळा येथील धामनदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा करून चोरलेल्या रेतीची चढ्या दराने वर्धा शहर व परिसरात विक्री होत असल्याचा प्रकार सावंगी पोलिसांनी केलेल्या कारवाई अंती पुढे आला आहे. त्यानंतर महसूल विभागाने येथील चोरीकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते, पण तसे होत नसल्याची ओरड सर्वत्र सुरू आहे. सावंगी पोलिसांनी येळाकेळी येथे कारवाई करून रेती भरलेला ट्रॅक्टर पडकला. चौकशी केल्यावर महाबळा येथील धामनदी पात्रातून रेतीची उचल करून त्याची चढ्या दराने विक्रीसाठी वाहतूक होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी रेती भरलेला ट्रॅक्टर जप्त केला. शिवाय सौरभ राजू फुन्ने, संदीप यशवंत महाकाळकर दोन्ही रा. महाकाळ यांच्याविरुद्ध सावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या कारवाईनंतर पोलिसांसह महसूल विभागाचे या परिसरावर लक्ष केंद्रित होणे आवश्यक होते. तसे न झाल्यामुळे रोज अनेक ट्रॅक्टरमधून येथून रेती चोरून नेण्यात येत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहे. रेतीच्या चोरीमुळे नदीचे पात्र विद्रुप होऊ लागले आहे. नदीपात्रात खड्डे तयार होऊन ते मनुष्याकरिता हानिकारक ठरत आहे. रेतीचोरी व वाहतुकीच्या कारणावरून व्यावसायिकांमध्ये सुरू झालेली स्पर्धा परिसराची शांती भंग करण्यास कारण ठरत आहे.

# रब्बी बियाणे खरेदीसाठी शेतक-यांना मिळणार प्रती हे.१० हजारांची मदत-पालकमंत्री


## २८२ कोटींचा प्रस्ताव शासनाला सादर, २३४५६१ शेतक-यांचा समावेश

**वर्धा/जनमाध्यम**
जून ते सप्टेंबर या महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले होते. या शेतक-यांच्या मदतीसाठी राज्य शासनाने पुढाकार घेत ३१ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. या पॅकेज अंतर्गत जिल्ह्यातील शेतक-यांना रब्बी पिकांची लागवड करण्यासाठी बियाणे व तत्सम खरीदीसाठी प्रती हे. १० हजार रूपयांची मदत तीन हे. पर्यंत करण्याबाबात २८२ कोटी १८ लक्ष रूपयांचा प्रस्ताव पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकरातून राज्य शासनाला सादर करण्यात आला. लवकरच ही मदत शेतक-यांना देण्यात येईल, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

जिल्ह्यात जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी, पूरामुळे शेत पिकांचे तसेच शेतक-यांच्या साधन सामुग्रीचे प्रचंड नुकसान झाले होते. राज्यात विदारक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजीत पवार यांनी शेतक-यांना मदतीचा आधार देण्यासाठी राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठे पॅकेज जाहीर करीत शेतक-यांना मदत देण्यासाठी ३१ हजार कोटी रूपयांची तरतूद केली. सदर तरतूदी अंतर्गत शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासोबतच रब्बीसाठी बियाणे खरेदीसाठी देखील मदत करण्यात येत आहे.

**१२९९ गावांतील शेतक-यांना मिळणार मदत**

माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत ३३ टक्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतक-यांना रब्बी हंगामामध्ये बियाणे व इतर अनुषंगिक बाबीकरिता प्रती हेक्टर १० हजार प्रमाणे अतिरिक्त निधी देण्यात येणार आहे.



जून ते सप्टेंबर या कालावधीत वर्धा तालुक्यातील १५५ गावातील २८ हजार ४२ शेतक-यांचे ४० हजार ४८० हे. मधील नुकसान झाले होते. सेलु तालुक्यातील १६९ गावातील २६ हजार ४८० शेतक-यांचे २९ हजार ४७९ हे. मधील, देवळी तालुक्यातील १५० गावातील २९ हजार ८१ शेतक-यांचे ४० हजार २१५ हे.चे, आर्वी तालुक्यातील १४७ गावातील २७ हजार १७८ शेतक-यांचे ३३ हजार २८० हेक्ट., आष्टी तालुक्यातील १५४ गावातील १८ हजार ८४४ शेतक-यांचे १४ हजार ५९४ हेक्टर. क्षेत्राचे, कारंजा तालुक्यातील १२० गावातील २७ हजार २१ शेतक-यांचे २६ हजार ३८३ हेक्टर क्षेत्राचे, हिंगणघाट तालुक्यातील १८७ गावातील ४१ हजार ९९ शेतक-यांचे ४७ हजार ५१९ हेक्टर क्षेत्राचे व समुद्रपूर तालुक्यातील २१७ गावातील ३६ हजार ८१६ शेतक-यांचे ५० हजार ३५७ हेक्टर क्षेत्रातील शेत पिकांचे नुकसान झाले होते.

या शेतक-यांना रब्बी हंगामासाठी मदत मिळावी यासाठी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी पुढाकार घेऊन जिल्हा प्रशासनाला राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने २८२कोटी १८ लक्ष रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे जिल्ह्यातील वंचित राहलेल्या वीस मंडळाचा देखील नुकसानग्रस्त पॅकेज मध्ये समावेश करण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन कटिबद्ध**

बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे. या वर्षी अस्मानी संकटामुळे शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या संकटातून शेतक-यांना बाहेर काढण्यासाठी राज्य शासन सर्वातोपरी मदत करीत आहे. याच मदतीचा भाग म्हणून खरीप हातचे गेल्याने रब्बीमुळे त्याला आधार मिळावा, यासाठी राज्य सरकार शेतक-यांना रब्बीचे बियाणे व अन्य बाबींसाठी प्रती हेक्टर ३ हेक्टर पर्यंत मदत करणार आहे. ही मदत शेतक-यांना लवकरात लवकर देण्यासाठी प्रयत्न करणार.

**डॉ. पंकज भोयर,** पालकमंत्री, वर्धा.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महावितरणमधील विद्युत सहायक पदासाठी प्रतीक्षा यादी जाहीर

## - ६ व ७ ला कागदपत्रांची तपासणी

**अमरावती :** महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी नियमानुसार ५० टक्के मर्यादित १८४७ उमेदवारांची प्रतीक्षा यादाr www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर शुक्रवारी (दि. ३१) जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या परिमंडल कार्यालयांमध्ये दि. ६ व ७ नोव्हेंबरला करण्यात येणार आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये ५ हजार ३८१ विद्युत सहायक पदासाठी दि. २० ते २२ मे दरम्यान ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. त्यानंतर उमेदवारांची निवड यादी व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली. या सर्व उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट व दि. ९ व १० सप्टेंबर दरम्यान पाच दिवसांत करण्यात आली.

निवड यादीतील उमेदवारांच्या प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणनिहाय अपात्रता, गैरहजर व इतर कारणांचा विचार करून कंपनी नियमानुसार जाहिरात केलेल्या पदाच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत दि. ३१ ऑक्टोबरला प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली आहे. तथापि दिव्यांग प्रवर्गाची निवड प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत 'परिस्थिती जैसे थे' ठेवण्याचा आदेश दि. १०/९/२०२५ ला दिव्यांग कल्याण आयुक्त यांनी दिला आहे. त्यानुसार या प्रतीक्षा यादीमध्ये दिव्यांग प्रवर्ग वगळण्यात आला आहे.

विद्युत सहायक पदाच्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये येत्या दि. ६ व ७ नोव्हेंबरला होणार आहे. या दोन्ही दिवशी संबंधित परिमंडलांमध्ये सकाळी १० वाजता मूळ कागदपत्रांची पडताळणी सुरू होईल. नमूद दिवशी काही कारणास्तव पडताळणी पूर्ण झाली नाहीतर दुसऱ्या दिवशी करण्यात येईल. तथापि, सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह संबंधित उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे.जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्रांच्या छाननी व पडताळणीमध्ये जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलांमध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची संपूर्ण माहिती व प्रतीक्षा यादी महावितरणाच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# अनुसूचित जातीच्या युवकांसाठी बार्टी पुरस्कृत मोफत उद्योजकता प्रशिक्षण

**अर्ज सादर करण्याची मुदत ६ नोव्हेंबर**

**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या विशेष प्रोत्साहन योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती व महिलांसाठी एक महिन्याच्या नि:शुल्क उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणादरम्यान उद्योजकीय विकास, उद्योगाची निवड, प्रकल्प अहवाल निर्मिती, मार्केटिंग, विविध शासकीय योजना, कर्जपुरवठा, डिजिटल मार्केटिंग आणि वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रशिक्षणासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता ८ वी उत्तीर्ण असून, वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे आहे. पदवी, पदविका किंवा आयटीआय झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे होणार आहे.

परिचय मेळावा व मुलाखत दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), टांक चेम्बर्स बिल्डिंग, गाडगेनगर, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.

## नगर पंचायत कार्यालय, ढाणकी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ

न.प.फोन नं.०७२३१-२४१०४१ Email ID : dhankinp|@gmail.com

### निविदा सुचना क्र.०५/२०२५-२०२६

नगर पंचायत ढाणकी च्या वतीने खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाचे तत्सम खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **बी-१** नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहे. कामाच्या निविदा केवळ द्वी-लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना नगर पंचायत ढाणकी नोटीस बोर्डवर व बांधकाम विभागामध्ये दिनांक ०४.११.२०२५ पासून पहावयास उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोरे निविदा किंमत | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | ढाणकी नगर पंचायत चे जुना साठलेला कचरा (Legacy Waste) यांचे शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे (Dumpsite Remodiation) | रु.१०००/- | ३०००/- | १८० दिवस |

(डॉ.अजय कुरवाडे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर पंचायत ढाणकी.

## नगर परिषद कार्यालय, दिग्रस, जि.यवतमाळ

क्रमांक/बांधकाम विभाग/नपदि/५१२/२०२५ दिनांक ०३.११.२०२५
emain :- npdigras@gmail.com दुरध्वनी क्र.०७२३४-२२२०५९

### जाहीर प्रकटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यामुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहीत याचिका क्र.७१/२०१३ ची सुनावणी दिनांक १३.१०.२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगर परिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्यूमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार दिग्रस नगर परिषद, दिग्रस, जि.यवतमाळ हद्दीतील नगर परिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यांवरील खड्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहीत याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | मुख्याधिकारी, नगर परिषद, दिग्रस | सदस्य |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ | सदस्य |

तरी दिग्रस नगर परिषद, दिग्रस, जि.यवतमाळ हद्दीतील नगर परिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यांवरील खड्यांबाबत दिग्रस नगर परिषद कार्यालयात तसेच npdigras@gmail.com या ई-मेल आयडी वर तक्रार दाखल करता येईल.

(अतुल पंत)
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद दिग्रस**

## ग्रामपंचायत कार्यालय, नांदगांव पेठ, पंचायत समिती, अमरावती, जि.अमरावती

सर्व नोदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत नांदगांव पेठ, पंचायत समिती अमरावती येथे २०२५-२६ या आर्थिक वर्षात १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत मंजूर प्राकलनानुसार बांधकाम करीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून बी-१ पध्दतीप्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १५ वा वित्त आयोग योजना | संजय खंडारे ते उमेश राऊत ते नामदेव खंडारे रस्ता बांधकाम करणे | ५०००००/- |
| २. | १५ वा वित्त आयोग योजना | गोसावी शाळा ते उर्दू शाळा रस्ता बांधकाम करणे | ३७५००२/- |
| ३. | १५ वा वित्त आयोग योजना | दर्याव शाळेकडे जाणारा रस्ता बांधकाम करणे | ५ लक्ष |
| ४. | १५ वा वित्त आयोग योजना | गोसावी शाळा ते मेन रस्ता बांधकाम करणे | ६ लक्ष |
| ५. | १५ वा वित्त आयोग योजना | गायगोले हातपंप ते कांबळे घराजवळ गुरांच्या टाक्या पर्यत नाली बांधकाम करणे | ९५००००/- |
| ६. | १५ वा वित्त आयोग योजना | शासकीय वसाहत वार्ड नं.४ नाली बांधकाम करणे | १२५५००६/- |
| ७. | १५ वा वित्त आयोग योजना | मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ता बांधकाम करणे | ८ लक्ष |
| ८. | १५ वा वित्त आयोग योजना | काळा मारोती मुलींची शाळा पेव्हींग ब्लॉक बसविणे | ४६२५०४/- |
| ९. | १५ वा वित्त आयोग योजना | पाणी पुरवठा विहीर जवळ वॉल कम्पौंड बांधकाम करणे | ८ लक्ष |
| १०. | १५ वा वित्त आयोग योजना | गणेश बुवा ते कयाने घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे | १३९८४९८/- |
| ११. | १५ वा वित्त आयोग योजना | जि.प.शाळा ते मेन रोड नाली बांधकाम करणे | ७ लक्ष |

**निविदा सादर करण्याची दिनांक ०४.११.२०२५ ते १०.११.२०२५ व निविदा उघडण्याची दिनांक ११.११.२०२५ ही आहे.**

**स्वा/-**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत नांदगांव पेठ,**
**पं.स.अमरावती, जि.अमरावती**

**स्वा/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत नांदगांव पेठ,**
**पं.स.अमरावती, जि.अमरावती**

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६६१/२०२५ ने.ता.२५/११/२०२५

अर्जदार -
१. **श्रीमती गुंफाबाई दिगांबरराव वाडेकर,** वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री.शिवदास दिगांबरराव वाडेकर,** वय ५२ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती

गैरअर्जदार-
१. **श्री देविदास दिगांबरराव वाडेकर,** वय ५४ वर्षे, धंदा - शेती
रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **सौ.राजकन्या रमेश गवळी,** वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.एस.टी.स्टॅन्डच्या मागे, जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पति तर अर्जदार नं.२ तसेच गैरअर्जदारांचे वडील नामे **दिंगाबर लक्ष्मणराव वाडेकर** हे **दिनांक ०३/०४/२०१९ रोजी खानापुर, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १६.१०.२०२५**

शिक्का
आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६३९/२०२५ **ने.ता.१८.१२.२०२५**

अर्जदार :
१. **प्राची राजेश दाभाडे,** वय २८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.देऊरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **नलिनी किसन अरबाड,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंजनगाव सुर्जी,. ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती
३. **शालिनी गुणवंत बेहरे,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **शिला निलेश केदार,**वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक दशरथराव नथ्थुजी खाजोने यांचा मृत्यू दि.११/०८/२०२५ रोजी पीडीएमसी हॉस्पिटल, अमरावती येथे झालेला असून ते शिरजगाव कसबा,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. तसेच **मृतक वेणुबाई दशरथराव खाजोने** हिचा **मृत्यू दि. १०/०७/२००९** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.६३९/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्रीमती आर.डी.सिंधनाळे २३ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २०५१/२०२५**
**श्री विनय अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०४.११.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1) **Vinay Shriram Joshi,** Age 63 yrs., Occu.- Retired,
R/o. 15/A/1, Top Floor, East Patel, Nagar, New Delhi-110008
At presnet R/o. Swarshree Apartment, Gawande Layout,
Sai Nagar, Amravati
2) **Niteen Shriram Joshi,** Age 58 yrs., Occu.- Service,
R/o. 16, Carr manor view, Moore Town,
Leeds-LS17, United Kingdom
At present R/o. Swarshree Apartment, Gawande Layout,
Sai Nagar, Amravati

-- विरुध्द -

गैरअर्जदार : - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रभा श्रीराम जोशी हे दि.१४/०२/२०२४ रोजी पुणे, ता.जि.पुणे येथे मयत झाले. अर्जदार विनय अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सहर्दू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री नियम अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ३१.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर सुचना

सर्व जनतेस तसेच बॅक,शासकीय तसेच निमशासकीय कार्यालय यांना या जाहीर नोटिसव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **करिष्मा हरीश जैस्वाल,** रा.लक्ष्मीनारायण कॉम्प्लेक्स, बस स्टॅन्ड जवळ, बिडकीन, ता.व जि.संभाजी नगर, पिन-४३११०५ मो.नंबर ८६००६७३५५१/८६०५६४५९१२ यांनी या दिलेल्या माहिती व अधिकारावरुन ही जाहीर नोटीस प्रसिध्द करतो ते येणेप्रमाणे -

माझे पक्षकार नामे **करिष्मा हरीश जैस्वाल** यांनी **सागर यशवंतराव दातीर** यांच्या सोबत प्लॉट खरेदी या व्यवहार करण्याचे ठरले असून, त्यांच्या या ताब्यातील व मालकीतील मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व अमरावती जि.प.च्या हददीतील ग्रामपंचायत असलेले मौजा राजुरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. ३८/१ मधील ० हे. ६१ आर सर्व्हे नं. ३९/२ अ मधील १ हे. ४१ आर, सर्व्हे नं. ३९/२ ब मधील १ हे ०१ आर,, सर्व्हे नं.३९/३ मधील २ हे.४३ आर व सर्वे नं.३९/३/ब मधील ० हे ८१ आर असे एकुण शेत जमिनीचे क्षेत्रफळ ६ हे २७ आर जमिनीचे मा.सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांचे पत्र क्र.अकृषक मौजा, राजुरा / ता व जि. अम/स.नं. ३८/१ व इतर/ ससंनर-अम/१९५०,आदेश पारित दि.५/१२/२०२२ नूसार अंतिम मंजूरी प्राप्त झाली आहे व वि.तहसिलदार साहेब, अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं.एन.ए.पी.३४/राजूरा-२६७/२०२२-२०२३,दि.०२/०१/२०२३ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या लेआउट मधील **शांतीवन** या नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील **खुले प्लॉट क्र.१५६ (एकशे छप्पन)** याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून या प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ १०३.३२ चौ.मि. (१११२.९४ चौ.फुट) आहे.

या प्लॉटची सामाईक चतुःसीमा -

पुर्वेस - लेआउट मधील रोड
पश्चिमेस - प्लॉट क्र.१४३
उत्तरेस - प्लॉट क्र.१५५
दक्षिणेस - प्लॉट क्र.१५७

वरील वर्णनाचा प्लॉट मालमत्ता माझा पक्षकार **(करिष्मा हरीश जैस्वाल)** यांनी **सागर यशवंतराव दातीर** यांच्या सोबत इसारपावती केली आहे व ११/११/२०२५ रोजी खरेदीखत नोंदविणार आहे.

तरी सर्व जनतेस व तसेच बॅंक, शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयय यांना या जाहीर नोटीसव्दारे सूचित करण्यात येते की, वरील उल्लेखित प्लॉट मालमत्तेवर कोणाचाही हक्क, बोजा, गहाण असेल तर त्यांनी दिनांक १०/११/२०२५ पर्यत वरील पत्त्या वर संपर्क करुन पोच घ्यावी,खरेदी नंतर कोणाचाही उजेर/आक्षेप चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**ॲड. चंद्रकांत अनिल उमक**
**मो.-९४२२६६४७५७**

## जाहीर नोटीस

**विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६४१/२०२५ **ने.ता.०८.१२.२०२५**

अर्जदार :
**१.ज्योत्सना दिवाकरराव काटोलकर,** वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
**२.सुरज दिवाकर काटोलकर,** वय ३२ वर्षे, धंदा - शेती
**३. प्रिया मयुर तायडे, वय ३० वर्षे, धंदा - नोकरी**
अर्जदार क्र.१ व २ रा.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.३ रा.केदार नगर देवमाळी परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक दिवाकर पुरुषोत्तम काटोलकर यांचा मृत्यू दि.१४/०४/२०२५ रोजी रा.हिरुर पुर्णा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे.** तसेच **मृतक गिताबाई पुरुषोत्तम काटोलकर हिचा मृत्यू दि.०८/११/२०२२** रोजी रा.हिरुर पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.६४१/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२९.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २४६९/२०२५**
**श्रीमती शंकुतला अधिक तीन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २८.११.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1) **Smt. Shakuntala Mangal Jadhav**
Age 56 yrs., Occu.- Household,
2) **Sumersing Mangal Jadhav**
Age 40 yrs., Occu.- Labour
3) **Amarsingh Mangalsingh Jadhav**
Age 38 yrs., Occu.- Labour
4) **Darasing Mangalsing Jadhav**
Age 36 yrs., Occu.- Labour
All Applicants are R/o. Pohara, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द -

गैरअर्जदार : - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मंगल दामा जाधव हे दि.२१/०९/२०२५ रोजी पोहरा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शंकुतला अधिक तीन विरुध्द निरंक** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शंकुतला अधिक तिन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ३१.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५१६/२०२५ ने.ता.११/११/२०२५

अर्जदार -
१. **श्रीमती संध्या मधुकरराव निचित,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री.राहुल मधुकरराव निचित,** वय ३४ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.सावरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.मोनिका स्वप्नीलराव गावंडे,** वय ३२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी., जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पति तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **मधुकर देविदास निचित हे दिनांक २७/०३/२०२३ रोजी सावरखेड, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ३०.०७.२०२५**

शिक्का
आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६१३/२०२५ ने.ता.१५.११.२०२५

अर्जदार :
१. कमला सावळाराम कुऱ्हाडे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. सुरेश सावळाराम कुऱ्हाडे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. अशोक सावळाराम कुऱ्हाडे,(मयत)
३.अ) जयश्री अशोक कुऱ्हाडे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३.ब) कार्तिक अशोक कुऱ्हाडे, वय १४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३.क) गौरी अशोक कुऱ्हाडे, वय १२ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३.ब) व ३.क) तर्फे अ.पा.क.आई जयश्री अशोक कुऱ्हाडे
नं.२ ते (३.क) सर्व रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. निर्मला श्रीकृष्ण कोमरेकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.B/504/S Floor Tony Mansion Tower कारवाले नगर, ठाणे, ता.जि.ठाणे

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सावळाराम रामजी कुऱ्हाडे** यांचा मृत्यू दिनांक **२९.०८.२०२४** रोजी तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला.तसेच **मृतक अशोक सावळाराम कुऱ्हाडे** यांचा दि.**११.११.२०२२** रोजी सुपा, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६१३/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.१०.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.सिदनाळे, २३ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८२७/२०२५
**श्रीमती वंदना अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०४.११.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Vandana Rajendra Dahake, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o Sanmati Colony, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Sakshi Rajendra Dahake, Age 28 Yrs. Occu.: Education
R/o Manomay Apartment, Flat No.202, Tower Line, Pundlikbaba Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati
3. Vimlabai Marotrao Dahake, Age 76 Yrs. Occu.: Household
R/o At Post Vani, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **राजेंद्र मारोतराव डहाके** हे दिनांक 02.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२५९/२०२५
**अशोक -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. अशोक शामलालजी केडिया, वय ७२ वर्षे, व्यवसाय - व्यवसाय
रा.लोकमान्य कॉलनी, होली क्रॉस शाळेजवळ, कॅम्प रोड, अमरावती
२. सुरेश शामलालजी केडिया, वय ७२ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
रा.हाऊस नं.११/२,लोकमान्य कॉलनी, कॅम्प रोड, अमरावती
३. विजय शामलालजी केडिया, वय ६९ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.टेलिकॉम कॉलनी, पार्वती नगर, साईनगर, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शामलाल मोहनलालजी केडिया** यांचे दिनांक **२४.१०.२०१४ व गीता शामलाल केडिया** हिचे दिनांक **१३.०३.२०२२** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अशोक शामलालजी केडिया व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अशोक शामलालजी केडिया व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले यांचा सत्कार

**लेहेगाव -** गेल्या दोन वर्षापासून शिरखेड पोलीस स्टेशन मध्ये ठाणेदार पदी कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष ठाणेदार सचिने लुले साहेब यांचे नुकतेच पोलीस निरीक्षक पदी प्रमोशन झाल्याने त्यांची बदली नागपूर येथे झाली. असून त्या प्रित्यर्थ लेहेगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समिती मोर्शी चे उपसभापती संजयभाऊ तट्टे यांचे निवासस्थानी त्यांच्या मातोश्री माजी पंचायत समिती सदस्या विमर्ला भाऊजी तट्टे पाटील यांचे हस्ते शाल श्रीफळ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती मोर्शीचे उपसभापती संजयभाऊ तट्टे. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यां विर्द्या तट्टे. ग्रा. प ।सदस्य रणजीत तटटे. श्रिकृष्ण तट्टे, राजेंद्रा तायवाडे .पत्रकार कैलास ठाकूर, अमित इंगळे, विशाल तटटे यांचे उपस्थितीत कार्यक्रम झाला.

### जि.प.शाळेच्या माजी विद्यार्थ्यांने शाळेला दिला सीसीटीव्ही कॅमेरा भेट

**अमरावती -** नांदगाव खंडेश्वर पं.स.मधिल लोणी टाकळी केंद्रांतर्गत येणाऱ्या जि.प.हिवरा बू. शाळेतील माजी विद्यार्थ्याने स्वतःच्या गावातील जिल्हा परिषद शाळेला स्वखुशीने सीसीटीव्ही कॅमेरा भेट दिलेला आहे. माजी विद्यार्थ्याने शाळेला भेट दिलेला सीसीटीव्ही कॅमेरा हा विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अनमोल आहे. यामुळे शाळेच्या परिसराचे संरक्षण होईल. रात्रीच्या वेळी शाळेच्या परिसरासमोर बसून टवाळकी करणाऱ्या आणि खर्रा खाऊन थुंकणाऱ्यावर हा कॅमेरा लक्ष ठेवणार असल्याने त्यांना चपराक बसल्याशिवाय राहणार नाही.शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी रोशन रामटेके यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि लोकसहभागातून असेच सहकार्य मिळाले तर आपली जिल्हा परिषद शाळा जिल्ह्यात अग्रेसर झाल्याशिवाय राहणार नाही.असे मत सूरज वाघमारे यांनी मत व्यक्त केले.

### गोठ्यातून बैल चोरी

**चांदूर बाजार -** दरवाजा नसलेल्या गोठ्यातून अज्ञात चोरट्याने बैल चोरून नेल्याची घटना चांदूरबाजार येथे ३० ऑक्टोबरच्या रात्री घडली.श्राजकुमार मारोतराव रूद्रकार (६०) रा. चांदूरबाजार असे फिर्यादी शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या मालकीचा बैल बांधण्याचा गोठा आहे; परंतु त्या गोठ्याला दरवाजा बसविलेला नाही. अज्ञात चोरट्याने गोठ्यातून ६ वर्ष वयाचा बैल चोरून नेला. त्याची अंदाजे किंमत ३० हजार रूपये आहे. रूद्रकार यांच्या तक्रारीवरून चांदूरबाजार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### थांगतापट्ट कीर्ती पवार राष्ट्रीय स्तरावर

**अमरावती-** गोवा मडगाव येथे पार पडलेल्या ३१ व्या सब ज्युनियर नॅशनल थांगता चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत प्रेमकिशोर सिकची विद्यालयाची कीर्ती पवार सहभागी झाली होती. तिने आपल्या उत्कृष्ट प्रदर्शन करुन तिची राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.ती आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक राजेश पवार क्रीडा शिक्षक अजय केवाळे व प्रशिक्षक महावीर धुरंधर यांना देते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतकुमार मालपाणी, सचिव डॉ. गोविंद लाहोटी तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळा समिती अध्यक्ष प्रकाश हेडा पर्यवेक्षिका सीमा व्यास, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

### संजय घाणेकर यांची नियुक्ती

**अमरावती -** चांदूर रेल्वे पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता संजय घाणेकर यांची जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागात कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली. मूळ पदभार कायम ठेवून त्यांना या पदाचा अतिरिक्त प्रभार सांभाळावा लागणार असून त्यांनी या पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. सध्या या पदाचा अतिरिक्त प्रचार लघुसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव यांच्याकडे सोपवण्यात आला होता. घाणेकर यांची नियुक्ती झाल्यानंतर अतिरिक्त पदभार काढून घेण्यात आला आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले आहे.

# वीज चोरी प्रकरणी ग्राहकांना ११ लाख ४८ हजाराचा दंड

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

दर्यापूर वीज वितरण कंपनी केंद्र अंतर्गत येत असलेल्या कुंभारगाव वीज वितरण उपकेंद्रात मागील काही वर्षात वीज चोरी ग्राहकांना ११ लाख ४८ हजाराचा दंड झाल्यामुळे वीज चोरी प्रकारात मोठा आळा बसला असून वीज चोरी करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

महावितरणच्या विद्युत तारावर हूक टाकून, मीटरमध्ये छेडछाड करून आणि घरगुती वीज कनेक्शन घेऊन व्यावसायिक वापर करण्याचे ५९ वीजचोरीचे प्रकार महावितरणच्या पथकाने उजेडात आणले. ही वीज चोरी ११ लाख ४८ हजार ११३ रुपयांची आहे, असे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

कुंभारगाव उपकेंद्रात वीज चोरीच्या घटना वाढल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. या तक्रारींनुसार महावितरणकडून विशेष भरारी पथके तयार केली होती. या पथकाने जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२५ या पाच वर्षाच्या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात घरगुती व शेती वीज ग्राहकांनी विद्युत कनेक्शन घेऊन त्याचा मोठ्या प्रमाणात काही



**कुंभारगाव उपकेंद्रातील कारवाई**

ग्राहकांनी वीज चोरीचा वापर केला होता. तसेच कुंभारगाव उपकेंद्रात एकूण ९ विद्युत तंत्रज्ञ व ४ विद्युत यंत्रचालक काम पाहतात या उपकेंद्रात एकूण १८ ग्रामीण भागातील गावे येतात.

येथे मागील वर्षात नव्याने रुजू झालेले भूषण गावंडे कनिष्ठ अभियंता यांनी कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना ड्रेस कोड घालण्याचा सूचना देऊन कर्मचाऱ्यांना शिस्तीचे धडे दिले. व वीज ग्राहकांच्या समस्या तात्काळ मार्गी काढाचे आदेश कर्मचाऱ्यांना दिले तसेच वीज ग्राहक समस्या कार्यालया प्रयत्न येऊं नये यासाठी कर्तव्यावर पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांनी काढावा असे आदेश भूषण गावंडे कनिष्ठ अभियंता यांनी दिले आहे. विशेषतः असून कनिष्ठ अभियंता गावंडे यांनी २८० वीज मिटर नविन ग्राहकांना बसवून दिले आहे त्यामुळे वीज चोरी होण्याचा प्रकारांवर नियंत्रण आले आहे. कुंभारगाव वीज उपकेंद्रातील कनिष्ठ अभियंता भूषण गावंडे यांची महावितरण कंपनने कामगिरी पाहून त्यांना उत्कृष्ट अभियंता म्हणून २०२५ मध्ये गौरविण्यात आले आहे.कुंभारगाव वीज उपकेंद्रा अंतर्गत येत असलेल्या नादुरुस्त वीज तार तात्काळ दुरुस्ती करून ग्राहकांचे समाधान होत आहे.

## दर्यापूर उत्सव समितीची भगवान वाल्मीकी तिर्थाला भेट

**अमरावती/का.प्र.**

महर्षि वाल्मिकी जयंती उत्सव समिती, दर्यापूरचे पदाधिकारी उमेश ढोणे, गोपाळ ढोणे तसेच आध्यात्मिक चिकित्सक मंडळी यांनी अलीकडेच अमृतसर जिल्ह्यातील भगवान वाल्मीकि रामतीर्थ तीर्थक्षेत्रास भेट देऊन त्या पवित्र स्थळाचे दर्शन घेतले व अध्यात्मिक अनुभवाचा लाभ घेतला. भगवान वाल्मीकि तीर्थ हे रामायणकालीन इतिहासाशी थेट जोडलेले पवित्र स्थान असून श्रद्धेनुसार याच भूमीवर माता सीता यांनी महर्षि वाल्मीकि यांच्या आश्रमात आश्रय घेतला आणि याच ठिकाणी लव-कुश यांचा जन्म झाला. या काळात धार्मिक



कीर्तन, भजन व सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर मंगलमय होतो.सन २०१६ मध्ये सुमारे २०० कोटी रुपये खर्चून या तीर्थक्षेत्राचे पुनर्निर्माण करण्यात आले असून, गुरु नानक देव विद्यापीठाच्या वास्तुकला विभागाने याची रचना केली आहे. आधुनिक सुविधा आणि पारंपरिक सौंदर्याचा सुंदर संगम साधणारे हे तीर्थ आज अध्यात्म व संस्कृतीचे तेजस्वी प्रतीक बनले आहे. भगवान वाल्मीकि यांच्या तेजस्वी कार्याची, माता सीतेच्या शुद्धतेची आणि लव-कुशांच्या शौर्याची स्मृती जागवणारे हे तीर्थक्षेत्र आजही भक्तांच्या मनात श्रद्धा, शांती आणि अध्यात्माचा अखंड प्रवाह निर्माण करत आहे.या भेटीदरम्यान शिष्टमंडळात प्रा. सुषमा, प्रा. कमल, अध्यापक प्रभा, चैताली, पायस, इंजी. माहूरे आदी पदाधिकारी व आध्यात्मिक चिकित्सक उपस्थित होते.

## अक्षर 'मानव संवाद सहवास' कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

तुमच्या विचारांना, स्वप्नांना आणि कृतीला एक नवी दिशा मिळावी, देशात जास्तीत जास्त जबाबदार नागरिक घडावे, असा एक 'संवाद सहवास' नावाचा अनोखा उपक्रम अक्षर मानवकडून पुणे येथील शिक्षक भवन, नवी पेठ, गांजवे चौक, पत्रकार भवनाच्या शेजारी, पुणे येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० वाजता हा कार्यक्रम दोन दिवस चालेल.

आताचा संवाद सहवास होतोय भारताचे ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर यांच्याशी. ते वरिष्ठ लेखक आहेत. या कार्यक्रमात लेखक, कथा कादंबरीकार राजन



खान व अक्षर मानव राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.निवांत, शांत ठिकाणी जमावं आणि मनमोकळ्या संवादाचा अनौपचारिक आनंद घ्यावा, निवासाची, जेवण्याची आणि चहाची व्यवस्था आहे. कुणाची गैरसोय होवू नये म्हणून कार्यक्रमाला येण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. माणसाला माणूस जोडण्याचा हा विचारमंथन व्हावं असा हा कार्यक्रम आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात संकल्प. आमच्या संवाद सहवास कार्यक्रमाला या, आणि एका नव्या, सुंदर विश्वाची निर्मिती करा, अशी माहिती अमरावती अक्षर मानवच्या जिल्हा सचिव अश्विनी वितोंडे-खान यांनी माहिती दिली. नावनोंदणीकरिता प्रा. गणेश सोबत आपण संपर्क करु शकता. यासंवाद सहवास कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी लाभघ्यावा, असे कार्यकारिणीच्या राज्य मुख्य पदाधिकारी यांच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे.



**टाकरखेडा संभु - लसणापूर परिसरातील सध्या पावसाने सवड दिली परंतु ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळीचा प्रार्दुभाव होतो, त्यामुळे पिक उत्पादनात घट होवू शकते, म्हणून शेतकरी तूर पिकावर ट्रॅक्टरने फवारणी करतांना दिसत आहे.** (छाया-संतोष शेंडे)

## तक्षशिला महाविद्यालयात भानुदास काळे यांचे व्याख्यान

**अमरावती/क्रा.प्र.**

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती संचालित तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय, दारापूर येथे स्मृतीशेष दादासाहेब गवई यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून आंबेडकरी विचारवंत आणि सेवानिवृत्त शिक्षक भानुदास काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन झाली. मार्गदर्शनपर



व्याख्यानात भानुदास काळे म्हणाले की, दादासाहेब गवई हे भारतीय राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, आणि दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. टी. इंगोले म्हणाले की, दादासाहेब हे भारतीय राजकारणातील 'अजातशत्रू' होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दीपस्तंभ आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. या प्रसंगी डीन डॉ. एस. टी. वरघट, प्रशासकीय अधिकारी हेमंत धुमाळे, तसेच विविध विभाग प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. धीरज आष्टोनकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. मनीष बिजवे यांनी तर आभारप्रदर्शन सहाय्यक ग्रंथपाल देवेंद्र चोरे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. संतोष यावले, प्रा. डी. जे. मनोवार, प्रा. एम. एम. पाटील, प्रा. डी. बी. पवार, प्रा. डॉ. एस. एस. दाभने, प्रा. पि. जे. भडांगे, प्रा. एम. जी. वाटणे, प्रा. एच. के. लोणपांडे, पी. बी. मोहोड, एम. एम. बनसोड, व्ही. एन. तिखे, वाय. एन. गोंडाने, पी. आर. ठाकरे, वाय. एल. सवई, ए. व्ही. काळमेघ, पी. टी. श्रीखंडे, एच. पी. काकड, नईम पटेल तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे शालेय शिक्षण विभागाला निवेदन

**पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करा**

**अमरावती/क्रा.प्र.**

शिक्षकांना लागू करावयाच्या वेतनश्रेणी बाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर,शालेय प्रधान सचिव रणजित सिंग देओल,सह.आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग,प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी,शिक्षण उपसचिव आबासाहेब कवळे यांना निवेदनाव्दारे केली आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

समान शैक्षणिक अर्हता व गठीत अभ्यास समितीची शिफारस लक्षात घेऊन राज्यातील १००% विषय पदवीधर शिक्षकांना सामान न्याय तत्त्वानुसार एस-१४ वेतनश्रेणी लागू करणे करण्यात यावी अशी शिक्षक समितीने केली आहे.विशेष शिक्षकांना समायोजित करताना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार वेतनश्रेणी लागू करण्याचे शासन निर्णय ८ ऑक्टोबर २०२४ मध्ये नमूद असल्या नुसार पदवी अर्हता असणाऱ्या समायोजित विशेष शिक्षकांना एस-१४ वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्याचे स्वयंस्पष्ट पत्र निर्गत केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून शासनाप्रती आभार व्यक्त केले आहे.सोबतच इयत्ता ६ वी ते ८ वीला अध्यापन करणाऱ्या विषय पदवीधर शिक्षकांना एस-१४ वेतनश्रेणी न्यायसंगत आहे. परंतु १३ ऑक्टोबर २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार विषय निहाय १/३ शिक्षकांनाच वेतनश्रेणी अनुज्ञेय करून समान कामासाठी समान वेतनाच्या धोरणाला हरताळ फासला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती सह अन्य शिक्षक संघटनांनी शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर मा. आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेत गठीत करण्यात आलेल्या अभ्यास गटाने सुद्धा सर्व विषय पदवीधर शिक्षकांना सातव्या वेतन आयोगातील एस-१४ श्रेणीची शिफारस केली आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सर्व विषय पदवीधर शिक्षकांना न्याय देण्याबाबत वेळोवेळी आश्वस्त केले. मात्र अद्यापही अन्यायकारक असे १३ ऑक्टोबर २०१६ चे परिपत्रक रद्द करून समान वेतनश्रेणी लागू केलेली नाही. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून आग्रही विनंती करण्यात आली की इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विषय पदवीधर शिक्षकांच्या एस-१४ वेतनश्रेणीबाबत अनुकूल निर्णय घेऊन न्याय द्यावा.अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,राज्य नेते उदय शिंदे,राज्य सल्लागार विजयकुमार पंडित,महादेव पाटील माळवदकर,राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, आनंदा कांदळकर,विलास कंटेकुरे,राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील,राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर,राज्य संघटक राजेंद्र खेडकर,सुरेश पाटील,राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील,सतिश सांगळे,राज्य संपर्क प्रमुख किशन बिरादार,राज्य प्रवक्ता नितीन नवले,राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर,राज्य ऑडिटर पंडित नागरगोजे,महिला आघाडी प्रमुख वर्षाताई केनवडे,नपा-मनपा आघाडी प्रमुख सुधाकर सावंत,जुनी पेन्शन आघाडी प्रमुख प्रफुल्ल पुंडकर,ऊर्दू आघाडी प्रमुख सैय्यद शफीक अली यांनी केली आहे.

## श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

**कै.नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ**

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते स्व. द.ना. उपाख्य बबनराव दादा मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५' प्रदान करावयाचा आहे. यावर्षी व्यक्ती गटात एक व संस्था गटात एक, अशा एकूण दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील श्री संत गाडगे बाबांच्या कृतीशील विचाराशी तसेच दशसूत्रीशी बांधीलकी असणारी व्यक्ती किंवा संस्थेला देण्यात येतो. पुरस्कारासाठी एखाद्या व्यक्तीने वा संस्थेने स्वत:हून नाव सादर करणे किंवा दुस-या कोण्या एखाद्या व्यक्तीची वा संस्थेची पुरस्कारासाठी शिफारस करणे किंवा नाव सूचविणे दोन्ही पध्दतीने नामांकन अर्ज स्वीकारण्यात येतील. संस्था किंवा व्यक्तीगत आवेदकांनी नामांकन आवेदन पत्रासोबत आपल्या जीवनाचा सविस्तर आलेख आणि पुरस्काराकरीता निश्चित केलेल्या निकषानुसार तसेच गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार सामाजिक क्षेत्रात कार्य केल्याचा पुरावा पाठविणे आवश्यक आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी आवेदकांना दि. १० नोव्हेंबर, २०२५ पूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र पाच प्रतीत कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ४४४६०२ या पत्त्यावर पाठवावयाची आहेत. नामांकन आवेदनपत्र पाठवितांना लिफाप्यावर कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५ नामांकनाकरीता आवेदनपत्र हे ठळक अक्षरात लिहावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) व्यक्ती गट व संस्था गट अशा दोन पुरस्काराकरीता स्वतंत्र नामांकन आवेदनपत्र विहीत प्रपत्रात देण्यात आले आहे. विद्यापीठाव्दारे संकेतस्थळावर दिलेल्या नामांकन आवेदनपत्रानुसार ए-फोर साईज मधीलच संगणकीय नामांकन आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. ज्यांनी यापूर्वी सदर पुरस्काराकरीता विद्यापीठाला अर्ज सादर केले आहेत, त्यांनी यावर्षीच्या पुरस्कारासाठी अर्ज करुन मागील आवेदनपत्राचा विचार करावा, असा विनंतीपर अर्ज सादर करावा.अर्ज सादर करतांना त्यांचा केवळ मागीलवर्षी सादर केलेला अर्जच विचारात घेतला जाईल. त्यांना सदर अर्जासोबत त्यांच्या एका वर्षाच्या सामाजिक कार्याच्या माहितीचा प्रस्ताव नव्याने सादर करावा लागेल. विना प्रपत्र पाठविलेला अर्ज रद्द करण्यात येईल, याची नोंद संबंधितांना घ्यावी. यापूर्वी अनेक मान्यवर व्यक्तींना हा पुरस्कार देवून विद्यापीठाने सन्मानित केले आहे. सन २०२५ च्या सामाजिक कार्य पुरस्काराकरीता अर्ज करण्यास इच्छुक व्यक्तींनी वा संस्थांनी www.sgbau.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर 'अवार्ड ॲन्ड अचिव्हमेन्ट' यामध्ये कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २० या लिंकवर विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र व पुरस्काराचे निकष यांची सविस्तर माहिती करून घ्यावी.

अधिक माहितीसाठी जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचेशी प्रत्यक्ष वा दूरध्वनी क्रमांक ९०११०७१०७६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले आहे.

## श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त चंदनउटी व रमणा उत्सव

### भविकांकरिता भव्य महाप्रसाद, कार्तिक मास मांड वाढवा सोहळा

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानतर्फे कार्तिक पौर्णिमेनिमित्त चंदनउटी व रमणा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या धार्मिक सोहळ्याची भक्तांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

या उत्सवाचे आयोजन ५ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले असून, कार्यक्रमाची सुरुवात सायं. ४ वाजता चंदन उटी व रमणा सोहळ्याने होणार आहे. दुपारपासूनच भाविकांची गर्दी सावंगा विठोबा मंदिर परिसरात होण्यास सुरुवात होईल.



संध्याकाळी ६ वाजता कार्तिक मास काकडा समाप्ती भजनाचे गजरात पार पडेल. त्यानंतर सायं. ७ वाजता भाविक भक्त आणि समस्त ग्रामवासियांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून या महाप्रसादाचे दाते अनिल भानाजी राऊत (नागपूर) यांचे संपूर्ण स्वखर्चाने आणि अन्नदान समितीचे नियोजनात होत आहे. याचबरोबर ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता कार्तिक मास वाढवा कार्यक्रम पार पडणार आहे. या दिवशी सकाळपासूनच अवधूत नामस्मरण, भजन, आणि धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमात भाविक भक्तांनी आणि ग्रामस्थांनी तन-मन-धनाने सहभाग घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन श्री विठोबा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी तसेच समस्त विश्वस्त मंडळा तर्फे करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषदेचे अंतिम आरक्षण प्रसिद्ध

## -आगामी निवडणुकीसाठी ५९ जागा निश्चित -३० जागा महिला आरक्षित

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता अंतिम आरक्षणाची अधिसूचना आज, ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जाहीर केली. या अधिसूचनेअन्वये एकूण ५९ निवडणूक विभागांसाठी आरक्षणाची अंमलबजावणी होणार आहे. राज्य शासन, ग्रामविकास विभागाच्या सूचनेनुसार प्रभाग रचना कार्यक्रमानुसार, २२ ऑगस्ट, २०२५ रोजी ५९ निवडणूक विभागांच्या भौगोलिक सीमा शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम मधील तरतुदी आणि राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, अमरावती जिल्हा परिषदेतील अनुसूचित जाती (एण्), अनुसूचित जमाती (एऊ), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ध्ँण्) आणि स्त्रियांसाठी (सर्व प्रवर्गातील महिलांसह) जागा निश्चित




करण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, आरक्षण सोडत काढून ती अंतिमरित्या प्रसिद्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले होते. या कार्यक्रमानुसार, दि. १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी आरक्षित निवडणूक विभागांची जाहीर सोडत काढण्यात आली. त्यानंतर, दि. १४ ते १७ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत आरक्षण विभागनिहाय प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या. प्राप्त हरकती व सूचनांवरील सुनावणी आणि अभिप्रायाचा विचार करून, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी या आरक्षणाला मान्यता दिली.राज्य निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण अधिसूचित केले आहे. या अधिसूचनेनुसार, अमरावती जिल्हा परिषदेतील एकूण ५९ जागांपैकी ३० जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. प्रवर्गनिहाय आरक्षणाचा तपशील पाहिल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ११ जागा, त्यापैकी ६ महिलांसाठी; अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी १२ जागा, त्यापैकी ६ महिलांकरिता; नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग साठी १५ जागा, त्यापैकी ८ महिलांसाठी; तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी २१ जागा असून, त्यापैकी १० जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

# वकिलांनी केले लाल फीत लावून काम

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यामध्ये वकिलांवर वारंवार होत असलेल्या हल्ल्यांचा निषेध आणि वकील संरक्षण कायदा तातडीने लागू करण्याच्या मागणीसाठी आज सोमवार ३ नोव्हेंबर रोजी वकिलांनी लाल फित लावून कोर्टाचे कामकाज केले तसेच कोर्ट परिसरात शासनाच्या विरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.काही दिवसांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यामध्ये एका साक्षीदाराने उलट तपासणीच्या प्रश्नामुळे चिडून संबंधित वकिलावर प्राणघातक हल्ला केला. यापूर्वीही राज्यातील विविध भागात अनेक वकिलांना मारहाण झाली आहे. तसेच, काही वकिलांची हत्याही केली गेली आहे. त्यामुळे वकील संरक्षण कायदा तातडीने लागू करणे आवश्यक आहे. या मागणीसाठी सोमवारी वकील संघाचो पदाधिकाऱ्यांनी काळा कोट आणि लाल फीत लावून शासनाचा निषेध केला. शासनाविरोधात घोषणाबाजी



ही यावेळी करण्यात आली. वकिलांवर होणाऱ्या हल्लायावर चिंता व्यक्त करण्यात आली.लवकरात लवकर संरक्षण कायदा बनविण्यात यावा अशी मागणी ☞(पान २ वर)

## तिवसा वकील संघाकडून निषेध

**तिवसा/प्रतिनिधीः-** राज्यात वारंवार वकीलांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या निषेधार्थ तथा ॲडव्होकेट प्रोटेक्शन बिलाच्या मागणी करीता बार काउन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा च्या निर्देशानुसार आज तिवसा वकील संघाने लाल फीत लावून कामकाज केले.



यावेळी तिवसा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रमोद गाडे, ॲड. तागडे, ॲड. भोयर, ॲड. गजबे, ॲड. तवर, ॲड. कुर्हेकर, ॲड.वाघ,अटर्णी सदानंद मनवरे व दिपक आमले हे हजर होते.

# तिवसा तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर संतप्त शेतकऱ्यांची धडक

## -शासकीय मदतीसह पीकविमा परतावा द्या

### -काँग्रेसच्या नेतृत्वात शेतकऱ्यांची मागणी

**तिवसा/प्रतिनिधीः-** सततच्या पावसामुळे तालुक्यातील सोयाबिन उत्पादक शेतकरी चांगलाच आर्थिक संकटात सापडला असून सोयाबिन पीक हे पूर्णपणे उध्वस्त झाल्यामुळे सोयाबिन पेरणी व काढणीचा खर्चही निघू शकला नाही.त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी आज (दि.३) तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडक देत चांगलाच संताप व्यक्त केला.



खरिपातील सोयाबीनचा कापणीचा हंगाम संपून महिना उलटला असून रब्बीच्या पेरणीपूर्व तयारीला सुरवात झाली परंतु अद्यापही शासन किंव्हा प्रशासनाकडून सोयाबिन पिकांचा विमा परतावा मिळण्यासंदर्भात कुठल्याच प्रकारच्या अधिकृत सूचना नसल्यामुळे विमाधारक शेतकरी संभ्रमात आहे.सरकारने यावर्षी एक रुपयात विमा पॉलिसी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भृदंड सहन करून आपल्या पिकांचा ☞(पान २ वर)

# खदानमध्ये आढळला अज्ञात इसमाचा मृतदेह

## -ओळख पटविण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या एका खदानमध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. माहितीनुसार नांदगाव पेठ येथे जयसिंग राठोड यांच्या खदानमध्ये एका ४० ते ४५ वर्षाच्या अनोळखी इसमाचा मृतदेह सोमवारी सकाळी आढळून आला आहे. तिथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठविला.मृतक इसमाची उंची पाच फूट पाच इंच,रंग काळा सावळा, अंगात कथिया कलरचा फुल बाहीचा शर्ट, हिरवा लोअर घातलेला व हाताच्या उजव्या मनगटात काळया रंगाचा धागा घातलेला आहे. सदर व्यक्ती बाबत काही माहिती मिळून आल्यास पोलीस स्टेशन नांदगाव पेठ येथील पो.नी. दहातोंडे यांच्या मों.९५२७५३६१०० व पोहेका राजाभाऊ राऊत ८३२९६७४५३९ यांच्या मोबाईलवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विकासाचा समतोल साधण्यासाठी कृती कार्यक्रम राबविण्यास प्राधान्य-आ.सुलभा खोडके

## -विलास नगर प्रभागात ४८ लक्ष निधीतील कामांचे भूमिपूजन

**अमरावती/प्रतिनिधी :-** शहरी भागात पायाभूत सुविधांची पूर्तता करून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच सर्वसामान्य घटकांपर्यंत विकासाची संकल्पना पोहोचविण्यासाठी आपले सर्वोतोपरी प्राधान्य आहे. यासाठी विकास कामांचा एक नियोजित कृती कार्यक्रम राबविण्यात येत असून शहराच्या सर्वच भागात विकासाचा समतोल साधला जात आहे. शहराच्या सर्वसाधारण भागात जी पायाभूत सुविधांची विकासाची कामे करण्यात आली, तीच विकास कामे अनुसूचित



जाती बहुल नागरी लोकवस्ती भागात पूर्णत्वास आणली जात आहे. विकास कामांची पूर्तता होत असतांना, ती दीर्घकाळ टिकली पाहिजेत, म्हणून नागरिकांनी त्याचे संवर्धन करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले. ☞(पान २ वर)

# लग्नाचे आमिष दाखवत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## -पिडिता गर्भवती, आरोपीवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाचे आमिष दाखवत एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती केल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे. या संदर्भात पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी गणेश विरुद्ध कलम ६४ (२), (एम) बीएनएस व सहकलम ४, ६ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार चांदूरबाजार तालुक्यातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी अकरावी मध्ये शिकते. या दरम्यान तिची ओळख आरोपी गणेश सोबत ओळख झाली. दोघे नेहमी बोलत राहायचे. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. या दरम्यान आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. रहाटगाव परिसरातील एका हॉटेलमध्ये आरोपी तिला नेहमी घेऊन जायचा. १ मार्च ते ३० जून २०२५ पर्यंत हा क्रम चालला. यामुळे पिडिता गर्भवती झाली. तिने आरोपीला लग्नाबद्दल म्हटले तर तो फरार झाला. यामुळे तिने चांदुर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार☞(पान २ वर)

# ऑनलाइन फसवणुकी प्रकरणात सायबर पोलिसांची मोठी कामगिरी

## पोलिसांनी परत मिळवले तब्बल २४ लाख रुपये

### ज्येष्ठ वकिलाची ३१ लाखांची झाली होती फसवणूक

**अमरावता/प्रतिनिधीः-** सायबर गुन्हेगारांनी 'डिजिटल अटक'ची भीती दाखवत शहरातील एका ७१ वर्षीय ज्येष्ठ वकिलाची तब्बल ३१ लाख ५० हजार रुपयांनी फसवणुक केली. मात्र, सायबर पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे त्यातील २४ लाख रुपये परत मिळवण्यात यश आले आहे.

शहरातील मोतीनगर, प्रसाद कॉलनी येथे राहणारे ज्येष्ठ वकील रामपाल भिकमचंद कलंत्री (वय ७१) हे या फसवणुकीचे बळी ठरले. २५ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांना 'भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाचा अधिकारी असल्याचो भासवणाऱ्या




एका राहुल कुमार नावाच्या व्यक्तीकडून फोन आला. त्या व्यक्तीने वकिलांना सांगितले की, त्यांच्या नावावर एफआयआर दाखल झाला असून, त्यांनी लोकांना त्रास देणारे आणि बेकायदेशीर संदेश पाठविल्याचा आरोप आहे. 'तात्काळ पैसे जमा न केल्यास डिजिटल अटक होईल' अशी धमकी देत आरोपींनी त्यांच्याकडून विविध खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने ३१ लाख ५० हजार रुपये ट्रान्सफर करून घेतले.

आरोपींनी सरकारी खात्यांच्या नावाने बनावट पत्रे आणि कागदपत्रे व्हॉट्स अ?पवर पाठवून पीडित वकिलांच्या मनात भीती निर्माण केली. एका 'नरेश गोयल' नावाच्या व्यक्तीशी संबंधित २५ लाखांच्या कमिशन घोटाळ्याची बनावट कथा रचण्यात आली. 'तुम्ही निर्दोष ठरलात तर पैसे परत मिळतील' असे सांगून वकिलांना फसवण्यात आले.


फसवणुकीची माहिती मिळताच अमरावती सायबर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. तपासात २४ लाखांची रक्कम आयसीआयसीआय बँकेतील ☞(पान २ वर)

# वेदिका भडके सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण

**वरूड/प्रतिनिधीः-** वजन मापे विभागातील निवृत्त प्रशासकीय अधिकारी तसेच वरूड शहरातील प्रगतीशील शेतकरी विनोद रामकृष्ण भडके यांची कन्या वेदिका भडके हिने सनदी लेखापाल ( चार्टर्ड अकाउंट) ची परिक्षा नुकतीच उत्तीर्ण केली आहे. तिने प्राप्त केलेल्या या घवघवीत यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



भडके परिवार हा मुळचा वरूड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील आहे. विनोदचे मोठेबंधु प्रमोद भडके यांनी आजपावेतो विनोद प्रशासकीय अधिकारीपदी कार्यरत असताना त्यांची वडिलोपार्जित शेतीचा सांभाळ केला. ☞(पान २ वर)




# ४१ हजारांची लाच मागणारा कार्यकारी अभियंता रंगेहात अटक

## -एसीबीचा सापळ,सरकारी कंत्राटदाराकडून मागितली होती लाच

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरकारी कंत्राटदाराकडून ४१ हजारांची लाच मागणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत शाखेतील कार्यकारी अभियंत्याला (वर्ग-१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईनंतर गाडगेनगर पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचे नाव रोहन चंद्रशेखर पाटील (वय ३५, रा. साईनगर,



कल्पतरू नगर, अशोका मार्ग, नाशिक) असे असून तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत शाखेत कार्यरत आहे.

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार हा सरकारी कंत्राटदार असून त्याला बुलढाणा जिल्ह्यातील तीन विद्युत कामांची कंत्राटे मंजूर झाली होती. या कामांची एकूण किंमत होती सुमारे १७ लाख ९४ हजार रुपये होती. तक्रारदाराने बिल मंजुरीसाठी कार्यकारी अभियंता पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी बिलाच्या रकमेवर २ टक्के कमिशन म्हणजेच ३५ हजार रुपये मागितले. याच भेटीत पाटील ☞(पान २ वर)

# कापूस खरेदीची मर्यादा अन्यायकारक

## -सी.सी.आय ने निर्णयाचा पुनर्विचार करावाः सुनिल गावंडे

**खल्लार/प्रतिनिधीः-** भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.) यांनी चालू हंगामात प्रति एकर केवळ ६ क्विंटल कापूस खरेदीची मर्यादा निश्चित केली असून, हा निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने अन्यायकारक आणि नुकसानकारक असल्याचे मत दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनिल पाटील गावंडे यांनी व्यक्त केले आहे.

या संदर्भात आज (दि.३) उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले की, गेल्या हंगामात सी.सी.आय. तर्फे प्रति एकर १३ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला होता. मात्र यंदा लिमिट निम्म्यावर आणल्याने शेतकऱ्यांना शासकीय खरेदीपासून वंचित राहण्याची वेळ येणार आहे.

शेतकरी आधीच अस्मानी व सुलतानी संकटांनी त्रस्त झालेले असतांना, अशी जाचक अट ☞(पान २ वर)

# शिवशक्ती नगरातील क्रीडा मैदानावर घाणीचे साम्राज्य

## प्रहारने आयुक्तांना दिला ७ दिवसाचा अल्टीमेटम

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक प्रभाग क्रमांक २० शिवशक्ती नगर परिसरातील अंबा मंगलमच्या बाजूला असलेल्या क्रीडा मंडळाच्या मैदानावर मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. येथे कंटेनर ठेवले असून सदर मैदानाचे डम्पिंग डेपो मध्ये रूपांतरण झाले आहे. या मुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या आरोग्यावर याचे परिणाम होत आहे. याकडे लक्ष देऊन योग्य कार्यवाही करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पार्टी ने आज सोमवार ३ नोव्हेंबर रोजी मनपा आयुक्त सोम्या शर्मा यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की अंबा मंगलमच्या बाजूला असलेल्या खुल्या क्रीडा मंडळाच्या मैदानात मोठ्या प्रमाणावर ओल्या व सुक्या कचऱ्याचे ढीग दिसत आहे. यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. घंटागाडी आणि कटल्यातून संकलित केलेला कचरा टाकण्यात येत आहे. यामुळे मैदानाचे डम्पिंग डेपोत रूपांतर झाले आहे. दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. चिकनगुनिया,डेंगू ,मलेरिया सह साथीचे आजार परिसरात वेगाने पसरत आहे. नागरिकांचा जीव धोक्यात अडकला आहे. प्रकरणाची गंभीरता पाहून ७ दिवसाच्या आत सदर कंटेनर या ठिकाणाहून उचलून कचऱ्याचे निर्मूलन करण्यात ☞(पान २ वर)

# नवसारी मैदानावरील क्रीडा संकुलात कोट्यावधीचा भ्रष्टाचार

## -माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांचा गंभीर आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** मौजे नवसारी येथील सर्वे क्रमांक २९ येथील विकास योजना आरक्षण क्रमांक १४ खेळाच्या मैदानावर बांधण्यात आले. क्रीडा संकुला मध्ये कोट्यावधीचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी आज सोमवार ३ नोव्हेंबर रोजी झालेल्या एका पत्रकार परिषदेतून केला तसेच तत्कालीन अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

मुन्ना राठोड यांनी सांगितले की,नवसारी मैदान विकसित करण्यासाठी बिल्डर्सला देण्यात आले. त्यात स्पष्ट लिहिले होते की, या जागेचा इतर



प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेता जागेच्या वापरात बदल करण्यात आला. तत्कालीन जिल्हाधिकारी रिचा बागला यांच्या स्वाक्षरीने १० सप्टेंबर २०१० रोजी करारनामा करण्यात आला. अमरावती महापालिकेच्या प्रशासनाने महसूल विभाग ☞(पान २ वर)

